
महाराष्ट्राचे

# शिल्पकार

# महात्मा जोतिबा फुले



श्रीराम गुंदेकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

[illegible] ग्रंथालय

रा. सा. सं. मं. ग्रंथालय

## सम्यक क्रांतीचे प्रणेते

# सत्यशोधक महात्मा जोतिबा फुले

**श्रीराम गुंदेकर**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : जुलै २००४
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. २५

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : ४० रु.

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

सत्यशोधक आणि स्वातंत्र्य चळवळीतील
धगधगत्या मशाली
**क्रांतिसिंह नाना पाटील**
आणि
**क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी**
यांना सादर अर्पण

[illegible]

मुद्रक
[illegible]
प्रभादेवी, मुंबई [illegible]

[illegible]

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणत: शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती "महाराष्ट्राचे शिल्पकार" या योजनेअंतर्गत पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्रग्रंथमालेतील "सम्यक क्रांतीचे प्रणेते : सत्यशोधक महात्मा जोतिबा फुले" हा रौप्यमहोत्सवी चरित्रग्रंथ आहे.

मंडळाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार मी ७ नोव्हेंबर २००० रोजी स्वीकारला. माझ्या अगोदरच्या अध्यक्षांच्या—प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या—कार्यकाळात व त्यांच्याच पुढाकाराने या चरित्रग्रंथमालिकेची रूपरेषा तयार झालेली होती. इतकेच नव्हे तर काही चरित्रग्रंथांचे लेखनही सुरू झालेले होते. प्राप्त परिस्थितीत ही योजना मला महत्त्वाची वाटल्यामुळे मी योजनेला गती देण्याचे ठरविले. या मालिकेतील प्रा. ग. प्र. प्रधानलिखित "एस्. एम्. जोशी" हा चरित्रग्रंथ नोव्हेंबर २००१ मध्ये प्रकाशित झाला असून श्रीराम गुंदेकरलिखित "महात्मा जोतिबा फुले" हा चरित्रग्रंथ जुलै २००४ मध्ये प्रकाशित होत आहे. याचाच अर्थ उण्यापुऱ्या ३३ महिन्यांच्या कालावधीत या चरित्रग्रंथमालिकेत २५ चरित्रग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

या चरित्रग्रंथमालिकेअंतर्गत प्रकाशित झालेल्या प्रत्येक ग्रंथाच्या सुरुवातीला मी जे निवेदन लिहिले आहे त्या निवेदनात या ग्रंथमालिकेचे स्वरूप व हेतू विशद केला आहे. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे अशा व्यक्तींची चरित्रे लिहून ती प्रसिद्ध करण्याची मंडळाची ही योजना आहे. ज्या दिवंगत महनीय व्यक्तींवर हा चरित्रग्रंथ लिहिला जाईल त्या व्यक्तींचे जीवनचरित्र या ग्रंथात येणे जसे अपेक्षित आहे त्या प्रमाणेच ती व्यक्ती ज्या क्षेत्रात कार्यरत होती त्या क्षेत्रासाठी त्या व्यक्तीने दिलेले योगदान, या योगदानाचा त्या क्षेत्रावर झालेला अमीट परिणाम त्या ग्रंथात अधोरेखित व्हावा, असेही अपेक्षित आहे. ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य वाचक हा या

चरित्रग्रंथमालिकेचा वाचक धरण्यात आला आहे. त्यामुळे अशा वाचकांना आकलन-सुलभ मांडणी व भाषा या ग्रंथाची असावी तसेच प्रत्येक ग्रंथ शंभर ते सव्वाशे पृष्ठांचा असावा, असे या योजनेचे स्वरूप आहे.

या चरित्रग्रंथमालिकेअंतर्गत आतापर्यंत जे चरित्रग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत त्यामध्ये एस्. एम्. जोशी, साने गुरुजी, क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण, दादासाहेब फाळके, उद्धवराव पाटील, बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, स्वामी रामानंद तीर्थ, मामासाहेब जगदाळे, डॉ. विठ्ठलराव विखेपाटील, शंकरराव किर्लोस्कर आदी व्यक्तींवरील चरित्रग्रंथांचा समावेश आहे.

मात्र सातत्यानं प्रयत्न करूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. पंजाबराव देशमुख, भाई माधवराव बागल, दिनकरराव जवळकर, केशवराव जेधे, शंकरराव मोरे, संत तुकडोजी महाराज, गाडगेबाबा, सावित्रीबाई फुले, अण्णा भाऊ साठे आदी महनीय व्यक्तींवरील चरित्रग्रंथ अद्यापही मंडळाकडे लिहून आलेले नाहीत. ते जसजसे मंडळाकडे लिहून येतील तसतसे ते ग्रंथरूपाने प्रकाशित करण्यात येतील.

या चरित्रग्रंथमालिकेतील ग्रंथ लिहून घेताना व ते प्रसिद्ध करताना मला अनेक बाबींचे भान ठेवावे लागले आहे. त्याचे कारणही अर्थातच स्पष्ट आहे. मराठी माणसाची मानसिकता कधी नव्हे इतकी बदललेली आहे. समष्टींच्या असणाऱ्या महनीय व्यक्ती पक्षांच्या, जातींच्या, धर्मांच्या, पंथांच्या सीमारेषेत बंदिस्त केल्या जात आहेत. वस्तुनिष्ठ लेखन करणे वरचेवर अवघड होत चालले आहे. अशा परिस्थितीत या चरित्रग्रंथमालिकेसारखी योजना राबविणे मंडळाला कठीण होते. पण मंडळाच्या वतीने प्रकाशित करण्यात येत असलेल्या पुस्तकांचा मुलाधार हा मराठी वाचक असल्यामुळे व हा मुलाधार मजबूत असल्याची मंडळाची धारणा असल्यामुळे ही योजना राबविण्याचे धाडस मंडळाने केले आहे.

या चरित्रग्रंथमालिकेअंतर्गत प्रकाशित करण्यात आलेले सर्वच ग्रंथ निर्दोष आहेत असा मंडळाचा दावा नाही. मंडळाने प्रकाशित केलेल्या या मालिकेतील पुस्तकांत काही चुका असतील तर त्या चुका अवश्य आमच्या निदर्शनास आणाव्यात. त्या चुका दुरुस्त करण्याची विनाविलंब कार्यवाही मंडळ करील.

मुंबई — **रा. रं. बोराडे**
दिनांक : २९ जून २००४ — अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# मनोगत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत 'सत्यशोधक महात्मा जोतिबा फुले' यांचे चरित्र मी लिहावे, अशी आग्रहाची सूचना मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे यांनी केली. म. फुले यांचे चरित्र लिहिण्याचे काम जेवढे सोपे वाटते तेवढेच ते अवघड आहे. तरीही ही जबाबदारी मी आव्हान म्हणून स्वीकारली.

म. फुले यांचे नाव 'जोतिबा' लिहावे की 'जोतीराव' लिहावे; ते राजनिष्ठ होते की राष्ट्रनिष्ठ होते; ख्रिस्ताळलेले होते की नव्हते; ब्राह्मणांचे विरोधक होते की ब्राह्मण्याचे; असे भावनिक आणि गंभीर स्वरूपाचे मतभेद उपस्थित झालेले आहेत. स्वत: म. फुले यांनी त्यांचे ग्रंथ, निवेदन, अर्ज, पत्र यावर जोति, जोतिराव असे नाव लिहिलेले आहे.

महाराष्ट्रामध्ये पुरुषांच्या नावापुढे 'राव' आणि 'बा' आदराने लावले जाते. विठ्ठलराव आणि विठोबा, ज्ञानेश्वर आणि ज्ञानोबा, न्यानबा, ग्यानबा; पांडुरंग आणि पांडबा; खंडेराव आणि खंडोबा, कान्होजी आणि कान्होबा अशी पद्धती रूढ आहे. 'राव' म्हणजे राजा तर 'बा' म्हणजे बाप. महाराष्ट्रीय मन बाप, भाऊ, या स्वरूपातच पुरुषांकडे पाहते म्हणून नामदेवाचे नामदा, भीमरावाचे भीमदा होते. देवांना मातेच्या रूपातही ओळखले जाते. विठुमाऊली, विठाई; ज्ञानेश्वरमाऊली, ज्ञानाई, तुकाई याप्रमाणे आदरभाव, जवळीकपणा प्रस्थापित करण्याची लोकमनाची ही सवय आहे. जोतिबा किंवा जोतीराव यापैकी ज्यांना जे रुचेल, आवडेल ते नाव वापरावे. दोन्हीही नावे रूढ आहेत. हा वादाचा आणि भावनेचा विषय होऊ नये. प्रस्तुत चरित्रग्रंथामध्ये 'जोतिबा' या नावाचा स्वीकार करून बहुजन परंपरेशी नाते जोडले आहे.

म. फुले यांना प्रारंभापासून अनेक जाति-धर्म-वर्णाचे मित्र आणि सहकारी मिळाले. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेनंतर अनेकानेक चारित्र्यवान, कर्तृत्ववान, प्रतिभावंत, विद्वान, संशोधक, उद्योजक, समाजात मान सन्मान

आणि वजन असलेले सहकारी मिळाले. शिक्षण, समाजकारण, अर्थकारण, धर्मकारण, राजकारण, संगीत, इतर कला, साहित्य, पत्रकारिता यांमध्ये भरीव कामगिरी केली. सार्वजनिक बांधकामे, स्थापत्यशास्त्राचे उत्तम नमुने ठरलेल्या इमारती त्यांनी उभ्या केल्या. शेतकरी, कामगार चळवळी केल्या. अंधश्रद्धादी अनेक कालबाह्य प्रथांना विरोध केला. त्यासाठी दीर्घकाळ लढे दिले. महाराष्ट्रामध्ये शिक्षण प्रसाराला गती मिळाली, त्याला कारण सत्यशोधकांनी हे कार्य जीवनदानी पद्धतीने, निष्ठेने केले. स्वातंत्र्य चळवळीला बहुजनाभिमुख वळण देण्याचे कार्य, राष्ट्रीय काँग्रेसला येथील सामान्यांच्या प्रश्नांची दखल घेण्याला सत्यशोधकांनी भाग पाडले. येथील नियोजन कृषिअभिमुख व्हावे, यासाठी या मंडळींनी दबाव निर्माण केला. म. फुले आणि त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक चळवळीने आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीवर फार मोठा प्रभाव टाकला आहे. म. फुले यांचे चरित्र लिहिताना या महत्त्वाच्या घटना, प्रसंग सांगण्यावर भर दिला आहे.

म. फुले यांचे बरेच चरित्रग्रंथ उपलब्ध आहेत. त्यामध्ये अनेक घटना, प्रसंग या विषयीच्या तपशिलात सारखेपणा नाही. माहितीही विस्कळीत आणि विखुरलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत चरित्रग्रंथ लिहिणे एक आव्हान वाटत होते. म. फुले यांच्या समकालीन सहकाऱ्यांनी लिहिलेले चरित्रग्रंथ किंवा आठवणी; या सहकाऱ्यांच्या मुलांनी लिहून ठेवलेल्या आठवणी यांचा फार उपयोग झाला. त्यातही क्षत्रिय मराठेशास्त्री नारो बाबाजी महाघट पाटील, ओतूर (१८९१), डॉ. यशवंतराव फुले (१८९०), अनंत एकनाथ गवंडी (१९११) पंढरीनाथ सीताराम पाटील, चिखली (१९२७) या चरित्रग्रंथांशिवाय पंढरीनाथ पाटील यांनी लिहून घेतलेल्या आठवणींचा ग्रंथ 'आम्ही पाहिलेले फुले' (१९८१), डॉ. धनंजय कीर यांनी लिहिलेले 'म. फुले चरित्र' (१९६८) एवढ्या ग्रंथांचा आधारभूत ग्रंथ म्हणून उपयोग केला आहे. या आणि इतर चरित्रग्रंथांतील माहितीचे संकलन करणे, कालक्रमानुसार वर्गिकरण करणे, त्या घटनांचा आजच्या संदर्भात अर्थ लावणे, त्यातील मूल्यांचा शोध घेणे, त्यातील तत्कालीन आणि शाश्वताचा शोध घेणे; अटळ होते. संकलित केलेली माहिती विश्वासार्ह, साधार आणि अद्ययावत असावी, सत्यकथनावर भर द्यावा; समकालीन व्यक्ती, संस्था, विचारप्रवाह, चळवळी यांची तौलनिक पद्धतीने दखल घ्यावी, हे करीत करीत चरित्रनायकाच्या समग्र व्यक्तिमत्त्वाचा शोध घ्यावा, असे उद्दिष्ट निश्चित केले. चरित्रग्रंथाच्या पृष्ठमर्यादेचे भान ठेवून वरील उद्दिष्टांना मर्यादित प्रमाणात न्याय देता आला, याची नम्र जाणीव आहे.

चरित्रनायकाची अमर्याद स्तुती, उदात्तीकरण, गौरव टाळला आहे. म. फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई ही माणसे आहेत. त्यांना मानवी विकार होते. त्यांना त्या पलीकडे झेप घेता आली म्हणून त्यांना महामानव म्हटले जात आहे. त्यांचे जीवन, कार्य, विचार यांना तत्त्वज्ञानात्मक महत्त्व आहे.

प्रस्तुत चरित्रग्रंथ लिहिताना त्या काळातील व्यक्ती, चळवळी, वर्णसंघर्षाचा चैतन्यमय इतिहास अनुभवता आला. ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे आणि मंडळाचे सदस्य यांचे मन:पूर्वक आभार मानतो. प्रस्तुत चरित्रग्रंथ लिहिण्यासाठी ज्या ज्या आधारग्रंथांचा आणि संदर्भ ग्रंथांचा उपयोग झाला, त्या सर्व लेखकांचा मी आभारी आहे. प्रस्तुत ग्रंथ लिहिताना अनेक मित्रांचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष सहकार्य मिळाले, त्यांचेही आभार मानतो.

माझे आई-वडील तीर्थरूप अण्णा आणि आक्का, माझे उभय चुलते आणि चुलत्या तीर्थरूप दादा-आई; भाऊ-आबई यांचे ऋण व्यक्त करून त्यांच्या ऋणातच राहणे पसंत करतो. माझे तिन्ही भाऊ आणि भावजया; म. जोतिबा फुले यांनी वर्णन केलेल्या दु:स्थितीमध्ये जगत आहेत. त्यांच्या उत्स्फूर्त सहकार्यामुळे हा चरित्रग्रंथ लिहिण्याची पात्रता माझ्या ठिकाणी निर्माण झाली आहे; हे येथे विनम्रपणे नोंदवितो. माझी पत्नी सौ. संजीवनी आणि कन्या कु. सारिका, यांच्या सहकार्याचा निर्देश करणे आवश्यक आहे.

रसिक, वाचक या चरित्रग्रंथाचे स्वागत करतील, अशी खात्री आहे.

**– श्रीराम गुंदेकर**

प्रकाशनगर, बार्शी रस्ता
लातूर - ४१३ ५३१
दूरध्वनी (९५२३८२) २२०६७०

## कुळकथा

म. जोतिबा फुले यांचे पूर्वज कटगुणचे राहणारे होते. सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यात सातारा-पंढरपूर रस्त्यावर हे गाव आहे. आजही हा परिसर जिरायती शेतीचा आहे. गोऱ्हे हे कटगुणचे चौघुले होते. पोलिस पाटलाप्रमाणे चौघुला हा मानाचा आणि प्रतिष्ठेचा गावकामगार होता. मराठेशास्त्री नारो बाबाजी महाघट पाटील यांना कटकुणच्या चौघुले यांची वंशावळ, पैठण येथील देवजी माळी यांच्या घराण्याने नोंद केलेल्या माळगणीत पुढीलप्रमाणे उपलब्ध झाली आहे.

**कटगुणचे चौघुले**

बुधचे आबा माळी

कोंडिबा गोऱ्हे + बयाबाई

(१७१८-१७६२)

दिव्याचे चांफाजी टिळेकर

रत्नाबाई + शेटीबा

(१७५०-१८१७)

धनकवडीचे शिवा झगडे पाटील

गोविंदराव + चिमणाबाई

(१७९३-१८६४)

नायगावचे खंडुजी नेवसे पाटील

सावित्रीदेवी + म. जोतिबा फुले

(१८२७-१८९०)

हडपसरचे कृष्णाजी ससाणे

दत्तकपुत्र डॉ. यशवंतराव + राधा उर्फ लक्ष्मी

चौघुला या गावकामगाराचा कुलकर्णी या गावकामगाराशी संबंध येत असे. पोलीसपाटील, महालीपाटील, चौघुले इत्यादी पदावरचे गावकामगार

बहुतेक गावी ब्राह्मणेतर जातीचे असत. ते स्वत: सुशिक्षित, धाडसी, हुशार नसतील तर कुलकर्णी त्यांच्या नावाने कारभार पाहत असे. त्यांच्या अधिकाराचा वापर करीत असे. अनेक पाटील, चौधुले यांना गोत्यात आणून स्वत: सहीसलामत राहत असे.

जोतिबा यांचे पणजोबा कोंडिबा हे कष्टाळू शेतकरी होते. खाऊन-पिऊन टामटूम असलेल्या सुखी कुटुंबांपैकी कटगुणचे हे एक कुटुंब होते. त्यांची गावखोरात मळ्याची सुपीक जमीन होती. ती हडप करावी, अशी दुर्बुद्धी कुलकर्णींना सुचली. त्यांच्या लेखणीच्या करामतीने कसब दाखविले. त्या जमिनीवर स्वत:चा अंमल लावून टाकला. चौधुले असलेल्या कोंडिबा गोऱ्हे यांना याविषयी काहीच माहिती नव्हती. दरवर्षाप्रमाणे जमिनीची नांगरणी-कुळवणी केली. मृगाचा पाऊस पडल्यानंतर पेरणी करण्यासाठी गेले. कुलकर्णीने पेरणीची तिफण अडविली. 'जमीन माझी आहे. तिचा कब्जा मला द्यावा लागेल', असे तो धमकावून सांगू लागला. तिथे भांडण झाले. कोंडिबा गोऱ्हे, चौधुला असून काहीच करू शकले नाहीत. ते विचारात पडले. कुलकर्णीने आपल्यावर कपटकावा केला आहे, हे त्यांच्या लक्षात आले. कुलकर्णी अगोदरपासून कोंडिबा यांचा छळ करीत होता. आता तर हा काळजाचा तुकडाच त्याने घशात घालण्याचा डाव टाकला होता.

कोंडिबा गोऱ्हे सरळमार्गी, सज्जन आणि कष्टाळू होते. एका वर्षी जत्रेतही कुलकर्णीने कळ उपस्थित केली होती. सर्व कारणांचा संताप आता एकत्र उफाळून आला. तळपायाची आग मस्तकात गेली. आपल्या बापजाद्यापासूनची ही काळीआई! लेखणीच्या करामतीने त्याने स्वत:चा मालकीहक्क लावून टाकला. आपल्या डोळ्यांदेखत हे घडत आहे. आपण काहीच करू शकत नाही! मग आपण जगून तरी काय करायचे? जिवंत राहण्यापेक्षा मेलेले बरे!... पण आपण मेल्यामुळे हा प्रश्न कसा सुटेल?... त्यापेक्षा या ब्रह्मराक्षसालाच अद्दल घडविली तर! ठरले. त्यालाच अद्दल घडवावी. पुढे जे व्हायचे असेल ते होईल. पण कपटकाव्याचा काय परिणाम होतो ते तर त्याला कळू द्या. झाले. पक्का निर्धार केला.

एके दिवशी मध्यरात्री कोंडिबा गोऱ्हे त्या दुष्ट कुलकर्णीच्या घरी गेले. आपल्या हातातील धारदार कुऱ्हाडीने त्याचे तुकडे तुकडे केले आणि त्याचवेळी सहकुटुंब कटगुण सोडले. मुक्काम दर मुक्काम करीत ते पुण्याच्या दिशेने चालू लागले. कटगुणला कायमचा राम राम ठोकला.

## गोऱ्हे झाले फुले

हे कुटुंब खानवडी—ता. पुरंदर, जि. पुणे—येथे पेशवाईत जाऊन राहू लागले. मिळेल तिथे मजुरी करून उदरनिर्वाह करू लागले. तेथेच कोंडिबा गोऱ्हे यांना शेटीबा नावाचा मुलगा झाला. तो भोळसट आणि उधळ्या स्वभावाचा निघाला. शेटीबाला राणोजी, कृष्णाजी व गोविंद अशी तीन मुले झाली. ती थोडीशी मोठी झाल्यावर शेटीबाला कामात मदत करू लागली. त्यांना एका शेतमालकाच्या शेळ्या-मेंढ्या राखण्याचे काम मिळाले. मुलांची कमाई सुरू झाली; याचा शेटीबाला आनंद झाला. ती मुले मोठी झाल्यावर त्या शेतमालकाने त्यांना आपल्या स्वतःच्या फुलाच्या धंद्यामध्ये चाकरी दिली. त्या धंद्यातील कसब त्यांनी उत्तम प्रकारे आत्मसात केले. त्यांचा त्या धंद्यात नावलौकिक झाला. त्यांची ख्याती पुण्याला पेशव्यांपर्यंत पोहोचली. त्यांना पेशव्यांनी बोलावणे पाठविले. फुलांच्या माळा, हार, गुच्छ; फुलांच्याच गाद्या, चटया, उशा आणि पोशाख तयार करून पाठविण्याची आज्ञा केली. त्यांनी तयार केलेल्या वस्तू विलासप्रिय आणि रंगेल पेशव्यांना फारच आवडल्या. खूश होऊन त्यांनी त्यांच्या एका बागेचे काम या भावांवर सोपविले. बक्षीस म्हणून स्वारगेट येथील जमीन दिली. तेव्हापासून त्यांचे गोऱ्हे हे आडनाव मागे पडले आणि फुले हे पडनावच आडनाव म्हणून प्रचलित झाले.

## भाऊबंदकी

शेटीबाच्या मृत्यूनंतर राणोजी, कृष्णाजी आणि गोविंदा ही तिन्ही मुले झगडे नावाच्या शेटीबाच्या मामाकडे राहू लागली. मामांना अपत्य नसल्यामुळे त्यांची जमीन या तिघा भावांना मिळाली. थोरला राणोजी धूर्त, कावेबाज आणि स्वार्थी होता. त्याने माधवराव पेशव्यांनी दिलेली स्वारगेट येथील इनामाची जमीन, खानवडीची मामाची जमीन, सदाशिवपेठेतील मामाचा वाडा सरकारी कागदपत्रावर एकट्याच्या नावावर लावून घेतला. त्याने दोन्ही भावांना हुसकावून लावले. गोविंदाच्या जन्मानंतर शेटीबाची भरभराट झाली होती. त्याचा पायगुण चांगला, असे मानून त्याचे लाड होत होते. तेही राणोजीला सहन होत नव्हते. कृष्णाजी आणि गोविंदा यांनी एकविचाराने जमिनीत वाटा मिळावा यासाठी कोर्टात दावा लावला. पेशव्यांनी इनाम दिलेल्या जमिनीची सनद राणोजीच्या नावावर असल्यामुळे निकाल त्याच्याच बाजूने लागला. या जमिनीच्या कारणावरून कृष्णाजी आणि गोविंदराव; राणोजीशी नेहमी भांडत असत. हेच वैर पुढे जोतिबा फुले यांच्यापर्यंत चालत राहिले.

गोविंदराव फुले यांचे लग्न धनकवडीचे शिवा झगडे पाटील यांची कन्या चिमणाबाई यांच्याशी झाले. चिमणाबाई दयाळू व प्रेमळ होत्या. त्याही कुटुंबातील सर्वांच्या लाडक्या बनल्या. गोविंदराव व चिमणाबाई यांना राजाराम व धोंडिबा ही मुले झाली. धोंडिबा जन्मल्यानंतर आठ महिन्याने वारला. त्याच्या पाठीवर बरीच वर्षे चिमणाबाई यांना मुलबाळ झाले नाही. ११ एप्रिल १८२७, चैत्र शुद्ध पौर्णिमा शके १७४९ रोजी पुणे येथे पुत्र झाला. त्याचे नाव जोतिबा ठेवले. जोतिबाला पाहून दोघा नवराबायकोला फार आनंद वाटे. जोतिबाला फार काळ मातेचा सहवास लाभला नाही. २५ डिसेंबर १८२७ रोजी म्हणजे जोतिबा साडेआठ महिन्याचे होते, त्याचवेळी चिमणाबाई वारल्या. हे कुटुंब विभक्त झाले. शेतीच्या वाटण्या झाल्या. गोविंदराव यांच्या शेतावर मोलमजुरीसाठी काही बाया येत असत. त्या जोतिबांचे न्हाणे-धुणे, दूध पाजणे वगैरे कामे करीत. लहान जोतिबांचे हाल होत होते.

१ मे १८२९ पासून सगुणाबाईने जोतिबाचा सांभाळ केला. सगुणाबाई क्षीरसागर विधवा होती. माहेरी कोणीही नव्हते. तिने जॉन नावाच्या ख्रिस्ती धर्मप्रसारकाकडे नोकरी धरली होती. तिला लिहिणे-वाचणे येत नव्हते. मात्र गोऱ्या मिशनऱ्यांकडे राहत असल्यामुळे कामापुरते इंग्रजी बोलता येत होते. जोतिबा यांची ती मावस बहीण होती. तिच्या देखरेखीखाली आणि गोऱ्या मुलांच्या सहवासामध्ये जोतिबाची जडणघडण होत होती. जोतिबाने खूप शिकावे, मोठे व्हावे; असे सगुणाबाई यांना वाटत होते. म्हणून जोतिबाच्या शिक्षणाकडे त्यांनी स्वत: लक्ष दिले.

गोविंदराव फुले यांनी दुसरा गांधर्वविवाह केला होता. तिचेही नाव चिमाबाई ठेवले. तिने जोतिबांचा चांगला सांभाळ केला. तिला अपत्य झाले नाही. गोविंदराव फुले यांच्या मृत्यूनंतरही जोतिबा यांच्याशी तिचे चांगले संबंध होते. तिने आपली सर्व स्थावर आणि जंगम मालमत्ता जोतिबांना दिली होती. त्या पैशातूनच जोतिबांनी मुशीचे दुकान टाकले. इ.स. १८८३ मध्ये तिचे निधन झाले. तेव्हा लालबागेत चमेलीच्या सुगंधी लाकडात जोतिबांनी तिचा अग्निसंस्कार केला. सावत्र आईशी जोतिबांचे अखेरपर्यंत जिव्हाळ्याचे आणि आपुलकीचे संबंध होते.

## जोतिबा फुले यांचे शिक्षण

त्या काळात शाळांची संख्या फार नव्हती. कुठेतरी तात्या-पंतोजींच्या

खाजगी-गावठी शाळा होत्या. ग्रामीण भागात शिक्षणाची व्यवस्था नव्हती. इ.स. १८३२-१८३६ या काळात सगुणाबाई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे जोतिबाचे शाळेतील शिक्षण सुरू झाले. लेखन-वाचन-गणित यामध्ये त्यांची तैलबुद्धी चमकदार दिसू लागली. १८३२ मध्ये विनायकराव जोशी या देशस्थ ब्राह्मणाने जोतिबांना घरी येऊन शिकविले. गोविंदराव फुले यांनी तशी मुद्दाम व्यवस्था केली होती. इ.स. १८३३ मध्ये चर्च ऑफ स्कॉटलंड मिशनच्या शाळेत घातले. या शाळेतील ब्राह्मणांच्या मुलांनी जोतिबांच्या प्रवेशावरून ओरड केली. शूद्राने शिक्षण घेणे पाप असते, असे ते म्हणू लागले. महार-मांग; ख्रिस्ती होऊन शिकले; तर त्यांना चालत होते. पण ब्राह्मणेतर हिंदू शिकू लागला तर ते विरोध करीत होते. गोविंदराव यांच्या कृष्णाजी देव नावाच्या कारकुनाने जोतिबाचे शिक्षण बंद करण्याचा आग्रह धरला. जात-पंचायत वाळीत टाकील, ही भीती होती. इ.स. १८३६ मध्ये वयाच्या नवव्या वर्षी, जोतिबाचे शिक्षण बंद झाले. पाटी-लेखणी टाकून, पाटी-खुरपे हाती घेतले. बागेत काम सुरू झाले.

'कुणब्या घरी दाणं, बामणा घरी लिव्हणं आन् महारा घरी गाणं' हा समज त्या काळात लोकमनामध्ये पक्का रुजला होता. त्या काळात श्रीमंत घरची मुलेच शिकू शकत असत. त्यांना लिहिणे-वाचणे, कामापुरते हिशोब, थोडेसे पाठांतर आले की शिक्षण बंद केले जात होते. ही मुले नोकऱ्यांमध्ये आपले स्पर्धक होतील, त्यांना चांगले वाचता आले तर धर्म ग्रंथांतील आपल्या लबाड्या उघड होतील, ही भीती ब्राह्मण शिक्षकांना होती. म्हणून शिक्षणबंदी होती.

जोतिबांच्या शेजारी राहणारे उर्दू आणि पर्शियन भाषेचे पंतोजी गफव्हार बेग मुन्शी आणि ख्रिस्ती मिशनरी लिजिटसाहेब यांना जोतिबांची हुशारी, तरतरीतपणा, तल्लखपणा जाणवला. त्यांनी गोविंदरावांची भेट घेऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. येणारा काळ नव्या विद्येचा, विद्येच्या सामर्थ्याचा आहे, असे समजावून सांगितले. निरक्षरता, अविद्येचे दुष्परिणाम गोविंदरावांच्या पणजोबा, आजोबा आणि वडिलांना; काय काय आणि कसे भोगावे लागले, ते आठवले. जोतिबा इ.स. १८४१ मध्ये स्कॉटिश मिशनऱ्यांच्या इंग्रजी शाळेत पुन्हा जाऊ लागले. चौदा वर्षे वय असलेल्या जोतिबांना इतर लहान मुलांमध्ये बसण्याचा संकोच वाटू लागला. पण खूप अभ्यास करून प्रथम श्रेणीचे गुण मिळवून त्याने वरच्या वर्गात प्रवेश मिळविला.

पेशवाईचा अंत होऊन इ.स. १८१८ मध्ये इंग्रजी राजवट सुरू होती. व्यापारासाठी आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीने येथे न लढता राज्य बळकावले. पेशवाई गेल्याचे दुःख ब्राह्मण विसरत नव्हते. ते मनातून जळफळत होते. दुसरीकडे हातातील पळी, पंचपात्री, पंचांग, सोवळे टाकून, इंग्रजी बुके शिकून, बुट पाटलोणी घालून इंग्रज सरकारकडे नोकऱ्या करू लागले. इंग्रजांना बाटगे ठरवून शेकहँड करू लागले. पाव-बिस्किटांवर ताव मारू लागले. तात्या-पंतोजी मात्र त्यांच्या विद्यार्थ्यांच्या मनात इंग्रजी राजवटीविषयी द्वेषभावना निर्माण करीत होते. भिल्ल, रामोशी, आदिवासी, शेतकरी यांनी तर कितीतरी अगोदरपासून इंग्रजांना आणि त्यांच्या राजवटीला प्राणपणाने विरोध केला होता. त्यांना पकडून देण्यासाठी ठावठिकाणे सांगून, फितुरी करून इनामे लाटण्यात कित्येक उच्चवर्णीयांचा पुढाकार होता. इंग्रजी राजवट वाईट आहे; ती उलथून टाकली पाहिजे; असे विचार याच काळात तरूण जोतिबांच्या मनात होते. म्हणून ते स्वतः आणि त्यांचे मित्र सदाशिव बल्लाळ गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर, यशवंत परांजपे यांच्यासह लहुजीबुवा वस्ताद साळवे यांच्या तालमीत जात होते. लहुजी वस्ताद यांची तालीम निशाणबाजी, दांडपट्टा यासाठी प्रसिद्ध होती. याच तालमीत वासुदेव बळवंत फडके यांनीही दांडपट्टा, नेमबाजीचे शिक्षण घेतले होते. जोतिबा यांच्याकडे दोन बंदुका आणि एक गुप्ती होती. मोरो विठ्ठल वाळवेकर, हसनखान आणि डॉ. विश्राम रामजी घोले रिकामपणी बंदुकीतून छरे मारून नेमबाजी करीत असत.

इंग्रजी राजवट उलथून टाकण्याचा आपला विचार खरा ठरला तर येथे पेशवाई राजवट पुन्हा येईल. पुन्हा येथे दलितांच्या सावलीचाही विटाळ पाळला जाईल. शूद्रातिशूद्रांच्या तोंडात शेंदूर भरून, नव्या इमारतींच्या पायात घालून जिवंत बळी दिला जाईल. शेतकऱ्यांना धुरी देण्याच्या म्हणजे मिरच्याच्या धुरात उभे राहण्याच्या, त्यांच्या पाठीवर मोठा दगड ठेवून किंवा त्यांच्या बायकोला त्यांच्या पाठीवर बसवून उन्हात उभे करण्याच्या शिक्षा पुन्हा सुरू होतील. मनूचे कायदे मोडले तर हत्तीच्या पायाखाली देणे, भर चौकात फटके मारणे, गुप्तांगाला चटके देणे किंवा फाशी देण्याच्या क्रूर व अमानुष शिक्षा पुन्हा सुरू होतील. म्हणून इंग्रजी राजवट उलथवून टाकण्याचे विचार त्यांनी सोडून दिले.

## जोती-सावित्रीचा विवाह

त्या काळात मुला-मुलींची लग्ने वयाच्या आठव्या वर्षापर्यंत उरकून टाकीत. जोतिबांचे वय तेरा वर्षे झाले. त्यांना सोयरिकी सांगून येऊ लागल्या.

अनुरूप वधूची निवड करण्याची जबाबदारी सगुणाबाई यांनी घेतली. पुणे-सातारा रस्त्यावरील शिरवळपासून पाच कि.मी. वर असलेल्या नायगाव येथील खंडोजी नेवसेपाटील यांची ज्येष्ठ कन्या सावित्रीला त्यांनी पसंती दिली. मुलगी चुणचुणीत, गोड स्वभावाची, तल्लख बुद्धीची होती. चपळ आणि रुपवान होती. तिचा जन्म ३ जानेवारी १८३२ रोजी झाला होता. लग्नाच्या वेळी सावित्रीचे वय आठ वर्षे होते. इ.स. १८४० मध्ये हा विवाह थाटामाटात पार पडला. वरातीसाठी हत्ती आणला होता. दोन्ही कुटुंबे सधन आणि तोलामोलाची होती.

## जोतिबांचे मित्र

शाळेत शिकत असताना जोतिबांना सर्व जातिधर्मांचे मित्र मिळाले. त्यांची मैत्री अखेरपर्यंत कायम राहिली. सदाशिवराव गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर, केशवराव सीताराम भवाळकर, श्री. शेख, यशवंत सखाराम परांजपे ही त्यांची मित्रमंडळी होती.

## तत्कालीन शिक्षणपद्धती

इंग्रज सरकारकडून अनुदान मिळणाऱ्या शाळांमधून पंतोजी विद्यार्थ्यांच्या मनात इंग्रज राजवटीविरुद्ध द्वेष आणि चीड निर्माण करीत. हेच पंतोजी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वर्गात प्रवेश देत नसत. त्यांना प्रवेश मिळालाच तर वर्गाबाहेर बसून शिकावे लागे. एकदा विश्रामबागवाड्यातील संस्कृत पाठशाळेत त्या वेळचे शिक्षण तपासनीस कँडीसाहेबांनी भेट दिली. ख्रिस्त्याचा बाट झाला म्हणून ब्राह्मण पंडित आणि विद्यार्थ्यांनी उदकशांती केली. काही संस्कृत पाठशाळेतून ख्रिस्ती शिक्षकही असत. त्यांचा विटाळ होत नसे. अभ्यासक्रमात मंत्र, स्तोत्र, पुराणातील भाकडकथा, अंधश्रद्धा पोसणाऱ्या रुढींची माहिती असे. हे शिक्षण ब्राह्मणांना जोशीपणा, पौरोहित्य करण्यासाठी कामाचे होते. शिक्षण फारसे जीवनोपयोगी नव्हते, हे सत्य जोतिबा फुले यांनी लक्षात घेतले. शिक्षणाचा आणि जीवनाचा संबंध जोडण्यासाठी इतिहास, भूगोल, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र या विषयांचा समावेश नव्हता.

जोतिबा फुले यांचे शिक्षण नेमके किती झाले होते, याविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही, असे सांगितले जाते; ते बरोबर नाही. त्यांच्या निकटवर्ती सहकाऱ्यांनी त्या विषयी विश्वासार्ह माहिती दिली आहे. त्यांच्या शिक्षणात

बरेच अडथळे आले होते; पण ते निवारले जाऊन इंग्रजी सातव्या इयत्तेपर्यंत त्यांचे शिक्षण झाले होते. त्या काळात जेवढे उच्च शिक्षण उपलब्ध होते, तेवढे त्यांनी घेतले. राजा राममोहन राय, कृष्णशास्त्री चिपळुणकर, लोकहितवादी यांच्याएवढे शिक्षण जोतिबांनी, इ.स. १८४७ पर्यंत घेतले. त्यानंतर त्यांनी कसलीही सरकारी नोकरी केली नाही. जगन्नाथ शंकरशेट आणि भाऊ महाजन यांनीही त्या काळात नोकऱ्या केल्या नाहीत. यांपैकी जगन्नाथशेट लक्ष्मीपुत्र होते.

जोतिबा फुले यांना उत्तम प्रकारची इंग्रजी अवगत होती. मराठी, इंग्रजीशिवाय उर्दू, कानडी, मद्रासी, गुजराथी एवढ्या भाषा येत होत्या. संस्कृत भाषेचे शिक्षणही त्यांनी घेतले होते. बहुभाषा ज्ञानाचे फायदे व्यक्तिमत्त्व विकासासाठी होतात. म्हणून त्यांनी त्यांच्या शाळेतील अभ्यासक्रमात मातृभाषा मराठी, राष्ट्रभाषा हिंदी आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारभाषा इंग्रजी असा त्रिभाषा सूत्राचा अवलंब केला.

## चौफेर वाचन

जोतिबा फुले यांचे वाचन चौफेर, चिकित्सक आणि चोखंदळ होते. धर्मशास्त्रे, तत्त्वज्ञान, विविध शास्त्रांचा त्यांनी अभ्यास केला. लोकायत, सांख्य, नाथ, शाक्त, बौद्ध, जैन या प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानांचा त्यांनी अभ्यास केला. त्याचप्रमाणे वारकरी, महानुभाव, लिंगायत, कबीरपंथ या मध्ययुगीन संप्रदायांचाही अभ्यास केला. कबीरपंथी साधू ज्ञानगिरीबाबा यांनी 'विप्रमती' हा जातिभेदांचे खंडन करणारा ग्रंथ समजावून दिला. बौद्धपरंपरेतील अश्वघोष या महापंडिताचा वर्णजातिव्यवस्थेचे खंडन करणारा 'वज्रसूची' हा ग्रंथही त्यांनी समजून घेतला. मनुस्मृतीतील विषमतासमर्थक श्लोक मॅक्समुल्लर या जर्मन पंडिताच्या आधारे समजून घेतले. वैदिक-अवैदिक, ब्राह्मण-अब्राह्मण असे भेद ब्राह्मणी ग्रंथाने केले आहेत. या परंपरांमध्ये नेहमीच संघर्ष होत राहिला आहे, असे त्यांचे ठाम मत झाले.

हॅले, होमर, डॉ. प्रिचार्ड, मीड, मॅक्समुल्लर, डार्विन यांचे ग्रंथ वाचले. छ. शिवाजीमहाराज, नेपोलियन बोनापार्ट यांची चरित्रे समजून घेतली. विद्रोही संत तुकाराममहाराज यांचे अभंग पुण्याजवळ देहू-आळंदी परिसरात उपलब्ध होते. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत या ग्रंथांचा त्यांना परिचय होता. संस्कृत ग्रंथ वाचता यावेत, असे त्यांना वाटले. दत्तकपुत्र यशवंताला शिकविण्यासाठी

पाठक नावाचे एक शिक्षक दरमहा १० रुपये वेतन देऊन नेमले होते. त्यांच्याजवळ बसून त्यांनी संस्कृत भाषेचे अध्ययन केले. कुराणशरीफ हा धर्मग्रंथ समजून घेतला होता.

बायबलचे जुना व नवा करार वाचले. ख्रिस्ती मिशनऱ्यांकडे त्यांचे नेहमी जाणे-येणे होते. धर्मविषयक चर्चा होत होत्या. शिक्षण, समाज, धर्म, सुधारणा, रूढी, शास्त्रीय दृष्टी, मानवतावाद या विषयांच्या चर्चा होत होत्या. यातूनही जोतिबांचे विचार ठाम होत गेले.

गिबन आणि ग्रँट डफ यांनी लिहिलेल्या हिंदुस्थानच्या इतिहासाचा जोतिबांवर प्रभाव पडला. पण तो जसाच्या तसा स्वीकारला नाही.

थॉमस पेन यांचे 'राईट्स ऑफ मॅन' आणि 'एज ऑफ रिझन' हे दोन्ही ग्रंथ त्या काळात वैचारिक खळबळ उडवून देणारे ठरले. ख्रिस्ती धर्मातील पोपगिरीवर थॉमस पेन यांनी झोड उठवून धर्मक्षेत्रात वादळ निर्माण केले होते. जोतिबा फुले यांच्या विचारांवर या ग्रंथांचाही प्रभाव आहे; असे मानले जाते. 'राईट्स ऑफ मॅन' या ग्रंथाला अमेरिकन स्वातंत्र्याच्या संदर्भात जॉर्ज वॉशिंग्टनच्या तरवारीएवढेच महत्त्व आहे; स्वातंत्र्य आणि मानवी हक्क जन्मत:च प्रत्येक स्त्री-पुरुषांना निसर्गत:च प्राप्त होतात. काही मतलबी माणसे ते हिरावून घेतात. इतरांना शारीरिक आणि मानसिक गुलामगिरीत टाकतात. फ्रेंच राज्यक्रांती, त्या राज्यक्रांतीची स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही चतु:सूत्री, अमेरिकन नीग्रोंचा मुक्तिलढा या विषयांचे त्यांनी विपुल वाचन केले होते. प्रो. विल्सन आणि सर विल्यम जोन्स यांनी हिंदू धर्मासंबंधी लिहिलेले ग्रंथही त्यांनी वाचले होते.

वयाच्या विसाव्या वर्षी त्यांच्या; धर्म, धर्मग्रंथ आणि धर्माचार्य यांचा, हेकटपणा व एकांगीपणा लक्षात आला. त्या वेळी त्यांची तौलनिक दृष्टी प्रगल्भ झाली होती.

हिंदू धर्म, ख्रिस्ती धर्म आणि इस्लाम धर्म यांतील समता मूल्याची त्यांनी तुलना केली. मूर्तिपूजेमुळे हिंदू धर्मामध्ये कर्मकांड, अंधश्रद्धांचे स्तोम माजले आहे; ही वस्तुस्थिती त्यांना आकलन झाली. हिंदुधर्माचार्य, ब्राह्मण हे स्वत:ला भूदेव मानतात. इतर धर्मातील पुरोहितांपेक्षा ते आपल्याच धर्मातील इतर जातींच्या लोकांशी फारच क्रूर, कपटी, निर्दयपणाने वागतात, असे त्यांनी पुन्हा पुन्हा सांगितले आहे.

## उच्चवर्णीय मित्राच्या लग्नात अपमान

महापुरूषांच्या जीवनातील काही लहान प्रसंग फार मोठा इतिहास निर्माण करतात. त्या घटना-प्रसंगांचा आघात मन, बुद्धी आणि भावना-विचारांवर होतो. त्या संस्कारातून जीवनाला मोठी कलाटणी मिळते.

इ.स. १८४८ मध्ये त्यांच्या एका ब्राह्मण मित्राचे लग्न होते. त्यांनी जोतिबांना आग्रहाचे निमंत्रण दिले. जोतिबा त्याच्या वरातीच्या मिरवणुकीतून इतरांबरोबर चालू लागला. वर्णजातिव्यवस्थेने माणसांची, नावे, आडनावे, पोशाख, गंध, भाषा यावरून जात-धर्म-वर्ण ओळखण्याची व्यवस्था केली आहे. जोतिबांना वरातीतील इतर ब्राह्मणांनी ओळखले. 'हा कोण शूद्र कुणबट!' अशी कुजबूज आपापसात सुरू झाली. एका ब्राह्मणाने अपशब्द बोलून, अपमानित करून, गचांडी देऊन त्यांना मिरवणुकीच्या बाहेर काढले. आपल्या प्रिय मित्राच्या लग्नाच्या आनंदसोहळ्यात सहभागी झालेला तरूण जोतिबा या अनपेक्षित प्रसंगाने संतप्त झाला. त्याच्या संवेदनशील मनावर मोठा आघात झाला. तो धुसफुसत घरी आला. गोविंदरावांनी कारण विचारले. त्यांनी सर्व प्रसंग सांगितला. तेव्हा गोविंदराव म्हणाले, "बरे झाले! आता पेशवाई नाही. नाहीतर या अपराधाबद्दल हत्तीच्या पायाखाली दिले असते." गोविंदरावांनी पेशवाईत स्वत: पाहिलेले आणि ऐकलेले प्रसंग सांगितले. अशा अपराधासाठी हत्तीच्या पायी देणे, तरवारीने डोके उडवून चेंडूप्रमाणे खेळणे, कपाळावर किंवा गुप्तांगांना डाग देणे अशा क्रूर आणि अमानुष शिक्षा वेगवेगळ्या कारणासाठी देत असत. जोतिबांना वाटले, 'अरे, हे भट दारोदार जाऊन भीक मागतात. आमच्या काबाडकष्टांवर यांचे विलासी जीवन सुरळीत आहे. यांची शेंबडी पोरेही आपल्या अन्नदात्या वयोवृद्धांन 'अरे, का रे' असे उद्धटपणाने एकेरी बोलतात. उलट इंग्रज हे परके आहेत, सत्ताधारी आहेत, विद्वान आहेत, ज्ञानी आहेत; तरीही ते न्यायप्रिय, समदृष्टीचे आहेत. त्यांचा उदारमतवाद, मानवतावाद, सुसंस्कृतपणा, सेवाभाव, नि:पक्षपातीपणा हे सद्‌गुण लक्षणीय आहेत. त्यांचे धर्माचे आणि राज्यसत्तेचे कायदे सर्वांना समान मानणारे आहेत. ब्राह्मण कितीही उदार झाला तरी तो आपल्या जातीच्या स्वार्थाचा विचार करण्याची वेळ आली की जातिवादी होतो; याबाबत त्यांना अनेक अनुभव आले होते. या लग्नप्रसंगाच्या अपमानाने त्यांनी उच्च-नीच भेदभावाला, वर्णजातिअहंकाराला, विषमतेला नष्ट करावयाचे, असा निर्धार केला. त्यासाठी कोणता मार्ग निवडावा, कार्याचा प्रारंभ कुठून, कसा करावा, असा विचार सुरू केला.

'इच्छा तिथे मार्ग' म्हणतात, त्याप्रमाणे त्यांना नेमका, समर्पक मार्गही सापडला.

## ध्येय निश्चित झाले !

वयाच्या विसाव्या वर्षी जोतिबा फुले यांनी जीवनध्येय निश्चित केले. वर्णजातिस्त्रीदास्य व्यवस्था नष्ट करावयाची असेल, स्त्री-शूद्रातिशूद्रांना दुःखमुक्त करावयाचे असेल; तर त्यांना विद्या शिकविली पाहिजे. ब्राह्मणी व्यवस्थेचे समर्थन करणारे धर्मग्रंथ, पोथ्यापुराणे, स्मृती, वैदिक धर्मसूत्रे आणि पवित्र मानलेले सर्व ग्रंथ वाचता आले पाहिजेत. हजारो वर्षांपासून या व्यवस्थेने सामान्य स्त्री-पुरुषांना ज्ञानापासून दूर ठेवले. रोटी-बेटी-भेटी बंदी जाहीर करून ती कडक अमलात आणली. 'भौतिक सुखांचा त्याग करावा', असा उपदेश करावा. भौतिक सुखांमुळे परमेश्वर प्राप्ती होत नाही, म्हणून त्यांनी कष्टातून निर्माण केलेली संपत्ती, ऐश्वर्य, वैभव ब्राह्मणांना दान करावे. स्त्री; परमार्थमार्गातील अडसर आहे. ब्राह्मण हेच सर्व सुखांचे धनी आहेत. ते भूदेव असल्यामुळे त्यांचाच सर्वत्र अधिकार आहे. ते इतरांकडून दान स्वीकारतात म्हणजे ते उपकारच करतात. जन्म-मरणाचे चौऱ्यांशी लक्ष फेरे चुकविण्यासाठी, मोक्ष मिळविण्यासाठी भूदेवांची सेवा करावी. त्यांच्या पायाचे तीर्थ घेतले म्हणजे पुण्य मिळते.' पूर्वजन्म, पुनर्जन्म, स्वर्ग, नरक, पाप, पुण्य, दैव, तीर्थक्षेत्रे, कर्मकांड, पूजाविधी, दानदक्षिणा, ग्रहनक्षत्रे, मुहूर्त या गोष्टींचे स्तोम माजले होते. तेराव्या शतकात हेमाद्री पंडिताने 'चतुर्वर्गचिंतामणी' नावाचा ग्रंथ लिहून त्यामध्ये जवळपास चार हजार व्रतांची माहिती दिली आहे. शिवाय देव-देवतेचे, तीर्थ-क्षेत्रांचे माहात्म्य, स्तोत्र, सत्यनारायण, जप, अनुष्ठान यांचेही प्रस्थ होते. कष्ट करणारा वर्ग, या कर्मकांडाच्या आणि खर्चाच्या चरखात भरडत होता. त्यांच्या कष्टातून निर्माण झालेल्या संपत्तीची लूट धर्माच्या नावाखाली होत होती. त्यांच्या कष्टावर सुखात राहणारा पुरोहितवर्ग मात्र त्यांच्याविषयी कृतज्ञता, उपकृतता, आदर, सन्मान या भावनाही मनात ठेवीत नव्हता. उलट त्यांचा अवमान, हेटाळणी, तिरस्कार केला जात होता. सर्व जगात उपकारकर्त्याविषयी एवढी कृतघ्न बुद्धी फक्त हिंदू धर्माच्या पुरोहितवर्गाकडेच दिसत होती.

स्त्री-शूद्रातिशूद्रांना या शोषणातून बाहेर काढावयाचे असेल तर विद्येचा प्रसार केला पाहिजे.

विद्येविना मति गेली। मतिविना नीति गेली॥
नीतिविना गति गेली। गतिविना वित्त गेले॥
वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले॥

येथील सर्वसामान्य स्त्री-पुरुषांच्या दुःखाची चिकित्सा करून, बिनचूक रोगनिदान करून, योग्य उपाययोजना सुचविली. कष्टकऱ्यांच्या संपत्तीचे हरण, ऐतखाऊ करतात. त्यांना पुण्य, स्वर्गसुखाची लालूच दाखवितात. मती आणि नीती भ्रष्ट झाल्यामुळे जीवनाची, विकासाची गती थांबली. त्यामुळे संपत्तीचे हरण ऐतखाऊंनी केले. मती, नीती, गती, वित्त एवढी संपत्ती लुटली गेल्यामुळे सर्व शूद्र खचून गेले. त्यांनाच विद्या शिकविण्याचा निर्णय झाला.

नीतिधर्माचा पुरस्कार करणारी मंडळी, सामाजिक आणि वैयक्तिक जीवनात अनैतिक आचरण करीत होती. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या:' हा अध्यात्मवादी, मायावादी सिद्धान्त लोकांची मनबुद्धी बधीर करीत होता. अध्यात्माची गुंगी देऊन स्वतःला हवी ती सुखे मिळविता येत होती. भूदेवांना प्रसन्न ठेवा, त्यांचा कोप तुमच्या आणि सृष्टीच्या विनाशाला कारणीभूत होऊ शकतो.

*"उत्पत्तीरेव विप्रस्य मूर्तिधर्मस्य शाश्वती।*
*स हि धर्मार्थमुत्पन्नो ब्रह्मभुयाय कल्पते॥ (मनु. १.९८)*

*ब्राह्मणो जायमानो हि पृथिव्यामधिजायते।*
*ईश्वरः सर्वभूतानां धर्मकोशस्य गुप्तये॥ (मनु. १.९९)*

*सर्वस्वं ब्राह्मणस्येदं यत्किंचिज्जगतीगतम्।*
*श्रैष्ठ्येनाभिजनेनेदं सर्वं वै ब्राह्मणोऽर्हती॥ (मनु. १.१००)*

*स्वमेव ब्राह्मणो भङ्क्ते स्वं वस्ते स्वं ददाति च।*
*आनृशंस्यादब्राह्मणस्य भुञ्जते हीतरे जनाः॥ (मनु. १.१०१)*

जोतिबांच्या घरात सुधारणा, क्रांतिकारी विचार, शिक्षण यांपैकी कशाचीही पूर्वपरंपरा नव्हती. तरीही त्यांना एवढे मूलभूत विचार कसे सुचले. १) अंतःप्रेरणा, २) भारतीय पूर्वसूरींचे विचार, कार्य आणि ग्रंथावलोकन, ३) प्रत्यक्ष अनुभव आणि ४) समकालीन ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कार्यातून प्रेरणा; ही कारणे काही प्रमाणात आहेत. कोणताही मठ-पीठ, कोणत्याही गुरूचा मंत्र, आशीर्वाद, कृपाप्रसाद यामुळे नव्या युगधर्माला गतिमान करणारे कार्य घडले नाही. सत्यशोधन, बुद्धिवाद, सद्विवेक यांना प्राधान्य दिले. शाळा काढावयाची, तीही पहिली शाळा मुलींसाठी, राष्ट्रमातांसाठी असेल. त्यामध्ये अस्पृश्य

जातींच्या मुली असाव्यात. या शाळांमध्ये सर्व धर्म, वर्ण, जातींची मुले-मुली असतील. वर्णजातिग्रस्त मानसिकतेतून मुक्त होण्यासाठी समता मूल्याचा पुरस्कार करणारे शिक्षण द्यावे; हे जीवनध्येय निश्चित केले.

## संस्थाचालक जोतिबा फुले : विद्या प्रसाराचे व्रत

आधुनिक महाराष्ट्रात शिक्षण प्रसार करण्यात खाजगी शिक्षणसंस्थांचा फार मोठा वाटा आहे. जोतिबा फुले यांनी या कार्याचा प्रारंभ केला. नैतिक शिक्षण, मूल्यशिक्षण, व्यवसायाभिमुख शिक्षण या संकल्पना त्यांनी त्या काळात मांडल्या, अमलात आणल्या. स्वत:चे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर इ.स. १८४८ मध्ये पुणे येथे बुधवारपेठेतील भिडेवाड्यात मुलींची या देशातील एतद्देशीयाने काढलेली राष्ट्रमातांसाठीची ही पहिली शाळा होती.

इ.स. १८४८ हे वर्ष जागतिक पातळीवर महत्त्वाचे वर्ष ठरले आहे. भारतामध्ये जोतिबांनी राष्ट्रमातांची शाळा काढली. रशियामध्ये कार्ल मार्क्स यांचा 'साम्यवादी जाहीरनामा' प्रसिद्ध झाला. अमेरिकेमध्ये स्त्रीमुक्ती चळवळ सुरू झाली होती. संपूर्ण जगावर या तिन्ही घटनांनी दीर्घकाळ प्रभाव गाजविला. समाजकारण, राजकारण, धर्मकारणाचा पुनर्विचार सुरू झाला.

मुलींसाठी शाळेची स्थापना करण्याची घटना ज्ञात इतिहासात, हजारो वर्षांत या देशात पहिल्यांदा घडली. प्राचीन काळात स्त्री शिक्षण पद्धती अस्तित्वात होती, असे मानले जाते. पण मुलींसाठी शाळा होत्या, असे स्पष्ट उल्लेख नाहीत. राजकन्या, प्रधानकन्या, ऋषिकन्या यांना शिक्षण घेण्याची संधी होती. सर्व वर्णजातींतील मुलींना शिक्षण घेण्याची संधी जोतिबा फुले यांनी पहिल्यांदा उपलब्ध करून दिली.

ज्यांच्यासाठी शाळा काढली, त्या मुलींचे आईबाप रूढीग्रस्त होते. अंधश्रद्ध आणि भोळे होते. त्यांनीच या शाळेला विरोध केला. सनातन्यांनी याविरुद्ध मनमानी अपप्रचार सुरू केला. मुली शिकल्या तर कुळाला बट्टा लागेल. धर्म बुडेल. सात पिढ्या नरकात जातील. स्त्रिया शिकल्या तर त्या चंचल, अविश्वासू, घातकी आणि स्वैराचारी होतील. त्यांनी लहानपणी वडिलांच्या, तरुणपणी पतीच्या आणि म्हातारपणी मुलांच्या आधीन राहावे, त्यांनी स्वतंत्रपणे कधीही जगू नये, अशी मनुस्मृतीची आज्ञा आहे. स्त्रिया अविश्वासू, खोटारड्या असतात. उपभोग्य, प्रदर्शनीय आणि संरक्षणीय असतात. ढोल, ताशे, नगारे याप्रमाणे त्यांना बडवावे; असेही मनुस्मृती सांगते.

मुली शिकू लागल्या, अक्षरे लिहू लागल्या तर त्या अक्षरांच्या अळ्या बनून घरातील पुरूष जेवताना त्यांच्या ताटात येतात. शिकणाऱ्या विवाहित मुली लवकर विधवा होतात किंवा विवाह झाल्याबरोबर त्यांना वैधव्य प्राप्त होते. शिक्षण आणि मुलीच्या पतीच्या आयुष्याचा असा संबंध जोडून सनातन्यांनी मुलींच्या शिक्षणाबद्दल दहशत निर्माण केली होती. जोतिबांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष धमक्या दिल्या. या कार्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण ते आपल्या निर्धारापासून तीळभरही ढळले नाहीत.

## गृह त्यागाचा प्रसंग

जोतिबा स्त्री शिक्षणाचे कार्य बंद करीत नाहीत, हे पाहून सनातनी जास्तच खवळले. त्यांनी शूद्रातिशूद्र जातींमध्ये जोतिबांच्या विरोधात अपप्रचार सुरू केला. स्वकीयांचा आणि स्वजातीचा विरोध वाढू लागला. गोविंदराव फुले यांना भेटून 'जोतिबाला आणि त्याच्या बायकोला घराबाहेर हाकलून दे, नाहीतर तुला जातिबहिष्कृत करू', असे ठणकावून सांगितले. गोविंदरावांनी जोतिबांचे मन वळविण्याचा खूप प्रयत्न केला. पण हे कार्य नवे युग, नवे पर्व घडविणारे आहे, हे जोतिबांना पक्के ठाऊक होते. त्यांनी कार्य सुरू ठेवण्याचा निर्धार नम्रपणाने वडिलांजवळ बोलून दाखविला. गोविंदरावांनी, घर सोडून जाण्याची आज्ञा जड आणि दु:खी अंत:करणाने दिली. दोघांच्याही मनात भावसंघर्ष आणि विचारसंघर्ष सुरू झाला. शेवटी वडिलांची समज घालून ते सावित्रीबाईंसह घराबाहेर पडले.

त्यांना त्यांचे मित्र श्री. शेख यांनी आश्रय दिला.

## मुलींच्या शाळेवर शिक्षिकाच पाहिजे

मुलींच्या शाळेचे सर्व विरोधक, विरोधाची अनेक कारणे पुढे करीत होती. लंगड्या सबबी सांगत होते. युक्तिवाद करीत होते. त्यांचा खोटेपणा उघड झाला की, आणखी नवी कारणे पुढे करीत होते. त्यातील एक कारण होते; मुलींना शिकविण्यासाठी शिक्षिका नाही. त्यांना ख्रिस्ती शिक्षिका चालणार नव्हती. त्या काळात मिशनरी शाळांमधून ब़ायबल शिकवीत असत. त्यातून काही धर्मांतराची प्रकरणे निर्माण झाली आणि त्यांनी खळबळ उडवून दिली. त्या काळात हिंदू स्त्रिया शिकू शकत नव्हत्या. शिक्षण घेण्याची परवानगी धर्म आणि समाज देत नव्हता. म्हणूनच जोतिबांनी या समाजविघातक धर्माज्ञेला

आणि सामाजिक रुढीलाच आव्हान दिले. ख्रिस्ती शिक्षिका असेल तर पालक मुलींना शाळेत पाठवीत नव्हते. मुलींना पुरुषांनी शिकविणे म्हणजे अधर्मच! तरीही प्रचार, प्रसार, जागृती यामुळे मंडळींनी सहकार्य देण्याचे मान्य केले. गोपाळबाबा वलंगकर, राणबा महार, लहुजी साळवे यांनी अस्पृश्यांमध्ये जागृती करण्यासाठी जोतिबांना मदत केली. शिक्षिका नाही म्हणून विद्यार्थिनी नाहीत आणि विद्यार्थिनी मिळत नाहीत म्हणून शिक्षिका तयार होत नाही, या दुष्ट चक्रावर मात करण्याचा विचार सुरू झाला.

## अडचणींवर मात, सावित्रीबाईंची साथ

सावित्रीबाई यांना अडचण कळली. त्यांनी स्वत: शिक्षण घेऊन शिक्षिका होण्याची तयारी दाखविली. जोतिबांनी त्यांना काही दिवस घरीच शिकविले. पुढील शिक्षणाची जबाबदारी जोतिबांचे मित्र केशवराव शिवराम भवाळकर-जोशी आणि यशवंत परांजपे यांच्यावर सोपविली. तो अभ्यासक्रम संपल्यानंतर त्यांनी अहमदनगर येथे जाऊन मिसेस फरार आणि पुणे येथे मिसेस मिचेल यांच्या नॉर्मल स्कूलमध्ये अध्यापनाचे प्रशिक्षण पूर्ण केले. या देशातील त्या पहिल्या प्रशिक्षित अध्यापिका आणि मुख्याध्यापिका; तर त्यांच्या मैत्रीण फातिमा शेख या पहिल्या मुस्लीम प्रशिक्षित अध्यापिका आणि मुख्याध्यापिका होत.

## कंबर कसून पुन्हा कार्यारंभ

जोतिबा फुले यांनी मुलींच्या शाळा काढण्याची जिद्द सोडली नाही. शिक्षणातूनच परिवर्तन येईल. क्रांती घडेल या विषयी त्यांची पक्की खात्री होती. ते आपले वर्गमित्र, समविचारी मित्र यांच्याशी विचारविनिमय करीत होते. निरक्षर आईबापांना अविद्येचे तोटे समजावून सांगत होते. शाळा कुठे भरवावयाच्या? शिक्षक कोण? किती? या सर्व आवश्यक बाबींची पूर्तता केली आणि ३ जुलै १८५१ रोजी अण्णासाहेब चिपळूणकरवाडा; १७ नोव्हेंबर १८५१ रोजी रास्तापेठ आणि १५ मार्च १८५२ रोजी वेताळपेठ येथे मुलींसाठी तीन शाळा सुरू केल्या. त्यामध्ये अनुक्रमे ४, ३ व १ एवढे शिक्षक आणि ४८, ५१ व ३३ विद्यार्थिनींची संख्या होती. चिपळूणकरवाड्यातील शाळेवर सावित्रीबाई फुले या मुख्याध्यापिका होत्या. या शाळेच्या पटावर पहिल्यादिवशी फक्त ८ मुली होत्या. ही संख्या पुढे ४८वर गेली.

## आधुनिक सावित्री

सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्या. एक शूद्र स्त्री विद्या देण्याचे कार्य करते! धर्म बुडाला. कलियुग आले. आता सृष्टीचा विनाश होणार! हा अधर्म, हे पाखंड बंद केले पाहिजे. स्त्री दाक्षिण्याचा पुरस्कार करणारे, संस्कृती संरक्षणाची, धर्माचरणाची हमी पत्करलेले सनातनी; त्यांना शाळेच्या रस्त्यावर त्रास देऊ लागले. हे टारगट टोळभैरव कुत्सित आणि अभद्र टोमणे मारीत; खडे, चिखल, शेण अंगावर फेकीत. पान-तंबाखू खाऊन अंगावर थुंकण्यापर्यंत मजल गेली. सावित्रीबाई संयमी आणि सहनशील होत्या. "मी तुमच्या बहिणींना शिकवीत आहे; त्यामुळे तुम्ही माझ्यावर फुले उधळीत आहात, असे मी समजते." असे म्हणीत असत. एका टारगटाने त्यांच्या पुढे जाऊन त्यांना अडविले. सावित्रीबाईंनी हिंमत आणि बळ एकवटून त्याच्या थोबाडीत मारली. तो लटपटत बाजूला झाला. अनपेक्षित प्रसंगाने गांगरला आणि भररस्त्यामध्ये अपमानित होऊन खाली मान घालून निघून गेला. त्यानंतर या वाघिणीपुढे कोणीही आले नाही. त्यांच्यासाठी पुन्हा अंगरक्षकाची नेमणूक केली.

या काळात सावित्रीबाईंची एक साडी शाळेतच असे. अंगावरची साडी रस्त्यावरील धूळ, चिखल, शेणाने भरलेली असे. ती साडी बदलून त्या वर्गावर जात असत. आज स्त्री शिक्षणाचा एवढा प्रसार झाला आहे, याचे सर्व श्रेय जोतिबा-सावित्रीबाई यांना आहे. स्त्री ही गृहलक्ष्मी, गृहदेवता असते, असे सांगणारे स्त्रियांशी स्त्री म्हणून किती अमानुष, अपमानास्पद वागत होते, त्याचा हा पुरावा आहे. वैदिक संस्कृतीच्या दुटप्पीपणाचे हे ठळक वैशिष्ट्य आहे.

## मुलींच्या परीक्षा

जोतिबा-सावित्रीबाई यांनी शिक्षणातून परिवर्तन घडवून आणण्याचा ध्यास घेतला. मुलींना त्या काळात उत्तम दर्जाचे शिक्षण दिले. औपचारिक शिक्षणाचे यश परीक्षा घेऊनच ठरविले जाते. त्या वेळचे शाळांचे अधिक्षक दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी १२ फेब्रुवारी १८५३ रोजी मुलींची परीक्षा घेतली. २३७ मुलींची परीक्षा पुना कॉलेज येथे झाली. परीक्षा कशा असतात, हे पाहण्यासाठी ३,००० लोक जमले होते. तेथे मोठा मंडप घातला होता. मंडपाबाहेर आणि रस्त्यावरही फार मोठी गर्दी होती. एवढा मोठा जनसमूह

त्यापूर्वी पुणे शहरात कधीही जमला नव्हता. या शाळांचा खर्च जोतिबा-सावित्रीबाई स्वत: करीत होते. त्यांचे मित्र, चाहते, ख्रिस्ती मिशनरीही खर्चासाठी मदत करीत होते. दक्षिणा प्राईझ समितीकडून २५ रु. मिळत होते. परीक्षेतील मुलींच्या यशानंतर त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल इंग्रज सरकारने घेतली. समाजमान्यता मिळू लागली. त्यांच्या कार्याचा लौकिक वाढला. शिक्षणाची आवड व महत्त्व वाढू लागले.

## शिक्षण संस्थांचा पाया

१९व्या शतकात ब्राह्मणांशिवाय इतरांना शिक्षण घेण्याची बंदी होती. त्यामुळे ब्राह्मणांशिवाय सर्व समाज निरक्षर होता. 'सर्वांसाठी शिक्षण' हे धोरण अमलात आणण्याचे काम एकट्या-दुकट्याचे नाही. शिक्षणाला चळवळीचे स्वरूप प्राप्त व्हावे; संस्थात्मक पायाभरणी करावी; हे कार्य जीवनदानी, त्यागी वृत्तीने व्हावे; निष्ठेने पार पडावे यासाठी मुलांच्या, मुलींच्या, अस्पृश्यांच्या शाळांसाठी त्यांनी स्वतंत्र संस्था निर्माण केल्या. सरकारकडे त्यांची नोंदणी केली.

'नेटिव्ह फिमेल स्कूल, पुणे' या संस्थेमध्ये १) सदाशिव बल्लाळ गोवंडे, २) मोरो विठ्ठल वाळवेकर, ३) केशवराव सीताराम भवाळकर-जोशी, ४) सखाराम यशवंत परांजपे, ५) जोतीराव गोविंदराव फुले, ६) विष्णू मोरेश्वर भिडे, ७) बापू रावजी मांडे, ८) बाबाजी मनाजी डेंगळे आणि ९) जगन्नाथ सदाशिवजी यांचा समावेश होता.

'दि सोसायटी फॉर प्रमोटिंग दी एज्युकेशन ऑफ महार्स; मांग्ज अँड एक्सेट्राज' या संस्थेमध्ये १) सदाशिवराव बल्लाळ गोवंडे, २) जोतीराव गोविंदराव फुले, ३) मोरो विठ्ठल वाळवेकर, ४) सखाराम यशवंत परांजपे, ५) वामन प्रभाकर सहस्रबुद्धे, ६) देवराव कृष्णाजी, ७) बाबाजी गुणाजी नवरंगे, ८) विनायक बापूजी, ९) बाळाजी महादेव आणि १०) वामन गोपाळ यांची नियुक्ती केली होती. या समितीतील पहिले चौघेजण मित्र होते. त्यांची शेवटपर्यंत मैत्री टिकली. ते मुलींच्या शाळेच्या समितीवरही होते.

कार्य अखंडपणे आणि सातत्याने व्हावे, कार्याचा विस्तार व्हावा; गुणात्मक आणि संख्यात्मक विकास व्हावा, यासाठी संस्थेला महत्त्व असते. व्यक्तीपेक्षा संस्था मोठी असते. संस्थेचे आयुष्य दीर्घ असते. व्यक्ती येतात आणि जातात. संस्था कायमस्वरूपी असते. व्यक्तीकडून प्रमाद घडू शकतात.

संस्थेमध्ये सामुदायिक निर्णय होतात, म्हणून प्रमाद टाळता येतात. या महत्त्वाच्या कार्यामध्ये जोतिबा फुले यांनी उच्चवर्णीय मित्रांना घेतले. ब्राह्मणांच्या विरोधाला उत्तर देण्यासाठी त्यांनी हेतुत: त्यांना घेतले असावे. यामुळे सर्व वर्ण-जातीतील मुली-मुले शाळेत येऊ लागली. वर्ण-जात जाणिवेचे विसर्जन केलेले ब्राह्मण, जोतिबा फुले यांच्याबरोबर राहिले. त्यामध्ये अनुचित असे काहीही नव्हते.

## शाळेतील अभ्यासक्रम

जोतिबांनी शाळा काढून शिक्षण देण्याचा, या देशात प्राचीन काळापासून आतापर्यंत कधीही, कोणीही न केलेला उपक्रम केला होता. ख्रिस्ती धर्मोपदशेकांच्या शाळा होत्या. त्या शाळेतील अभ्यासक्रम सर्वस्वी उपयोगाचा नव्हता. ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणे, हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. तर ब्राह्मण पंतोजीच्या गावठी, खाजगी शाळेत अक्षर ओळख, गणित, थोडेसे पाठांतर आणि दंतकथा शिकविल्या जात असत. संस्कृत मंत्र, स्तोत्रांचे पाठांतर म्हणजे विद्या, अशी चुकीची समजूत रुजलेली होती. नऊ खंड पृथ्वी आहे. काशी हा दहावा खंड आहे. हिमालयातून स्वर्गात जाण्यासाठी वाट आहे. ती फक्त पुण्यवान मनुष्याला दिसते. लंका ही सोन्याची आहे. तिच्याभोवती आजही सुदर्शन चक्र फिरत असते. तेथे कोणालाही जाता येत नाही; हे ज्ञान त्या काळातील भूगोलाचे होते. इतिहास म्हणून अवतार कल्पना, आश्रम-जाती-वर्णव्यवस्था, देव-असुर यांच्या युद्धाच्या काल्पनिक कथा शिकवीत असत. गंगा नदी ओलांडून जाऊ नये, समुद्रपर्यटन करू नये. ते महापाप असते, असले नैतिक शिक्षण होते. पर्यटक व्यापारी इंग्रज येथे येऊन राज्य करू लागले, तरी पंतोजी वरीलप्रमाणे शिक्षण देत होते. अंजन, परीस मिळविण्यासाठी, कामधेनू, कल्पवृक्षाच्या शोधासाठी काही लोक आपले सर्व आयुष्य आणि धन वाया घालवीत होते. अशा निरर्थक, खुळचट आणि विपरीत विद्याविषयक कल्पनेवर लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी इ.स. १८४८ मध्ये 'प्रभाकर' या साप्ताहिकातून शतपत्रे लिहून झोड उठविली. त्यांची भाषा जोतिबा फुले यांच्यापेक्षा तिखट, परखड आणि सनातन्यांना झोंबणारी आहे.

या काळात युरोप खंडात राजकीय, औद्योगिक क्रांत्या होत होत्या. वाफेवर चालणारी इंजिने, यंत्रे, प्रगत अवजारे, शस्त्रास्त्रे यांचे शोध लागले होते. व्यापार वाढत होता. युरोप खंडातील व्यापारी; जगात बाजारपेठ निर्माण करीत होते. त्यासाठी राज्य विस्तार करीत होते. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना

भाषा, व्याकरण, गणित, इतिहास, भूगोल या विषयांचे ज्ञान मिळावे, त्या बरोबरच भौतिकशास्त्र, रसायनशास्त्राचेही अद्ययावत ज्ञान आवश्यक आहे. सृष्ट्य पदार्थांचे अवस्थांतर, रासायनिक प्रक्रिया करून, मानवी सुखांची साधने तयार होतात. त्याचा अनुभव घेणारे सनातनी, मात्र मंत्रांमध्ये सर्व शक्ती आहे; मंत्रसामर्थ्याने सर्व काही प्राप्त होते, असेच सांगत होते. इंग्लंड हा अत्यंत चिमुकला देश सर्व जगावर मंत्र बळावर राज्य करीत नाही; तर आधुनिक ज्ञान विज्ञानाच्या आधारे तो बलवान झाला आहे, हे वास्तवही सनातनी मंडळी समजून घेत नव्हती. भेदाभेद, विषमता, उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य, सोवळे-ओवळे, पवित्र-अपवित्र यांचे स्तोम माजविले. वर्णजातिसंघर्षाला पेटते ठेवले.

या सर्व पार्श्वभूमीवर जोतिबा फुले यांनी भाषा, व्याकरण, गणित, इतिहास, भूगोल, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, त्या काळात उपलब्ध असलेले कृषिविज्ञान इत्यादी विषयांचा अभ्यासक्रमात समावेश असावा, असा प्रयत्न केला.

मुला-मुलींचे ज्ञान वाढावे, स्वयंअध्ययनाचा विकास व्हावा, या देशातील वर्ण-जातिसंघर्षाचे ज्ञान व्हावे, शेतीज्ञानाचा विकास व्हावा, यासाठी निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा घेतल्या.

कोणत्याही देशातील शिक्षणपद्धती तिच्या अभ्यासक्रमामुळे श्रेष्ठ ठरत असते. मूलगामी, व्यवसायाभिमुख, नैतिक शिक्षणावर जोतिबा फुले यांनी भर दिला. या अभ्यासक्रमातून समाज, राज्य, शिक्षण, अर्थ, प्रशासन, संशोधन, संस्कृती आणि कला या क्षेत्रांना नेतृत्त्व प्राप्त होत असते.

## शिक्षक जोतिबा फुले

जोतिबा फुले हे यशस्वी शिक्षक होते. त्यांनी अभ्यासक्रम तयार केला. अभ्यासपूरक उपक्रम तयार केले आणि राबविले. स्वत: विनावेतन शिक्षकाचे काम केले. शाळेच्या वेळेशिवाय आपल्या सहकारी मित्रांसह पालकांना भेटत होते. शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत होते. जे, शिक्षण कार्याला विरोध करीत होते, त्या सनातन्यांच्या मुलीही शाळेत येऊन शिकू लागल्या. त्यांच्या शाळेतील मुक्ता साळवे नावाच्या १४ वर्षांच्या मातंग समाजातील मुलीने निबंध लिहिला होता. त्यामध्ये ती म्हणते, "ब्राह्मण लोक असे म्हणतात की, वेद तर आमचीच मत्ता आहे. आम्हीच त्याचे अवलोकन करावे. तर यावरून उघड दिसते की, आम्हास धर्म पुस्तक नाही. जर वेद ब्राह्मणांसाठी आहेत तर वेदाप्रमाणे वर्तन करणे, हा ब्राह्मणांचा धर्म होय. जर आम्हास धर्मासंबंधी

पुस्तक पाहण्याची मोकळीक नाही, तर आम्ही धर्मरहित आहो, असे साफ दिसते की नाही बरे? तर हे भगवान, तुजकडून आलेला कोणता धर्म तो आम्हास कळीव, म्हणजे आम्ही सर्व त्याचा सारिख्या रीतीने अनुभव घेऊ.

"इमारतीच्या पायात आम्हास तेलशेंदूर पाजून पुरण्याचा व आमचा निर्वंश करण्याचा क्रम चालविला होता. त्या समयी महार अथवा मांग यांपैकी कोणी तालीमखान्यापुढून गेला असता गुलटेकडीच्या मैदानात त्याच्या शिराचा चेंडू व तलवारीचा दांडू करून खेळत होते. अशी जर सोवळ्या राजाच्या दारावरून जाण्याची बंदी, तर विद्या शिकण्याची मोकळीक कोठून मिळणार?"

हा निबंध तेव्हा फारच गाजला. विद्यार्थ्यांना अक्षरओळख, गणित याशिवाय जीवनविषयक मूलभूत दृष्टिकोन शिकवण्यावर त्यांचा भर होता. तो निबंध 'ज्ञानोदय' या वर्तमानपत्राने १५.२.१८५५च्या अंकात प्रकाशित केला. नंतर ना. वि. जोशी यांनी 'पुणेवर्णन' या त्यांच्या ग्रंथामध्ये समाविष्ट केला. विद्यार्थ्यांनी चौफेर वाचन करावे, चिंतन करावे, त्यांची आकलन आणि अभिव्यक्तिक्षमता विकसित व्हावी, यासाठी स्पर्धांचे आयोजन करून जाहीर बक्षीस समारंभ होत असे. प्रस्थापित समाजव्यवस्थेची स्वतंत्र चिकित्सा करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होत होती. विद्यार्थ्यांमध्ये कलागुण आणि सौंदर्यदृष्टी वाढावी, यासाठीही ते प्रयत्न करीत.

लोकशिक्षक आणि समाजशिक्षक ही भूमिकाही जोतिबा फुले यांनी यशस्वी रीतीने पार पाडली. जोतिबा-सावित्रीबाई हे विद्यार्थीप्रिय शिक्षक होते. ते मुलांना गोष्टी सांगत. खाऊ वाटीत. पाट्या, लेखणी, पुस्तके, कपडे देत. मुलांशी, आंजारून-गोंजारून बोलत. मुला-मुलींना वाटावयाच्या वस्तूंचा साठाच त्यांच्याकडे असायचा. शिक्षणावरील खर्चासाठी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड मदत करीत होते.

त्यांनी सुरू केलेल्या शैक्षणिक कार्याला पुणे आणि परिसरातून वाढता प्रतिसाद मिळत होता. त्या कार्याची स्तुती होऊ लागली. पुणे, हडपसर, जुन्नर, ओतूर, ठाणे, कल्याण, मुंबई येथील मित्र आणि सहकारी यांनाही आपली मुले पुणे येथे शिक्षणासाठी पाठवावी असे वाटू लागले. मुलांच्या सोयीसाठी एक बोर्डिंग काढावे, असा आग्रह त्यांनी केला. 'सुशिक्षणगृह' या नावाचे बोर्डिंग त्यांनी काढले. तेथील मुलांची काळजी सावित्रीबाई घेत होत्या. व्यवस्थापनाचे काम तरूण कृष्णराव भालेकर पाहत होते. या बोर्डिंगमध्ये २५-३० विद्यार्थी राहत होते. यांपैकी फक्त श्रीमंत मुलांकडून शुल्क मिळत

होते. गरीब मुले नि:शुल्क राहत असत. हुशार आणि गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची पद्धतही त्यांनी सुरू केली. त्यांच्यानंतर कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहूमहाराज आणि सातारा येथील शिक्षणमहर्षी आणि सत्यशोधक समाजाचे तडफदार नेते कर्मवीर भाऊराव पाटील यांनी या चळवळीचा विकास केला. विदर्भामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख या सत्यशोधक नेत्याने हे कार्य पुढे चालविले. गरज आणि अनुभव यांतून उपक्रम सुचत गेले. ते त्यांनी प्रभावीपणे राबविले. शिक्षण क्षेत्रामध्ये १९व्या शतकातच या प्रमाणे सत्यशोधकांनी महत्त्वाचे पायंडे निर्माण केले. ग्रंथालयाची मागणी विद्यार्थ्यांनी केली. त्याप्रमाणे शाळेला समृद्ध ग्रंथालयाची जोड दिली. या प्रमाणे एक शिक्षक, संस्थाचालक वसतिगृह-ग्रंथालय चळवळीचे जनक, शिष्यवृत्ती देण्याची प्रथा सुरू करणारे महापुरुष, शिक्षणतज्ज्ञ या नात्याने त्यांचा आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीवर फार मोठा प्रभाव पडला आहे. सत्यशोधक चळवळ आणि नव महाराष्ट्र यांचे परस्पर संबंध; अटळ आणि घनिष्ठ आहेत.

## कालपरिस्थितीशी शिक्षणाचे समायोजन

शिक्षण आणि सामाजिक गरजा यांचा परस्पर संबंध फारच महत्त्वाचा असतो, हे त्या काळात जोतिबा फुले यांनी ओळखले. समाजाच्या आर्थिक गरजा असतात, राहणीमानाचे सामाजिक दर्जाचे प्रश्न असतात, त्याचप्रमाणे बौद्धिक ज्ञानाच्या गरजा, मनाची, भावनेची सांस्कृतिक भूक असते. या गरजा लक्षात घेऊन, त्यांची पूर्तता करण्याची जबाबदारी त्या त्या काळातील नेतृत्त्वाची असते. लोकांच्या आकांक्षा, लोकभावना समजावून घेऊन त्यांची पूर्तता करण्याची क्षमता शिक्षणातून निर्माण होते. प्रचलित समाजव्यवस्था, शासनसंस्था, दंडसत्ता, न्यायपद्धती समजावून घेण्याची क्षमता शिक्षणातून येते. शोषक आणि शोषित कोण आहेत, शोषणाची हत्यारे कोणती आहेत, याचे आकलन शिक्षणातून होते.

शिक्षणातून विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन तयार व्हावा, सदसद्‌विवेक वाढावा, उपलब्ध ज्ञान-विज्ञान आणि मनुष्यबळ यांची सांगड घालावी, सभोवतालची उपलब्ध साधन्‌सामुग्री आणि उत्पादनक्षमता यांचा मेळ घालावा, असे जोतिबा फुले यांना वाटत होते. शिक्षणाकडे त्या काळात त्यांनी फार गांभीर्याने पाहिले आहे. व्यवसाय, शिक्षणकार्य, शेती या निमित्ताने त्यांचा समाजातील तळागाळांतील उपेक्षित, दुर्लक्षित लोकांशी संबंध आला. त्यांच्या आशा-आकांक्षा समजून घेता आल्या. सर्वसामान्य लोकांच्या तात्कालीन आणि शाश्वत गरजा ओळखून

त्याप्रमाणे शिक्षणक्रमाची जुळणी केली. त्यांनी सर्वसामान्य माणूस हाच शिक्षणाचा केंद्रबिंदू मानला.

## मेकॉलेचा शिक्षणविषयक झिरपण्याचा सिद्धान्त

मेकॉले यांनी शिक्षणविषयक झिरपण्याचा सिद्धान्त मांडला. तो येथील उच्चवर्णीय विचारवंतांना फारच सोयीचा होता म्हणून त्यांनी तो उचलून धरला. या देशातील वर्ण-जातिव्यवस्था, स्त्रीविषयक अनुदार दृष्टिकोन, विद्याबंदी, धर्मसंस्था आणि राज्यसंस्था यांचा शिक्षणविषयक उदासीन दृष्टिकोन; यामुळे शिक्षणाचा फायदा खऱ्या गरजवंतांना झाला नाही. समाजातील वरचा वर्ग अगोदर शिक्षण घेईल; त्यानंतर खालच्या वर्गाला शिक्षण देण्यासाठी ते पुढाकार घेतील, असे गृहीत धरण्यात आले होते. इंग्लंडमध्ये या सिद्धान्ताप्रमाणे शिक्षण सामान्यांपर्यंत गेले. त्या काळात कोणत्याही देशात शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारची मानली जात नव्हती. इंग्लंडमध्ये चर्च, धर्मदाय संस्था, सरंजामदार यांनी देणग्या गोळा करून सामान्यांना शिक्षण दिले. मानवतावाद, उदारमतवाद, सुसंस्कृतपणा यामुळे इंग्लंडमधील उच्चवर्गीय मंडळींनी सामान्य लोकांच्या शिक्षणासाठी तळमळीने प्रयत्न केले. मेकॉलेसाहेबांचा मूळ हेतू वाईट नव्हता. येथील उच्चवर्णीय मंडळी, धर्मगुरू, पुरोहित, जमीनदार, संस्थानिक हे सर्व संकुचित, अनुदार, मानवद्रोही आणि असंस्कृत होते. त्यांनी शिक्षण घेतले, शिक्षणाचे फायदे घेतले, पण ते इतरांना मिळू नयेत, याची काळजी त्यापेक्षाही जास्त घेतली. त्या काळात बडोद्याचे सयाजीराव महाराजांसारखे प्रजाहितदक्ष आणि शिक्षणप्रेमी संस्थानिक अपवादात्मक होते. म्हणून शिक्षण ही फक्त उच्चवर्णियांची मक्तेदारी झाली होती. जोतिबा फुले यांनी प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक, मोफत आणि सक्तीचे व्हावे, अशी क्रांतिकारक मागणी केली. शेतकऱ्यांकडून जमा होणारा महसुलाचा जास्तीत जास्त हिस्सा शेतकऱ्यांच्या मुला-मुलींना शिक्षण देण्यासाठी खर्च करावा, असा आग्रह त्यांनी धरला. या मागणीचा रेटा अनेक स्तरांमधून वाढला. उच्चवर्णीय मंडळी बेचैन झाली.

## चरितार्थाची साधने

जोतिबांचे शिक्षण त्यांच्या काळात इतर प्रसिद्ध असलेल्या उच्चविद्याविभूषित, प्रतिष्ठित व्यक्तींएवढेच होते. त्यांनाही त्या काळात मोठ्या पगाराची, मानसन्मानाची नोकरी मिळू शकली असती. पण बहुजन समाजातील त्यागी महामानवाची एक ठराविक मानसिकता असते. ते त्यागही पूर्णपणे करतात, प्रामाणिकपणाही

संपूर्णच असतो. जोतिबा फुले यांनी नोकरी न करण्याचा निर्धार केला. नोकरीची बंधने असतात. भूमिका घेणे, विचार मांडणे, सत्याचा आग्रह धरणे यांवर मर्यादा येतात. अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होतो, म्हणून त्यांनी आपल्या जीवनाची दिशा निश्चित केली. एक महत्त्वाचा निर्णयच घेऊन टाकला. प्रारंभी त्यांची जमीन भरपूर होती. त्यातून उत्पन्न मिळत होते. त्यावर चरितार्थ चालत होता. त्यांची मांजरी येथे ७०-७५ एकर जमीन होती. फळे, भाज्या, ऊस अशी नगदी पिके घेत होते. त्या वेळी ते स्वत: शेतीकडे लक्ष देत असत. शिक्षणप्रसाराच्या कार्याला वाहून घेतल्यानंतर शेतीकडे दुर्लक्ष होत गेले. उत्पन्न घटत गेले. पण खर्च वाढला.

इ.स. १८४८ नंतर मिशन शाळेत त्यांनी शिक्षकाची अर्धवेळ नोकरी केली. तेवढ्या वेतनातून काटकसरीने ते खर्च भागवीत होते. उरलेल्या वेळेत दोघे पती-पत्नी स्वत: चालविलेल्या शाळेत विनावेतन पूर्णवेळ नोकरी करीत.

वासुदेव बाबाजी नवरंगे हे एक धनिक गृहस्थ जोतिबा यांचे चाहते होते. त्यांना इंग्लंडच्या एका कंपनीने मुशीची एजंसी मुंबई येथे दिली होती. त्यांनी जोतिबांना पुण्यासाठी सब-एजंसी दिली. या दुकानासाठी, त्यांच्या सावत्र आईने दिलेला पैसा त्यांनी गुंतविला. या दुकानावर दोन नोकर होते. दुकान चांगले चालत होते. पितळ, तांबे, सोने इत्यादी धातू वितळविण्यासाठी सोनारांना विविध आकारांच्या मुशींचा उपयोग होत असतो. या दुकानात त्यांची उठबैस असे. कार्यकर्ते आणि अनुयायी येथेच त्यांना भेटत होते.

पुणे येथे भाजीपाला खरेदी करून मुंबईला पाठविण्याचा व्यवसाय सहकारी तत्त्वावर सुरू केला. त्यामध्ये ग्यानोबा कृष्णाजी ससाणे यांना चौथा हिस्सा भागीदारी दिली होती. तो व्यवसाय फार फायदेशीर झाला नाही, म्हणून नंतर तो बंद केला.

कात्रजच्या बोगद्याच्या कामाचे कंत्राट त्यांनी घेतले होते. खडकवासला धरणाच्या कामाला चुना, दगड, खडी पुरविण्याचे कंत्राट त्यांनी घेतले होते. यामध्ये त्यांचे बालमित्र सखाराम यशवंत परांजपे भागीदार होते. त्याच धरणाच्या पाटाच्या कामाचेही कंत्राट घेतले होते. ही कंत्राटी कामे करण्यासाठी बुलढाण्याचे रामचंद्र हरी शिंदे आणि कृष्णराव भालेकर यांच्यासोबत 'पुणे कमर्शियल अँड कॉन्ट्रॅक्टिंग कंपनी' या नावाची संस्था स्थापन केली होती. येरवडा येथील पुलाच्या बांधकामाचेही कंत्राट घेतले होते. अतिशय मजबूत, दर्जेदार अशी ही सार्वजनिक कंत्राटी कामे झाली आहेत.

यात्रमाणे स्वतंत्र उद्योग, व्यवसाय करून चरितार्थ चालविला. आपल्या संसार-प्रपंचाचा भार इतर कोणावरही पडू दिला नाही. स्वत:चा संसार व्यवस्थित करून मग समाजासाठी झटावे, अशी त्यांची विचारसरणी होती. त्यांच्या आयुष्यामध्ये कधी भरभराट तर कधी आर्थिक ओढाताण, असा चढ-उताराचा काळ नेहमीच आला. त्यांच्याकडे विपूल पैसा आला. तो समाजकार्य, गोरगरिबांना मदत, यासाठी खर्च झाला. त्यांच्याकडे येणारे-जाणारे, पै-पाहुणे, अनुयायी यांची वर्दळ होती. आदरातिथ्य, उठ-बस यासाठी खूप खर्च होत होता. विद्यार्थी, अपंग, अनाथ यांच्यासाठी फुले पती-पत्नी उदारहस्ते खर्च करीत होते. स्वतंत्र व्यवसाय करून, स्वत:चा चरितार्थ चालवून सर्व समाजाचा प्रपंच सुखाचा व्हावा, यासाठी प्रयत्न करणारे हे आदर्श दांपत्य होते.

## दक्षिणा प्राईझ कमिटीला सहकार्य

जोतिबा फुले यांच्या विचार आणि कार्याची दखल इंग्रज सरकार, उच्चवर्णीय विद्वान आणि सर्वसामान्य जनतेने घेतली होती. सनातनी मंडळींना त्यांच्या विचारांची दखल विरोधी प्रतिसादासाठी का होईना, घ्यावी लागत होती. लोकहितवादी, न्या. म. गो. रानडे, विष्णुशास्त्री पंडित, सार्वजनिक काका या मंडळींचे काही ना काही सुधारणाकार्य चालत असे. त्यांना कुटुंबसुधारक, मवाळ मानले जात होते, तरीही तेवढ्याही सुधारणा सनातन्यांना मानवत नव्हत्या. जोतिबांचा सुधारणाकार्याला पाठिंबा होता. त्यांचा निर्भीडपणा, दबदबा सर्वज्ञात होता. त्यांचा या सुधारकांना फार मोठा नैतिक आधार होता. सनातन्यांच्या विरोधापासून बचाव करण्यासाठी जोतिबांचे सहकार्य घ्यावे लागत होते.

जून १८४९ मध्ये लोकहितवादी, विष्णू मोरेश्वर रानडे आणि इतर काही सुधारकांनी पुढाकार घेऊन 'दक्षिणा प्राईझ कमिटी' स्थापन करण्याची मागणी करणारा अर्ज सरकारला दिला. बापू मांडे, लोकहितवादी, विष्णू मोरेश्वर भिडे, अण्णासाहेब चिपळूणकर यांनी पुढाकार घेतला. पेशवाई बुडाली तरी ब्राह्मणांना मिळणारी दक्षिणा इंग्रज सरकारने सुरूच ठेवली होती. त्या काळात काही लाख रुपयांची ती रक्कम होती. संस्कृत मंत्र, स्तोत्रे यांचे निरर्थक पाठांतर करणाऱ्या ब्राह्मणांना एवढी रक्कम वाटणे व्यर्थ होते. कालबाह्य, निरुपयोगी प्रथा बंद करावी, त्यामुळे पाठांतरकारांचे किंवा ती निरर्थक बडबड ऐकणाऱ्यांचे कसलेही ऐहिक कल्याण होत नाही. उलट पाठांतरासाठी आयुष्यातील १०-१२ वर्षांचा काळ वाया जातो. शिवाय ही सर्व मंडळी सुधारणाविरोधी काम

करतात. म्हणून दक्षिणा बंद करून ती रक्कम, 'दक्षिणा प्राईझ कमिटी' निर्माण करून तिकडे वळवावी; इंग्रजी, संस्कृत, पाली, प्राकृत भाषेतून मराठीत अनुवादित होणाऱ्या ग्रंथांना बक्षिसे द्यावीत; स्वतंत्र मराठी ग्रंथ प्रकाशनासाठी मदत करावी, अशी मागणी करणारा तो अर्ज होता. असा अर्ज सरकारकडे सुधारकांनी दिला आहे; ही माहिती कर्मठ ब्राह्मणांना कळली. सरकारी कार्यालयातही त्यांचाच भरणा होता. त्यांनी अर्ज करणाऱ्या सुधारक ब्राह्मणांना धमक्या देणे, दबाव आणणे सुरू केले. त्यांना त्रास होऊ लागला. त्यांनी जोतिबांकडे सहकार्य मागितले. 'तो अर्ज सरकारकडे मी पाठविला आहे' असे त्यांनी जाहीर करून धाडशी सहकार्य दिले, आणि सुधारकांची सुटका केली. पुढे दक्षिणा प्राईझ समिती स्थापन झाली. तिने जोतिबा फुले यांनी चालविलेल्या मुलींच्या शाळेसाठी २५ रु. अनुदान दिले. या समितीमध्ये काही ख्रिस्ती गृहस्थ आणि सोवळ्या ब्राह्मणांचा भरणा झाला. त्यांच्या 'तृतीयरत्न' नाटकाला बक्षीस देण्याचे नाकारले. ते नाटक विकत घ्यावे, अशी शाळा समितीकडे शिफारसही केली नाही. ही घटना इ.स. १८५५ मध्ये घडली. तो काळ धामधुमीचा होता. ब्राह्मण, इंग्रजी राजवटीवर नाराज होते. वासुदेव बळवंत फडके, चाफेकर बंधू यांनी उठाव सुरू केले होते. इंग्रज सरकारचे काळे-गोरे अधिकारी चैन, ऐषआरामात होते. शिक्षण, रोजगार, शेतीसुधारणा, सामाजिक सुधारणेच्या कामात ढिसाळपणा, शिथिलता होती. प्रशासनात साचलेपणा आला होता. इंग्रजी राजवट ही शूद्रातिशूद्रांच्या सुधारणेची पर्वणी आहे, असे जोतिबांना आणि ब्राह्मण सुधारकांना वाटत होते. सुधारणांना गती येत नव्हती. ब्राह्मण नोकर सुधारणाविरोधक होते. जोतिबांनी इंग्रज सरकारवर टीकेची झोड उठविली. त्यांनी आता लेखणी उचलली होती. निर्भीडपणे लिहीत होते. त्यामुळे त्यांचे ख्रिस्ती मिशनरी मित्र आणि इंग्रजी अधिकारी मित्र त्यांच्याकडे साशंकतेने पाहू लागले. ते त्यांच्याशी फटकून वागू लागले. जोतिबा इंग्रजधार्जिणे होते, असा आरोप करणाऱ्यांनी, जोतिबांनी इंग्रज सरकारवर केलेली परखड टीका समजून घ्यावी. उलट, बरीच ब्राह्मण मंडळी इंग्रजांशी एकनिष्ठ वागत होती. काही मंडळी इंग्रज राजवटीविरुद्ध बंड आणि उठाव करण्यासाठी इतरांना चिथावणी देत होती. यामध्ये दुहेरी हेतू होता. बंड यशस्वी झाले आणि इंग्रजी राजवट संपली तर पुन्हा पेशवाई येईल. बंड फसले तरीही नोकरशाहीच्या निमित्ताने राज्यसत्तेत आपला वाटा आहे. धर्मसत्ता तर निर्विवादपणे आपल्याच हाती आहे. या नाराज, नाखूष ब्राह्मणांना खूष ठेवण्याचे प्रयत्न इंग्रज अधिकारी करीत होते. कंपनी सरकार आणि ख्रिस्ती

मिशनरी यांचा ब्राह्मणांवर विश्वास नव्हता. त्यांना राज्यसत्तेमध्ये कितीही वाटा दिला तरी राजद्रोह करणारी ही मंडळी आहेत, असेच त्यांचे मत होते. त्यांचा प्रभाव कमी व्हावा म्हणून सुधारकांना सहकार्य करण्याची त्यांची भूमिका होती. ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटिश पार्लमेंटकडे सत्तेचे हस्तांतर झाल्यावर ब्राह्मणांना खूष ठेवण्याचे धोरण अधिक वाढले. सरकारचा जोतिबा फुले यांना पाठींबा असायचा. पण शिक्षण, सुधारणा, धार्मिक गुलामगिरी, सामाजिक अराजक नष्ट करण्यासाठी त्यांनी सरकारकडे आग्रह धरला की, ब्राह्मणांचा दबाव सरकारवर येत होता. ते कोणाला खूष करण्यासाठी किंवा नाराज करण्यासाठी कार्य करीत नव्हते, लिहित नव्हते, बोलत नव्हते. स्त्री-शूद्रातिशूद्रांची शोषणमुक्ती, दुःखमुक्ती, त्यासाठी विद्येचा प्रसार, ही त्यांची निःसंदिग्ध भूमिका होती.

जोतिबा फुले यांनी शिक्षण आणि सामाजिक सुधारणाविषयक जागृती घडवून आणली. शिक्षणविषयक कार्य करताना जोतिबा-सावित्रीबाईंना शूद्रातिशूद्र आणि उच्चवर्णीयांकडून त्रास झाला. छळ झाला. अपमान झाला. त्यांच्या मित्रांनी मात्र तनमनधनाने साथ दिली. त्यांचा परस्परांवरील विश्वास, कार्याविषयीची निष्ठा किती शंभर नंबरी होती, त्याची यावरून कल्पना येऊ शकते. हे कार्य सुरू असताना कारन्याक, ओव्हान्स, लॉर्ड हेस्टिंग्ज, लॉर्ड डलहौसी यांच्यासारखे इंग्रज अधिकारी आले. त्यांच्यापर्यंत ही माहिती जात होती. सर चार्लस मेटकाफ, लॉर्ड रिपन, ह्यूम, वेडरबर्न यांच्यासारखे इंग्रज अधिकारी तर थेट शिक्षणखात्याशी संबंधित होते. ख्रिस्ती मिशनऱ्यांशी तर या दांपत्याचे कौटुंबिक संबंध होते. मुंबई प्रांताचे बोर्ड ऑफ एज्युकेशनचे प्रेसिडेंट सर अर्स्किन पेरी होते. जनतेच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारची आहे, हे मान्य करणारा कायदा इंग्लंडच्या पार्लमेंटने पास केला होता. सर पेरी यांनी जोतिबा-सावित्रीबाई यांच्या शिक्षणविषयक कार्याचा सविस्तर अहवाल सरकारकडे पाठविला होता. त्यामध्ये शिक्षणाच्या सर्वांगीण उपयुक्ततेवर भर दिला होता. सरकारने जनतेच्या शिक्षणाची टाळाटाळ केली होती; ते कार्य या दांपत्याने यशस्वी रीतीने, निष्ठेने पार पाडले. त्या कार्याविषयी जागृती आणि विस्तार केला. उच्चवर्णीय मंडळींनी विरोध केला, त्यांचीच मुली-मुले शाळेत येऊ लागली. शूद्रातिशूद्र जातींना शिक्षणाची गोडी वाटू लागली. उत्स्फूर्त प्रतिसाद मिळू लागला. या कार्यासाठी त्यांचा उचित सन्मान झाला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त होऊ लागली. ही सूचना इंग्रज सरकारने मान्य केली.

## सरकारी विद्याखात्याकडून सन्मान

शिक्षकांचा पगार १०-१५ रुपये होता, त्या काळात २०० रुपयांची शालजोडी देऊन सन्मान करण्याचा निर्णय इंग्रज सरकारने घेतला. शालजोडी म्हणजे सन्मानाचे, गौरवाचे उच्चदर्जाचे प्रतीक आहे. पुण्यामध्ये, ब्राह्मणांचे केंद्र असलेल्या शहरात आणि वस्तीमध्ये एका शूद्राचा सन्मान होणार! जगावर साम्राज्य करणाऱ्या इंग्रज सरकारचे उच्चाधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार!! ब्राह्मणांच्या इभ्रतीचा, प्रतिष्ठेचा हा प्रश्न आहे. असे होता कामा नये. हा समारंभ रद्द झाला पाहिजे!! ठरले आणि सनातनी मंडळी कामाला लागली. इंग्रज अधिकाऱ्यांवर दबाव आणला. पुण्यात विश्रामबागवाड्याजवळ हा समारंभ होणार होता; ही गोष्ट जास्त झोंबणारी होती. आता ब्राह्मण आणि ब्राह्मणी धर्माला वाईट दिवस येतील. दबाव तंत्राचा उपयोग झाला नाही. साम्राज्यवादी सरकारचाच तो निर्णय होता. तो बदलणे अशक्य आहे; हे लक्षात आल्यावर, असा समारंभ करू नये, शालजोडी देऊ नये, त्याऐवजी २०० रुपये रोख रक्कम द्यावी; असेही सनातन्यांनी सुचविले. पण समारंभ होणारच, त्यामध्ये काहीही बदल होणार नाही, असे ठरले. जोतिबा फुले यांचे मित्र, चाहते, सहकारी यांना फार आनंद झाला. हा विजय अब्राह्मणी मूल्यव्यवस्थेचा, तत्त्वज्ञानाचा होता. वैयक्तिक मानापमानाचा या प्रकरणात काहीही संबंध नव्हता.

१६ नोव्हेंबर १८५२चा दिवस उजाडला. समारंभाची वेळ होऊ लागली. विश्रामबागवाड्यात युरोपियन अधिकारी, देशी अधिकारी, ख्रिस्ती मिशनरी, सरदार, मानकरी, प्रतिष्ठित मंडळी यांचा दरबार भरविला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी मुंबई प्रांताचे गव्हर्नर उपस्थित होते. मेजर कँडी यांनी सरकारी शिक्षणमंडळाचा अहवाल दरबारापुढे वाचून दाखविला. नंतर प्रस्तुत समारंभाच्या आवश्यकतेबद्दल निवेदन केले. त्यानंतर जोतिबा फुले यांना सन्मानाप्रीत्यर्थ शालजोडी अर्पण केली. उपस्थित मंडळींमध्ये प्रसन्नता, आनंद दाटला होता. सन्मान होत असताना, हा हृद्य सोहळा पाहत असताना, उपस्थितांची अंत:करणे हेलावत होती. गव्हर्नर यांनी जोतिबा-सावित्रीबाई यांच्या सर्वांगीण कार्याची मुक्तकंठाने स्तुती केली. जोतिबा फुले यांचे सहकारी, मित्र बापुरावजी मांडे आणि पुणे महाविद्यालयाचे मुख्य पंडित मोरेश्वरशास्त्री यांनी स्त्री शिक्षणाच्या महत्त्वाविषयी भाषणे केली. फुले दांपत्याच्या कार्याचा त्यांनीही गौरव केला.

सत्काराला उत्तर देताना जोतिबा फुले यांनी अतिशय संयमाने, विनम्रपणे

आणि प्रभावी रीतीने आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, "मी काही विशेष केले आहे, असे मला वाटत नाही. मी माझ्या कर्तव्याला फक्त जागलो आहे. जमलेल्या जनता-जनार्दनाने हाच कित्ता गिरवावा आणि सरकारने तातडीने स्त्री शिक्षणाचा प्रश्न हाती घ्यावा, अशी माझी विनम्र अपेक्षा आहे." या भाषणात गर्व, अहंकार, विरोधकांची जिरवली, अशी भावना नव्हती. त्यामुळे त्यांच्या भाषणाचा; उपस्थित मंडळींच्या आणि अधिकाऱ्यांच्या मनावर चांगलाच प्रभाव पडला. मुलींच्या शाळा काढण्यासाठी सरकारने हालचाली सुरू केल्या. यासाठी दक्षिणा प्राईझ समितीकडून ७५ रुपये देण्याची व्यवस्था झाली. आपल्या शिक्षणासाठी उच्चवर्ण जागृत होता. स्त्री, शूद्र, अतिशूद्रांना अपवित्र मानले होते. ते शिक्षण घेण्यासाठी पात्र नाहीत, असा मतप्रवाह होता. याच वर्षी 'अतिशूद्रांना विद्या देणारी मंडळी' या नावाची शिक्षणसंस्था स्थापन केली. सरकारकडे शाळेसाठी जागेची मागणी करणारा अर्ज संस्थेच्यावतीने दिला. पाच वर्षानंतर म्हणजे इ.स. १८५७ मध्ये भोकरवाडीजवळ ६ एकर ३४ गुंठे जागा मिळाली. ती शाळा पुढे खूप वर्षे सुरू होती.

इ.स. १८५४ मध्ये पुणे शहरात ढाळउलट्याच्या रोगाची लागण झाली. अस्वच्छता आणि घाणीमुळे हा रोग पसरला होता. जोतिबा फुले यांनी आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन पुणे शहर स्वच्छ केले. पाणी निर्जंतुक करण्यासाठी सरकारकडून औषध घेऊन पाणवठ्यात टाकले. त्या वेळी काही उच्चवर्णीय मंडळींनी विरोध केला. पण गोऱ्या साहेबलोकांचा पाठिंबा असल्यामुळे तो विरोध टिकला नाही. शिक्षणकार्याला जोडून त्यांची इतरही अशी विधायक कामे सुरू होती.

## इतिहासकार जोतिबा फुले

जोतिबा फुले यांनी बळीस्थानच्या इतिहासाचा सखोल अभ्यास केला होता. ते बळीराजाचे अभिमानी होते, म्हणून हिंदुस्थानला बळीस्थान म्हणीत असत. हेन्री मीड, सर विल्यम जोन्स, कॅप. जेम्स कुक, होरेस हायमन विल्सन, जॉन विल्सन वगैरे इंग्रज इतिहासकारांचे इतिहासग्रंथ त्यांनी अभ्यासले होते. पण केवळ त्या एकतर्फी, काहीशा काल्पनिक आणि त्यांच्या हितसंबंधांना बाधा येणार नाही; अशा पद्धतीने लिहिलेल्या माहितीवर, ते विसंबून राहिले नाहीत. येथील पुराणग्रंथांमधील पुराणकथा, दंतकथा, आख्यायिका यावरील कल्पनेची, अतिशयोक्तीची पुटे खरवडून ऐतिहासिक सत्याची मांडणी केली. 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा'मध्ये (१८६९) त्यांनी काही

इतिहास मांडला. त्यानंतर 'गुलामगिरी' (१८७३) या ग्रंथामध्ये ईश्वराच्या नऊ अवतारांची वैज्ञानिक दृष्टीने चिकित्सा करून ब्राह्मणप्रिय अवतार कल्पनांमधील फोलपणा सिद्ध केला. शेतकऱ्यांचा असूड (१८८३), सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक (१८८९) यामध्येही इतिहासविषयक मते व्यक्त केली आहेत.

त्यांनी प्राचीन काळातील लोकायत, सांख्य, शाक्त, नाथ, शैव, बौद्ध, जैन या दर्शन परंपरांचा अभ्यास केला. मध्ययुगातील वारकरी, महानुभाव, लिंगायत संप्रदायांचाही अभ्यास केला. कबीरपंथ आणि कबीरपंथी साधूंचा त्यांना सहवास लाभला होता. काही कबीरपंथी साधूंनी सत्यशोधक समाजाचे कार्य केले आहे. प्राचीन काळातील इतिहासाचा त्यांनी अभ्यास केला. तेव्हा इतिहासविषयक जेवढी माहिती उपलब्ध होती, ती त्यांनी अभ्यासली होती. या देशाचा इतिहास ब्राह्मणी विरुद्ध अब्राह्मणी तत्त्वज्ञानाच्या संघर्षाचा आहे. इहवाद विरुद्ध चैतन्यवाद असा हा संघर्ष प्रत्येक शतकात होत राहिला आहे. त्या काळी भारतविद्या, मानववंशशास्त्र, उत्खननशास्त्र, भाषाशास्त्र, प्राच्यविद्या या शास्त्रांची निर्मितीही झाली नव्हती. तरीही अभ्यास, चिंतन, संशोधनपूरक कल्पकता, प्रखर बुद्धिमत्ता या आधारे त्यांनी इतिहासविषयक काही सिद्धान्त मांडले. त्यानंतरच्या संशोधनांमधून त्यांनी मांडलेल्या सिद्धान्तांना बळकटी प्राप्त झाली. ते सिद्धान्त संक्षेपाने पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१. आर्य हे इराणी आहेत. ते आक्रमक, रानटी आणि हिंसक होते. त्यांनी टोळ्या करून हजारो वर्षे या देशावर आक्रमण केले. बळीस्थानातील क्षेत्रज राजांशी त्यांनी लढाया केल्या. पराभूत झाले तरी काही काळ विश्रांती घेऊन, नव्या टोळ्या आल्यावर पुन्हा कपट, कारस्थाने, फितुऱ्या करून लढत राहिले. क्षेत्रज राजांना असुर, राक्षस, दानव ठरविले. इतरांना दस्यू, नाग, भिल्ल, पिशाच्च, आदिवासी ठरविले. त्यांना अस्पृश्य ठरवून गुलाम केले. ब्राह्मणी इतिहास श्रीकृष्णाला देव मानतो तर त्याच्या सख्ख्या कंसमामाला असुर ठरवितो. सीता स्वयंवराच्यावेळी, जनकराजाने राजपुत्रांना सन्मानाने निमंत्रित केले होते, त्यामध्ये क्षत्रिय राजपुत्र रावणही होता. रावणाला ब्राह्मणी इतिहास राक्षस ठरवितो. इराणी आर्यांशी लढाया करणाऱ्या क्षत्रियांची, ब्राह्मणी ग्रंथांनी विकृत वर्णने केली. इराणी आर्यांना मदत करणाऱ्या क्षेत्रजांना प्रतिष्ठा दिली.

२. इराणी आर्यांना मदत करणाऱ्या मूळ रहिवाशांना त्यांनी सामावून घेतले.

त्यांच्या मते; देशस्थ ब्राह्मण हे, क्षेत्रज असलेले आणि नंतर आर्यांना जाऊन मिळालेले लोक आहेत. याचा पुरावा देताना ते म्हणतात, देशस्थ ब्राह्मणांच्या त्वचेचा रंग, कुलदैवते, काही रूढी शूद्रातिशूद्र यांच्याप्रमाणेच आहेत.

३. मराठे, माळी, कुणबी, धनगर या जाती मुळात एकच आहेत. व्यवसाय भेदांमुळे ते एकमेकांना वेगळे समजू लागले आहेत. जेजुरीचा खंडेराय हा क्षत्रिय राजा होता. त्याच्या दोन पत्न्यांपैकी एक क्षत्रिय तर दुसरी धनगर आहे. त्या काळी या जाती एकच होत्या.

४. बळीराजाचे राज्य हे प्रजासत्ताक राज्य होते. त्यामुळे येथे समृद्धी, सौख्य नांदत होते. ज्या ज्या राजांनी प्रजासत्ताक राजवटीचा त्याग केला; स्वत: चैन, विलास, ऐषआराम करू लागले, त्यांच्या राजवटींचा विनाश झाला. त्यांनी जगातील अनेक उदाहरणे सांगून हे मत मांडले आहे.

५. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, स्त्रीदास्य या व्यवस्था नैसर्गिक किंवा ईश्वरनिर्मित नाहीत. म्हणून त्या नष्ट केल्या पाहिजेत. अस्पृश्यता, उच्चनीच भेदभाव, सोवळे-ओवळे इत्यादी कृत्रिम भेद पाळू नयेत. शिक्षणाने ते नष्ट होतील.

६. कोणताही धर्म, धर्मग्रंथ किंवा प्रेषित; ईश्वराकडून येत नाही. कोणालाही अंतिम सत्याचा किंवा सार्वजनिक सत्याचा थांगपत्ता लागलेला नाही. जे तसा दावा करतात, तो त्यांचा हेकटपणा आहे. सर्व धर्मग्रंथ पुरुषांनी लिहिलेले असल्यामुळे स्त्रियांविषयी पक्षपात करणारा मजकूर त्यामध्ये खूप आहे. ईश्वर, आत्मा, स्वर्ग, नरक, ग्रह, जप, अनुष्ठान, मंत्र या संकल्पना पुरोहितवर्गाने त्यांच्या स्वार्थासाठी निर्माण केलेल्या आहेत. पूजा, विधी, कर्मकांड न करताही सत्यधर्माचे आचरण करता येते आणि नैतिक जीवन जगता येते.

७. बळीस्थानाचा इतिहास ब्राह्मण-अब्राह्मण संघर्षाचा इतिहास आहे. हा भेद ब्राह्मणीग्रंथांनीच केला आहे. बळीराजा, वेणराजा, हिरण्यकश्यपू, बाणासूर यांना कपटाने मारले. श्रीकृष्ण, राजा प्रल्हाद, हरिश्चंद्र यांचा छळ करून, त्यांना ब्राह्मणी परंपरेचे अनुयायी मानले.

८. पुराणे, पोथ्या, देवदेवता आणि तीर्थ-महात्मे यामध्ये काल्पनिक, अतिशयोक्त, अशास्त्रीय, अवैज्ञानिक अशा भाकडकथा लिहून ठेवल्या. तो पवित्र इतिहास आहे, असे समाजमनावर बिंबविले. ब्राह्मण हे भूदेव

आहेत. पुज्य आहेत. सर्व सृष्ट्यपदार्थांवर त्यांचाच अधिकार आहे. दान-दक्षिणेमुळे पुण्य मिळते, स्वर्गप्राप्ती होते. जन्ममरणाचे फेरे चुकतात; असे पुन्हा पुन्हा सांगितले.

९. ब्राह्मणांमध्ये क्षात्रतेज आहे; असे दाखविण्यासाठी इंद्र, वामन, परशुराम इत्यादी भेकड, कपटी, क्रूर आर्यप्रमुखांना देव स्थानी मानले आणि त्यांचे प्रस्थ माजविले. पुराणकथांमध्ये देव-असुर लढायांमध्ये असुरांचा पराभव दाखविला आहे. संस्कृत नाटकांमध्येही अशाच आशयाची खोटी कथानके रचलेली असतात.

१०. आर्य-इराणी परके असल्यामुळे, त्यांना या देशातील मूळ रहिवाशांविषयी कधीही आपलेपणा वाटला नाही. उलट क्षेत्रजांचा द्वेष, तिरस्कारच केला. आर्यांच्या टोळ्या येत होत्या, त्यामध्ये फक्त पुरुष असत. त्यांनी येथील स्त्रियांना पळवून, त्यांच्याशी विवाह केले. म्हणून स्त्रियांनाही शूद्र मानले आहे.

११. वेद ईश्वरनिर्मित आहेत, हे खोटे आहे.

१२. चातुर्वर्ण्याची निर्मिती ब्रह्माच्या चार अवयवांतून झाली, हा सिद्धान्त वैज्ञानिक कसोट्यांवर टिकत नाही. सृष्टिनियमांनाही त्यामुळे बाधा येते. अवतारी पुरुषांच्या जन्मकथाही अद्भुत, चमत्कारिक आणि हास्यास्पद आहेत.

जोतिबा फुले यांनी याप्रमाणे इतिहासाची मांडणी केली. त्यांना जागतिक पातळीवर संशोधनाच्या आधारे पाठिंबा मिळाला. हा इतिहास पारंपरिक मनाला न रुचणारा, न पटणारा आहे. मराठी मनाला प्राचीन आणि पेशवाईचा काल्पनिक इतिहास आजही भुरळ घालतो. ऐतिहासिक सत्य आणि कलात्मक वास्तव यातील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. जनसामान्यांचा वास्तव इतिहास समजून घेऊन, वर्तमानकाळाचे भान राखून, भविष्यकाळाचा वेध घेतला तरच मानवी समाजविकासाच्या नव्या वाटा दिसू लागतात. भविष्यातील संभाव्य धोके टाळता येतात. सामान्य माणूसकेंद्रित सांस्कृतिक इतिहासापासून कोणालाही फार काळ आणि फार दूर पळता येत नाही.

वर्णजातिलिंगभेदनिरपेक्ष इतिहासलेखन कसे असावे, याचा आदर्शपाठ जोतिबा फुले यांनी घालून दिला आहे. इतिहासतज्ज्ञ म्हणून त्यांची दखल घेणे, हे न्यायाला धरून होईल. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा हा एक महत्त्वाचा

पैलू उपेक्षित राहिला आहे. आता मात्र इतिहासकार म्हणून त्यांची आवर्जून नोंद घेतली जात आहे.

## सत्यशोधकी साहित्यिक

मानवी भावभावना आणि बौद्धिक प्रस्फुरणांचा सांस्कृतिक सहजाविष्कार साहित्यातून होत असतो. मानवी मन-बुद्धीचा भाषिक आविष्कार साहित्यातून होतो. म्हणून साहित्यातून समूहमन समजून घेता येते. महाकाव्यातील व्यक्तिचित्रांच्या आधारे युगधर्म, तत्कालीन सामाजिक जीवनप्रणाली, व्यक्ती आणि समष्टी जीवनाचे सर्वांगीण दर्शन घडते. या देशात ब्राह्मणी-अब्राह्मणी या दोन मुख्य परंपरा नेहमीच अस्तित्वात आहेत. त्यांचा संघर्षही सुरू आहे. साहित्यातून या परंपरा, त्यातील तत्त्वज्ञानात्मक, सौंदर्यशास्त्रीय संघर्ष व्यक्त झाला आहे. लोकायत, बौद्धादी परंपरा या सत्यशोधकी साहित्यपरंपरा आहेत. मध्ययुगात वारकरी, महानुभाव, लिंगायत, कबीरपंथ यांनी ब्राह्मणी व्यवस्थेशी संघर्ष केला. लोकसाहित्यातूनही ब्राह्मणी देव-देवता, रूढी-प्रथा, संकेत याविषयी उपरोध, उपहास प्रकट होतो.

आधुनिक काळात जोतिबा फुले यांनी हेतुत: सत्यशोधकी साहित्य निर्माण केले. मनुस्मृती पुरस्कृत उच्च-नीच भेदभावांना आव्हान देणारे साहित्य त्यांनी निर्माण केले. इ.स. १८५१ मध्ये 'भटाभिक्षुकांना सवाल' हे आठ पानी पुस्तक प्रसिद्ध केले. त्याच वर्षी 'पुरोहित भटांनो उत्तरे द्या' हे लहानसेच गद्यपुस्तक लिहून स्त्रिया आणि शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणाचे समर्थन केले. यातून ब्राह्मणांचा सुधारणाविरोध आणि शूद्रातिशूद्रांची शिक्षणविषयक जागृती, या बाबी ठोसपणे निदर्शनाला आणून दिल्या. इ.स. १८५३ मध्ये 'निर्मिकाचा शोध' या चार पानी पद्यमय पुस्तकात "...विश्वाचा निर्माता आकाश असून त्यास निर्मिक म्हटल्यास वावगे होणार नाही. आकाश हे अनेक गुणधर्माच्या मूलतत्त्वाने भरले असून, त्यापासून अनेक प्रकारचे अणुरेणू उत्पन्न होऊन, त्यांच्या संयोगाने खस्थ (आकाशातील) पदार्थ निर्माण झाले. कित्येक खस्त पदार्थांवर स्थळकाळक्रमास धरून जीवदृष्टी तयार होऊन, तीत बुद्धीचे व मनाचे अणू अधिक असलेला मानवप्राणी जन्मास आला." डार्विनने जीवसृष्टीच्या उत्पत्ती विकासक्रमाचा सिद्धान्त मांडल्यावर ख्रिस्ती धर्मगुरूंमध्ये खळबळ उडाली होती. जोतिबा फुले यांच्या या सिद्धान्तामध्ये इतिहास, भूगोल, खगोल, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र यातील संकल्पना आल्या आहेत.

*"साऱ्या निर्मितीला। पोकळी कारण ॥*
*असे तिचे गुण। स्वाभाविक ॥*
*विषाणूचा मेंदू। धर्माची प्रकृती ॥*
*देवाची उत्पत्ती। तोच करी ॥*
*शिका शिका तुम्ही। घ्या सत्याचा शोध ॥*
*उत्पत्तीचा बोध। ध्यानी आणा ॥*
*जोति सांगे प्रेमे। विद्या तुझ्या दारी ॥*
*आली संधी खरी। शिकण्यास ॥"*

"सत्याचा शोध घेण्यासाठी शिकावे", अशी सम्यक भूमिका त्यांनी मांडली आहे. "देवाची उत्पत्ती मानवी मेंदूच्या कल्पनेतून झाली आहे. सृष्टीचे नियम हाच धर्म आहे. विकृत अणुरेणूतून विकृत कल्पना जन्माला येतात. त्या कल्पनांचे जन्मदाते मानवसमाजाशी, त्यांच्या जीवनाशी क्रूर खेळ खेळतात." या पुस्तकातील १४व्या अखंडात ते म्हणतात,

*"विकृत अणुने। देवास कल्पिले ॥ विश्वाचे वाटोळे। त्याने केले ॥*
*चोराने म्हणावे। देवा मला पाव ॥ भिक्षुकांचा भाव। असा असे ॥*
*आंग्लाईची विद्या। प्रयत्ने शिकावी ॥ न चुकता घ्यावी। गरिबांनी ॥*
*मग अवकाश। हिंडुनिया शोध ॥ जोतीचा हा बोध। ठेवा ध्यानी ॥"*

"निर्मिकाचा शोध म्हणजे सार्वजनिक सत्याचा शोध होय. भिक्षुकांचा धर्म हा पोटार्थी धर्म आहे. तो सार्वजनिक सत्यधर्म नाही." इ.स. १८५४ मध्ये 'मनुस्मृतीचा धिक्कार' हे १५ पृष्ठांचे गद्य पुस्तक त्यांनी लिहिले. ब्राह्मणांना पूजनीय असलेला मनूचा आणि त्याच्या स्मृतिग्रंथाचा जाहीर धिक्कार त्यांनी केला. मनुमत, मनूचा ग्रंथ जाळावा, असे आवाहन त्यांनी त्यांच्या अखंडांमधून केले आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, "हल्ली हिंदुस्थान देशावर इंग्रज बहादुरांचे राज्य चालू असून शूद्रादि अतिशूद्रांना व स्त्रियांना लिहिता-वाचता यावे, म्हणून विद्या शिकणेची पूर्ण मोकळीक आहे. तरी त्यांना भट-भिक्षूक दोन हजार वर्षांपूर्वी लिहिलेल्या मनुस्मृतीतील कायद्याच्या आधारे शिकू देत नाहीत. त्यांनी शिकू नये म्हणून शिकणाऱ्यांची निंदा-टवाळी करून, शिकविणाऱ्या मास्तरांची व मास्तरणींची; त्यांचेवर पोरेसोरे पाठवून, त्यांचेकडून खडे, शेण वगैरेंचा मारा करून, फटफजिती करतात आणि पोरांची माकडचेष्टा पाहून रेड्यासारखे माजलेले भट फिदीफिदी हसतात... जे भट स्वतःस हिंदू म्हणवून घेऊन शूद्रादि अतिशूद्रासही हिंदू

समजतात, मग ते भट हिंदूंना कमी का लेखतात, याचा शोध लावला पाहिजे. निरनिराळ्या पुराणग्रंथात हिंदू शब्द न आढळता आर्य व दस्यू याच शब्दांचा भरणा असून आर्य हे ब्राह्मण व दस्यू हे शूद्र असा अर्थ लावता येतो. म्हणून हे दोन्ही लोक एक असल्याचे म्हणवत नाही.'' जोतिबा फुले यांचे शिक्षण प्रसाराचे कार्य आणि हे लेखन एकाच वेळचे आहे. वयाच्या २३व्या वर्षापासून ते किती मूलभूत चिंतन करीत होते, त्याचा पुरावा या लेखनातून मिळतो. आर्य म्हणजे ब्राह्मण आणि दस्यू म्हणजे क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे तिन्ही वर्ण आहेत. एका वर्णाचे अल्पसंख्य परके आक्रमक विरुद्ध मूळ क्षेत्रज बहुसंख्य असा हा संघर्ष आहे. म्हणून ब्राह्मण मंडळी येथील सुधारणांना विरोध करीत असते, असे ते ठामपणाने आणि साधार मांडतात. इतिहासात आणि वर्तमानकाळात याविषयीचे पुरावे असंख्य मिळतात.

शिक्षणाचा सामाजिक आशय, मानवी जीवनाच्या सर्व पैलूंना स्पर्श करणारा असला पाहिजे. शिक्षणाची ही सामाजिक जबाबदारी आहे, हा सत्यशोधकी दृष्टिकोन जोतिबा फुले यांनी त्यांच्या सर्वच साहित्यातून मांडला, म्हणून त्यांचे साहित्य हे सत्यशोधकी साहित्य ठरते. या साहित्याला तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. विशिष्ट उद्दिष्ट्ये आहेत. त्याचा अनेक अंगांनी विकास झाला.. स्त्री-पुरुषांचा सहभाग वाढला, समीक्षा निर्माण झाली; समकालात आणि उत्तर काळात या साहित्याला अनुकूल किंवा विरोधी प्रतिसाद मिळाला, म्हणजे सर्वांनी दखल घेतली. या साहित्याने वैचारिक जागृती घडवून आणली, म्हणून सत्यशोधकी साहित्य प्रवाह हा मराठी साहित्यातील मुख्य प्रवाह मानावा लागतो. आजचे ग्रामीण, दलित, स्त्री, जन, जनवादी, कामगार, भटके, आदिवासी इत्यादी सर्व आधुनिक परिवर्तनवादी साहित्य प्रवाह म्हणजे या मुख्य प्रवाहाची अनेकविध अपरिहार्य रुपे आहेत.

सत्यशोधक साहित्यिक समाजवास्तवाकडे पाठ करून बसू शकत नाही. सभोवतालच्या समकालीन वास्तवाकडे डोळेझाक करू शकत नाही. इ.स. १८६३ मध्ये 'विधवांची भयानक अवस्था' हे पुस्तक जोतिबा फुले यांनी लिहिले, अशी नोंद क्षत्रिय मराठेशास्त्री महाघट पाटील यांनी केली आहे. त्या काळात विधवाविवाह-ब्राह्मण विधवांचे केशवपन या समस्या ऐरणीवर आलेल्या होत्या.

साहित्य आणि समाज, साहित्यिक आणि सामाजिक बांधिलकी, साहित्यिकांची नैतिकता, प्रत्यक्षातले वास्तव आणि कलात्मक वास्तव या प्रश्नांची चर्चा सत्यशोधकांनी केली नाही. चर्चेचे गुऱ्हाळ चालवून सपक रसचर्चा करण्याचा

उद्योग, ही उच्चभ्रू कलावाद्यांची गरज होती. सत्यशोधकी लेखक हे जीवनाच्या आणि समाजाच्या जीवन-मरणाच्या युद्धभूमीवर लढणारे शूर शिपाई होते. म्हणून त्यांच्या लेखणीत धग आणि आग होती. त्यामुळे विरोधकांना चटके बसले; पण शूद्रातिशूद्रांच्या जीवनबागा हिरव्या चैतन्याने बहरू लागल्या. जोतिबा फुले यांच्याबरोबर सावित्रीबाई फुले यांनीही साहित्यलेखन केले. सत्यशोधकी लेखक-लेखिकांची यादी खूप मोठी आहे. आधुनिक काळातील सत्यशोधकी साहित्य प्रवाहाचा प्रारंभ त्यांच्यापासून होतो.

## समाज प्रबोधनासाठी नाट्यलेखन

इ.स. १८५५ मध्ये त्यांनी 'तृतीयरत्न' हे नाटक लिहिले. त्या काळातील स्वतंत्र सामाजिक नाटक लिहिणारे जोतिबा हे मराठीतील पहिले नाटककार ठरतात. त्या काळात विष्णुदास भावे पठडीतील भागवत-पुराणकथांवर आधारलेली किंवा इतिहासातील लोकप्रिय प्रसंगांवर आधारलेली नाटके सादर होत होती. त्यांच्या लिखित संहिता नसायच्या. उस्फूर्त संवादांना महत्त्व होते. या नाटकांवर गोंधळी, तमाशा, रायरंद, भारूड, सोंगी भजन या लोककला-प्रकारांचा प्रभाव होता. कीर्तन आणि प्रवचनाची शैली, संवादांना होती. अख्यानावर नाटक बेतलेले होते. जोतिबा फुले यांनी स्वतंत्र शैलीने हे नाटक लिहिले. भटजोशी, शेतकरी-स्त्री-पुरुषांना ग्रह, दशा यांची भीती घालून जप, अनुष्ठान, अभिषेक या निमित्ताने दान, दक्षिणा, शिधा, भोजन उकळून कसे लुबाडतात, हे दाखवून शिक्षणानेच ब्राह्मणी दास्याच्या बेड्या तुटू शकतील, असा कृतिशील आशय सुचवून नाटक संपविले आहे. नैतिक प्रेरणा जागृत करणारे या नाटकाचे कथानक भटशाहीला आव्हान देणारे आहे. म्हणून ब्राह्मण सभासदांचे वर्चस्व असलेल्या दक्षिणा प्राईस समितीने या नाटकाला बक्षीस दिले नाही. मूर्तिपूजेपेक्षा ज्ञानोपासना श्रेष्ठ आहे. अंधश्रद्धा ही माणूसपणाचा घात करते. शिक्षणाचा केंद्रबिंदू माणूस आहे. सुधारणा आणि कलेच्या पातळीवर ते कृतिवीर होते. श्रेष्ठ दर्जाची कला उच्च दर्जाचा आनंद देते. त्याचप्रमाणे नैतिक कृतिकार्यक्रमांचा प्रचार करते. 'तृतीयरत्न' नाटक लिहून त्यांनी मराठीतील स्वतंत्र, सामाजिक, कृतिप्रवण नाटकांचा प्रारंभ केला.

## शाळांच्या व्यवस्थापन मंडळातून निवृत्ती

इ.स. १८५७च्या अगोदरची आणि नंतरची काही वर्षे धामधुमीची होती. इंग्रज सरकारविरुद्ध उठाव होत होते. दुसरीकडे जोतिबा फुले आणि ब्राह्मण

सुधारकांनी सुधारणा कार्याचा आग्रह धरला होता. सुधारणांना पाठिंबा दिला तर सनातनी मंडळी नाराज होते आणि विरोध केला तर, तो योग्य नव्हे; अशा पेचामध्ये इंग्रज अधिकारी होते. शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणासाठी सरकार काहीच करीत नाही; म्हणून जोतिबा फुले, त्यांच्यावर कडक टीका करीत होते. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मांतर चळवळीलाही त्यांचा पाठिंबा नव्हता. त्यामुळे इंग्रज अधिकारी आणि ख्रिस्ती मिशनरी नाराज झाले होते. ते अविश्वास दाखवू लागले होते. त्यांचे पूर्वीप्रमाणे सहकार्य मिळत नव्हते. शाळा चालविण्यासाठी आर्थिक अडचणी वाढल्या होत्या. जीवनोपयोगी अभ्यासक्रम तयार करणे, निसर्ग व मानव्यशास्त्रादी विषय शिकविणे, याबाबतीत काही ब्राह्मण सभासद विरोध करीत होते. या सर्व परिस्थितीमध्ये शाळांच्या व्यवस्थापन मंडळामध्ये आपण राहू नये; त्या कामातून निवृत्त होऊन, अन्य कामांसाठी वेळ द्यावा, असा त्यांनी निर्णय घेतला. त्यांनी व्यवस्थापन मंडळाचा राजीनामा देऊन; त्या कार्यातून निवृत्ती घेऊन लोकशिक्षण, जनांदोलने या अधिक व्यापक कामाकडे लक्ष दिले. खेड्यात सुरू केलेल्या अनेक शाळा चालविण्यासाठी सरकारकडे दिल्या तर काही शाळा स्थानिक शिक्षण प्रसारक मंडळांच्या ताब्यात दिल्या. सहकार्यांशी मतभेद आणि इंग्रज अधिकाऱ्यांचा अविश्वास अशा परिस्थितीमध्ये पदावर राहण्यापेक्षा निवृत्ती घेणे त्यांनी पसंत केले.

लोकहितवादी हे जोतिबा फुले यांचे हितचिंतक आणि चाहते होते. ते जोतिबांपेक्षा चार वर्षांनी मोठे होते. त्यांनी शतपत्रे लिहून आळशी, ऐतखाऊ, खुशालचेंडू, वेदशास्त्रांची पोपटपंची करणाऱ्या, पुराणातील भाकड कथा सांगून पोट भरणाऱ्या; पुराणिक भट, जोशी यांच्यावर सात्त्विक संतापाने लिहिले. ही मंडळी श्रम करीत नाहीत. आणि जे काही थोडे श्रम करतात ते अनुत्पादक असते. त्यातून उत्पादकता, निर्मिती, व्यापार, उद्योजकता, संशोधन यांचा विकास होत नाही; अशी त्यांची रास्त तक्रार होती. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी निबंधमालेतून त्यांच्यावर असभ्य, तिरसट, उपरोधिक शैलीतून लिहिले. लोकहितवादी यांनी सुधारणांचा पाठपुरावा केल्यामुळे, सनातनी ब्राह्मण त्यांच्या विरोधात ग्रामण्य, बहिष्कार असली प्रकरणे लादीत असत. इ. स. १८५८ मध्ये त्यांना वाळीत टाकण्याची घोषणा केली. हा त्यांना अडकविण्याचा दुसरा प्रसंग होता. जे स्वतः गतानुगतिक आहेत, अनैतिक आणि दुर्वर्तनी आहेत, त्यांना हा वाळीत टाकण्याचा अधिकार कोणी दिला; असे सनातन्यांना ठणकावून विचारणारे, धाडशी वीर जोतिबा हेच होते. त्यांनी पुण्यामध्ये केवळ

यासाठी एक मोठी सभा घेऊन लोकहितवादी यांना वाळीत टाकणाऱ्या ब्राह्मणांचा निषेध केला. जोतिबा फुले सनातन्यांच्या बालेकिल्ल्यात हे धाडस करीत होते. पाण्यात राहून माशाशी वैर करीत होते. सिंहाच्या आयाळीला हात घालण्याचा हा प्रयत्न होता. वाघाच्या जबड्यात हात घालून दात मोजण्याचा हा प्रकार होता. जोतिबा फुले आता एकटे नव्हते. ती एक शक्ती होती. एक विचार-प्रणाली होती. शूद्रातिशूद्र समाजाची शक्ती आणि सुधारक ब्राह्मण, त्यांच्यामागे होते. त्यामुळे जोतिबा फुले यांचा प्रतिकार करणे सनातन्यांना सोपे नव्हते. जोतिबा फुले हे लोकहितवादी यांच्या मदतीला अनेक प्रसंगी धावून गेले आहेत. त्यांची मैत्री ही वैचारिक होती. जोतिबा फुले हे सनातन्यांना आव्हान देत होते. जोतिबा एक शूद्र असून, धर्मशास्त्राचा त्याला अधिकार नसून औद्धत्याने वागतो, बोलतो, याचा बंदोबस्त कसा करावा, असा विचार सनातनी करू लागले.

## मारेकऱ्यांची माघार

शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया यांच्या दुःखमुक्तीचा आणि शोषणमुक्तीचा ध्यास जोतिबा फुले यांनी घेतला. विद्येच्या प्रसाराबरोबर इतरही सुधारणा कार्ये सुरू केली. विद्येचे अध्ययन आणि अध्यापन हे शूद्रांचे काम नाही. तशी धर्मशास्त्राची आज्ञा नाही. भूतकाळातही असे धर्मबाह्य वर्तन करणाऱ्यांना देहान्ताच्या शिक्षा ब्रह्मणांनी दिल्या आहेत. जोतिबाला समजावून सांगितले, तरी ते ऐकत नाहीत. सामदामदंडभेद या चाणक्यनीतीचा उपयोग होत नाही. तो आपले कार्य सोडीत नाही. आता त्याचा कायमचाच बंदोबस्त केला पाहिजे आणि वेळीच केला पाहिजे. शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांना विद्या मिळाली, ते जागृत झाले, ग्रंथ वाचू लागले तर त्यातील आपल्या लबाड्या उघड होतील. म्हणून जोतिबाचे सुधारणेचे खूळ बंद पाडलेच पाहिजे.

इ.स. १८५६ साल होते. रात्री जोतिबा अंथरूणावर विचार करीत पडले होते. त्यांना झोप येत नव्हती. १८५७च्या बंडापूर्वीची धामधूम सुरू होती. इंग्रज अधिकाऱ्यांना जोतिबांविषयी अविश्वास निर्माण झाला होता. ते सुधारणा कार्याला पूर्वीप्रमाणे सहकार्य देत नव्हते. आता इंग्रजी राजवट बुडणार, पेशवाई राजवट येणार, या खुषीमध्ये सनातनीवर्ग होता. या परिस्थितीमध्ये आपले क्रांतिकार्य अधिक सखोल, व्यापक आणि भक्कम कसे करावयाचे, याचा विचार जोतिबा करीत होते. मध्यरात्र उलटून गेली. बाहेर अंधाराचे साम्राज्य होते. घरात समईचा शांत आणि मंद प्रकाश पडला होता. ते प्रकाशकिरण

त्या अंधाराला भेदण्याचा प्रयत्न करीत होते. नीरव शांतता होती. तेवढ्यात जोतिबांना कसलीतरी चाहूल लागली. यावेळी कोण झाले असावे. हातामध्ये नंग्या तलवारी घेतलेल्या दोन व्यक्ती त्यांच्यापुढे उभ्या राहिल्या. त्यांना पाहून जोतिबांच्या काळजात धस्स झाले. आणि जोतिबा जागेच असल्याचे पाहून ते मारेकरी गांगरून गेले. भेकड सनातन्यांना एखाद्याचा खून करण्याची हिंमत नव्हती. सुपारी देऊन पाठविलेले ते मारेकरी होते. जोतिबांनी अंदाज केला. धाडसाने, प्रेमळपणाने, कारूण्य भरल्या आवाजात त्यांनी विचारले,

"तुम्ही कोण? कशासाठी येथे आलात?"

"..............."

"बोला! असे गप्प उभे का?"

"तुमचा खून करण्यासाठी बामणांनी आम्हाला एक एक हजार रुपये सुपारी दिली आहे."

"मला मारल्यामुळे तुमचा एवढा फायदा होणार असेल तर मला जरूर ठार मारा... माझे आयुष्यच दीनदलितांसाठी आहे..."

जोतिबांचा शांत, सोज्वळ तरीही करारी चेहरा, निर्भयपणा, त्यांच्या डोळ्यातून ओसंडणारी करूणा, त्यांच्या बोलण्यातील मधाळपणा, यामुळे ते मारेकरी पश्चात्तापदग्ध झाले. आपण आपल्याच तारणहाराला मारायला निघालो. किती करंटे आपण! हातातील चकाकत्या नंग्या तलवारी त्यांनी जोतिबांच्या पायाजवळ ठेवल्या आणि त्यांच्या पायावर डोके ठेवून म्हणाले; "त्या कपटी लोकांच्या सांगण्यावरून तुमच्यासारख्या देवमाणसाला ठार करण्यासाठी आम्ही आलो. आमची चूक आम्हाला कळली. आम्हाला माफ करा. आणि त्या पापी लोकांना ठार करण्याची परवानगी द्या." ते दोघेही गहिंवरून बोलत होते.

"त्याची काही आवश्यकता नाही. या प्रसंगाची वाच्यता कोठेही करू नका." जोतिबा फुले यांच्या मनाचा मोठेपणा पाहून ते प्रभावित झाले.

"आम्हाला तुमच्या कार्यात सहभागी करून घ्या. तुमच्या जीवाचे रक्षण करण्याची जबाबदारी आता आमची." असे म्हणू लागले.

दैवावर विश्वास ठेवणाऱ्या ब्राह्मणशाहीचे दैव उलटले. त्यांच्याच दुर्दैवाने घात केला. जोतिबांचा घात करण्यासाठी पाठविलेले मारेकरी ब्राह्मणशाहीची

हत्या करण्यासाठी स्वत: प्रेरित झाले. या मारेकऱ्यांपैकी एक धोंडिराम नामदेव कुंभार याने जोतिबा फुले यांच्याजवळ शिक्षण घेऊन, त्यांच्याच आज्ञेने काशी येथे जाऊन संस्कृत विद्या संपादन केली. पंडितराव हा बहुमानाचा किताब मिळविला. १२ फेब्रुवारी १८८४ रोजी सातारा जिल्ह्यातील गोंदवले येथे शृंगेरी मठाच्या शंकराचार्यांना आणि ब्रह्मवृंदांना वेदांवरील वादविवादामध्ये पराभूत केले. 'सत्यशोधक समाजाची मते चांगली आहेत. सर्व समाजाने त्या समाजाचे अनुयायी व्हावे.' अशी आज्ञा करणारा ताम्रपट; शिक्का आणि सहीसह त्यांनी दिला. पंडित धोंडिराम कुंभार यांनी सत्यशोधक समाजाचा प्रसार खूप धडाडीने केला. त्यांनी अखंड रचनाही केली आहे.

दुसरा मारेकरी श्री. रोडे हा रामोशी होता. तो जोतिबा-सावित्रीबाई यांचा अंगरक्षक बनला. त्याची सून सावित्रीबाई रोडे सत्यशोधक समाजाची अध्यक्षा झाली. सत्यशोधक समाजाचा विचार या कुटुंबाने पुढे दोन-तीन पिढ्यांत निष्ठेने जतन केला.

मारेकऱ्यांचे हृदयपरिवर्तन घडून नव्या इतिहास निर्मितीला आणि ऐतिहासिक कार्याला चालना देणारा असा प्रसंग इतिहासात तरी अजोड आहे.

## द्विभार्या प्रथेला आचरणातून विरोध

जोतिबा-सावित्रीबाई यांचे वैवाहिक जीवन सुरू होऊन बारा वर्षे होऊन गेली. त्यांच्या वयाने विशी-पंचविशी गाठली. अजूनपर्यंत त्यांना संतती प्राप्त झाली नाही. त्यांच्या आप्तांना आणि मित्र मंडळींना या गोष्टीची खंत वाटत होती. त्यांनी जोतिबा यांना दुसरी पत्नी करण्याचा सल्ला दिला. त्या काळात लग्नाच्या किमान दोन बायका आणि एक किंवा कितीही अंगवस्त्रे बाळगणे प्रतिष्ठेचे मानले जात होते.

जोतिबा फुले यांचे विचार आणि आचार शास्त्रीय होते. लग्न आणि वंश विस्तारासाठी संतती, यांचा संबंध नसावा असे त्यांचे मत होते. वैवाहिक जीवन हे सहजीवन असते. विचार आणि भावसाम्य, सहअस्तित्वाची जाणीव, परस्परांचा सन्मान; यामुळे उच्च दर्जाचा आनंद मिळतो. संतती हा एक आनुषंगिक आनंदाचा अंश आहे. पण त्यासाठी एका पत्नीची उपेक्षा करू नये. तिच्यामध्ये दोष नसेल आणि पुरुषात असेल, तर तिला दुसरा पती करण्याची परवानगी, हा समाज देत नाही. पुरुषप्रधान समाज व्यवस्थेचा हा दोष आहे. स्त्रियांना कमी समजू नये, भेदाभेद करू नये, असे त्यांचे स्पष्ट मत

होते. कारण नसताना पुरुष अनेक बायका करतात. अंगवस्त्रे ठेवतात. नाचगाण्यांना जातात. त्याचप्रमाणे स्त्रियांनी अनेक पुरुषांशी विवाह करून त्याच घरात नवरे आणले किंवा पुरुष ठेवले तर चालतील का? पुरुषांपेक्षा स्त्रिया कष्टाळू, दयाळू, त्यागी आणि सहनशील असतात. सत्यवानाची सावित्री, पतीचा प्राण, यम दरबारातून परत आणते, ही आख्यायिका स्त्रियांचे पतिप्रेम, पतिनिष्ठा व्यक्त करण्यासाठी तयार झाली आहे. पण आपल्या पत्नीचे प्राण परत आणण्यासाठी, एखादा तरी पुरुष यम दरबारापर्यंत तर सोडाच, पण यमदरबाराच्या वाटेपर्यंत तरी जाऊन आला, अशी आख्यायिका आहे का? असा प्रश्न ते उपस्थित करतात. पतीप्रेमासाठी अनेक स्त्रिया स्वखुषीने सती गेल्या, पण पत्नीप्रेमासाठी एखादा तरी पुरुष 'सता' गेला आहे काय? असा उपरोधिक प्रश्न ते उपस्थित करतात.

जोतिबा फुले यांचे सहकारी बापूजी हरी शिंदे यांची तरूण विधवा कन्या ताराबाई शिंदे, बुलढाणा यांनी इ.स.१८८२ मध्ये 'स्त्री-पुरुष-तुलना' हा निबंध लिहून पुरुषप्रधान व्यवस्थेची चिकित्सा; धर्म, धर्मग्रंथ, रूढी, कथा, कादंबऱ्या, नाटके या आधारे केली. जागतिक पातळीवरील पहिल्या स्त्रीवादी लेखिका त्या ठरल्या आहेत. जोतिबा फुले यांच्या स्त्रीवादी विचारांचा विकास सत्यशोधकी परंपरेतील ताराबाई शिंदे यांनी केला.

जोतिबा फुले यांनी दुसरे लग्न करण्याला ठाम नकार दिला. एका विधवा ब्राह्मण स्त्रीचा मुलगा दत्तक घेतला. सावित्रीबाई यांनी आपल्यातील मातृत्त्वभाव खूप व्यापक केला. त्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृहातील मुलांना आणि सुशिक्षणगृह या वसतिगृहातील मुलांना आईचे प्रेम दिले. जोतिबा वाचावीर नव्हते. ते कर्मवीर, कृतिवीर होते. द्विभार्या करण्याची चाल वाईट आहे. त्यातून कौटुंबिक कलह, मानसिक तणाव, आर्थिक समस्या निर्माण होतात. अनेक स्त्री-पुरुषांचे आयुष्य वाया जाते. म्हणून त्यांनी दुसरी पत्नी करण्याचा आग्रह टाळला. भावनिक पातळीवरून प्रश्न न हाताळता वैचारिक पातळीवरून त्यांची सोडवणूक करावी, असे त्यांचे धोरण होते.

## विधवा विवाहास साहाय्य

बाल विवाह प्रथा आणि पुनर्विवाह बंदी यामुळे उच्च वर्ण-जातींमध्ये गर्भपात, भ्रूणहत्या यांसारखे गंभीर सामाजिक गुन्हे सामुदायिक पातळीवर घडत होते. या अनैतिक प्रकाराकडे समाज डोळेझाक करीत होता. या प्रकाराची

वाच्यता झाली तर आपली, आपल्या घराण्याची अब्रू जाईल, प्रतिष्ठा धुळीस मिळेल, कुळाला कलंक लागेल, खानदानीपणाला बट्टा लागेल, ही भीती होती. जवळचे नातेवाईक किंवा शेजारचे लोक तरूण विधवांना मोहजाळात ओढीत होते, किंवा तरूण विधवा; सान्निध्यात येणाऱ्या पुरुषांना भुरळ पाडीत होत्या. शास्त्री, पंडित, पुराणिक, पुजारीही या प्रकारात सहभागी असत. पुढाकार कोणाचाही असला; चूक कोणाचीही असली; तरी निसर्ग त्याचे कार्य पार पाडीत होता.

तरूण विधवा स्त्रियांना सांदीकोपऱ्यात बसायला सांगत. ब्राह्मण विधवांचे केशवपन करण्याची चाल होती. दागदागिने, वस्त्रभूषणे, अलंकार वापरायला बंदी होती. विधवा स्त्रीने विद्रूप दिसावे, आकर्षक दिसू नये, यासाठी ही बाह्य बंधने होती. पण तिच्या तारूण्यसुलभ भावना दाबून ठेवणे शक्य नव्हते. यातूनच व्यभिचार होई. त्या काळात गर्भपाताची, भ्रूणहत्येची काही प्रकरणे गाजली होती. शंकराचार्यांपर्यंत तक्रारी झाल्या होत्या. इंग्रज पोलिस आणि न्यायालयापर्यंतही काही प्रकरणे पोहोचली होती. या सामाजिक रोगावर एकच उपाय होता. विधवांना पुनर्विवाह करण्याची परवानगी देणे. कर्मठ, सनातनी समाज या सुधारणेला मान्यता देत नव्हता. विष्णुशास्त्री पंडित, विष्णुशास्त्री बापट यांसारख्या सुधारकांनी विधवांच्या पुनर्विवाहाला शास्त्राधार काढून दिले. त्यांचा जाहीर प्रसार केला. सनातन्यांचा रोष पत्करला. विष्णुशास्त्री बापट यांनी इ.स. १८४० पासून पुनर्विवाहाचा पुरस्कार केला होता. पण प्रत्यक्ष पुनर्विवाह झाल्याची नोंद नाही. जोतिबा फुले यांनी इ.स. १८५५ मध्ये एका विधूर पाटलाचा आणि विधवा पाटलीणबाईचा पुनर्विवाह घडवून आणल्याची नोंद मराठेशास्त्री नारो बाबाजी महाघट पाटील यांनी त्याच्या म. फुले चरित्रामध्ये केली आहे. त्यानंतर ८ मार्च १८६० रोजी शेणवी जातीतील पुनर्विवाह गोखल्यांच्या बागेत घडवून आणला. २५ जुलै १८५६ रोजी सरकारने विधवा विवाहाचा कायदा केला. त्यामुळे विधवेची इच्छा असेल तर तिला पुनर्विवाह करण्याचे स्वातंत्र्य होते. या कायद्यामुळे तिची मुले तिच्या पतीच्या मालमत्तेमध्ये हक्कदार ठरली. इ.स. १८५७ मध्ये ब्रिटिश संसदेने घटस्फोट देण्याचा स्त्रियांचा हक्क मान्य केला. कायदे करून सुधारणांना गती मिळत नाही. नैतिक बळ मिळते. पण समाजाला अप्रिय वाटणारे कार्य करणाऱ्यांचा छळ होतो.

## बालविवाह प्रथेला विरोध

बालविवाह प्रथेला त्यांचा विरोध होता. मुला-मुलींनी आपल्या जोडीदाराची

निवड करावी. आवडी-निवडी, छंद, विचार यांविषयीची अनुरूपता महत्त्वाची आहे. फक्त देखणेपणा, श्रीमंती पाहू नये, असे त्यांचे मत होते. त्यांचे दत्तकपुत्र यशवंतराव यांचा विवाह हडपसर येथील त्यांचे नातेवाईक आणि सत्यशोधक समाजाचे अनुयायी कृष्णाजी ससाणे यांची कन्या राधा उर्फ लक्ष्मी हिच्याशी जुळविला. त्यांची वये विवाहयोग्य होईपर्यंत ते थांबले. तोपर्यंत राधा ऊर्फ लक्ष्मी हिचे शिक्षण चालू केले. सुधारणा कार्य आचरणात आणणे, इतरांना पटवून देणे, सहकार्य मिळविणे; यामध्ये ते यशस्वी होत होते. सुधारणा टाळण्यासाठी नातेवाईकांच्या भावना, सामाजिक रोष, जातीचा बहिष्कार ही कारणे त्यांनी कधीच पुढे केली नाहीत.

डॉ. यशवंतचा विवाह आंतरजातीयच नव्हे तर आंतरवर्णीय विवाह होता. कृष्णाजी ससाणे यांना त्या काळी फार त्रास झाला. तरीही त्यांनी न डगमगता हा विवाह घडवून आणला.

## केशवपन बंदी

केशवपनाचा प्रश्न फक्त ब्राह्मण जातीतील विधवांचा प्रश्न होता. पती निधनानंतर त्या विधवेचे केस न्हाव्याकडून भादरण्याचा विधी होता. अनेक तरूण विधवा या विधीला विरोध करीत. तिचे केस भादरले नाहीत, तर मृत पतीच्या आत्म्याला सद्‌गती प्राप्त होत नाही, असा समज होता. म्हणून तिचे हातपाय बांधून जबरदस्तीने केस भादरले जात. पुन्हा दरमहा वस्तरा घेऊन न्हावी यासाठी येत असे. यातूनही व्यभिचाराची काही प्रकरणे उद्‌भवली होती. केशवपन प्रथा अनिष्ट आहे. स्त्रियांचा अपमान करणारी आहे. ब्राह्मण विधवा असल्या तरी; त्या कुणाच्या तरी कन्या, बहिणी, माता आहेत. त्यांना सन्मान मिळाला पाहिजे, या व्यापक भूमिकेने हा प्रश्न जोतिबा फुले यांनी हाताळला.

केसांना स्त्री सौंदर्याच्या दृष्टीने महत्त्व आहे. तसेच लोकजीवनात लोकतत्त्वीय दृष्टीनेही महत्त्व आहे. देव-देवतांना विविध प्रकारच्या वस्तू अर्पण करण्याचे नवस बोलले जातात. त्यात केस कापून ते अर्पण करण्याचेही नवस असतात. पतिनिधनामुळे दुःखी झालेल्या ब्राह्मण विधवेवर केस भादरून घेऊन, विद्रूप होऊन; सांदीचे खापर होऊन जगण्याची वेळ येई. ही प्रथा पेशवाईत रूढ झाली. त्यापूर्वी ती महाराष्ट्रामध्ये नव्हती. पेशवाईच्या उत्तर काळात, ब्रिटिश राजवटीत न्हावी आणि ब्राह्मण यांच्यात अनेक वेळा संघर्ष झाले. काही वेळा

न्हाव्यांनी केशवपनावर बहिष्कार टाकला. काही वेळा बहिष्कार टाकणाऱ्या ब्राह्मणांच्या हजामती करण्याला न्हाव्यांनी नकार दिला. या प्रसंगी ब्राह्मणांनी हातात वस्तरे घेऊन केशवपन केले; परस्परांच्या हजामती केल्या. इ.स. १८६० मध्ये पुणे येथे एका न्हाव्याच्या नव्या घराची वास्तुशांती काही भटांनी केली; म्हणून इतर सनातनी ब्राह्मणांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला. केशवपन आणि हजामतीसाठी न्हावी चालतो, तेव्हा त्याचा विटाळ होत नाही आणि न्हाव्याकडील पूजाविधी करताना मात्र शूद्र ठरविले जाते; अशीही संघर्षाची कारणे असत.

इ.स. १८६५ मध्ये पुणे येथे पुरुषांच्या हजामतीचे आणि विधवांच्या केशवपनाचे दर वाढविले, या कारणावरून न्हावी आणि ब्राह्मण यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला. या संधीचा योग्य फायदा घेण्याचे धोरण जोतिबा फुले यांनी आखले. केशवपन प्रथेची अनिष्टता, त्यातील अमानुषता, क्रौर्य यांविषयी न्हाव्यांना समजावून सांगितले. ब्राह्मणांनाही पटवून सांगितले. सुधारक ब्राह्मणांचा अल्पसा पाठिंबा मिळाला. विधवा ब्राह्मण स्त्रियांची सहानुभूती मिळाली. केशवपन प्रथेला कोणत्याही शास्त्रात आधार नाही, ही वस्तुस्थिती त्यांनी समजावून सांगितली. हा प्रश्न आणि संघर्ष प्रदीर्घ काळ गाजत होता. आता काही सुधारक ब्राह्मणही त्यांच्या बाजूने उभे राहत होते. तत्कालीन मोठ्या खपाच्या आणि लोकप्रिय वर्तमानपत्रातून जाहीर चर्चा होत होती. त्यामध्ये मामा परमानंद, न्या. रानडे यांच्यासारखे विद्वान भाग घेत होते. लोकमत विधवांच्या बाजूने अनुकूल होत होते. "विधवेचे जबरदस्तीने केशवपन करणाऱ्या माणसाविरुद्ध जो फिर्याद करील; त्याला कोर्टात खटला चालविण्यासाठी खर्च देण्यात येईल" अशी एकदा 'इंदुप्रकाश'मध्ये जाहिरात आली. आणि ही अशी जाहिरात देणाऱ्याचे; मामा परमानंद यांनी लेख लिहून अभिनंदन केले.

स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर विविध बंधने घालून आपल्या जातीचे श्रेष्ठत्व, खानदानीपणा प्रस्थापित करण्याची चाल फार जुनी आहे. सतिप्रथा, केशवपन, बालविवाह, पुनर्विवाहबंदी, आंतरजातीय आणि प्रेमविवाहबंदी, गोषापद्धती या सर्व प्रथा त्यातूनच रूढ झाल्या आहेत.

तळेगाव ढमढेरे येथे एका न्हाव्याने आपले लग्न सत्यशोधक समाजपद्धतीने लावले. त्या लग्नात ब्राह्मणांनी विघ्न आणले. त्यामुळे चिडून न्हाव्यांनी ब्राह्मणांच्या हजामती करण्याचे नाकारले. पडशी, पंचांग, पळी, पंचपात्री खाली ठेऊन काखेत धोकटी आणि हाती वस्तरा-वाटी घेण्याची वेळ ब्राह्मणांवर आली. या प्रसंगी सुधारकांनी केशवपन न करण्याचे आवाहन न्हाव्यांना केले.

इ.स. १८९० मध्ये मुंबई येथे केशवपन प्रकरणावरून तीव्र वादविवाद झाले. वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने भरून मजकूर प्रसिद्ध होऊ लागला. 'दीनबंधू', 'इंदुप्रकाश', 'इंडियन स्पेक्टेटर', 'सुबोधपत्रिका' या पत्रांनी केशवपनबंदीची बाजू उचलून धरली. १४ एप्रिल १८९० रोजी मुंबईच्या एल्फिन्स्टन माध्यमिक शाळेच्यामागे न्हाव्यांची विराट सभा झाली. सदोबा कृष्णाजी या न्हाव्याने अध्यक्षस्थान भूषवले. या सभेत काळजाला हात घालणारी, हृदय हेलावणारी भाषणे झाली. गद्रे आणि केळकर यांनी पुढाकार घेतला म्हणून सनातन्यांनी त्यांच्यावर शिव्याशापांचा वर्षाव केला. सत्यशोधक कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबईत न्हाव्यांचा संप घडवून आणण्याच्या कामी खूप मेहनत घेतली.

जोतिबा फुले यांनीही पुण्यात न्हाव्याचा संप घडवून आणला होता. त्यांच्यापुढे प्रभावी भाषण केले. केशवपन न करण्याचा निर्धार न्हाव्यांनी केला. या कार्याची दखल अमेरिकेतील स्त्रीमुक्ती चळवळीने घेतली. त्यांनी तार पाठवून जोतिबांचे अभिनंदन केले. मानवमुक्ती, शोषणमुक्तीच्या लढ्याचे महत्त्वाचे अंग म्हणजे स्त्रीमुक्ती चळवळ होय. याचे महत्त्व सत्यशोधक जोतिबा फुले यांनी ओळखले. म्हणून त्यांचे अभिनंदन अमेरिकेतील स्त्रीमुक्ती चळवळीने आणि इंग्रज महिलांनी केले. जोतिबा फुले आणि सत्यशोधकांवर ब्राह्मणद्वेष्टे असा आरोप आजही केला जातो. विधवा ब्राह्मण स्त्रियांसाठी, त्यांना मानवतेची वागणूक आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी; याच मंडळींनी प्रदीर्घ काळ संघर्ष केला, ही भूमिका शंभर नंबरी होती, असे आज काळाने सिद्ध केले आहे.

## भंगी आणि झाडू कामगारांचा संप

जोतिबा फुले आणि सत्यशोधक समाजाचे नेते यांची चळवळ अधिकाधिक उपेक्षित, दुर्लक्षित लोकांपर्यंत पोहोचत होती. त्यांच्याविषयी लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला होता. या समाजातील सामाजिक रोगांचे मूळ कारण वर्ण-जातिभेदाधिष्ठित विषमता आहे. अनेक आर्थिक प्रश्न याच व्यवस्थेने निर्माण केले आहेत. सामाजिक दृष्टीने हलक्या दर्जाची समजली जाणारी कामे शूद्र आणि अतिशूद्रांकडे सोपविली. त्यासाठी मोबदला देण्याची काही व्यवस्था नव्हती. इंग्रजी राजवटीमध्ये संघटना, चळवळी, संप या संकल्पना येथे रुजल्या. निरनिराळ्या भागांमध्ये निरनिराळ्या प्रश्नांवर लढे सुरू होते. लोकांमध्ये जागृती वाढली होती. आपले अधिकार कळले होते. स्वत्व आणि स्वाभिमान निर्माण झाला होता. निरनिराळ्या लढ्यांचे नेतृत्त्व तरूण सत्यशोधक

पुढारी करीत असत. जातिव्यवस्थेमध्ये सर्वात कनिष्ठस्थानी असलेल्या मुंबई नगरपालिकेतील भंग्यांनी इ.स. १८८९च्या जून आणि जुलै महिन्यात त्यांच्या मागण्यांसाठी दोन वेळा संप केला. अलिबाग नगरपालिकेतील भंग्यांनी पगारवाढीची मागणी केली होती. अतिशूद्रांच्या मागण्यांकडे प्रशासन गांभिर्याने पाहत नव्हते.

अलिबाग नगरपालिकेतील झाडू कामगारांना रस्त्यावरील गवत कापण्यास सांगितले म्हणून त्यांनी इ.स. १८८९च्या ऑक्टोबर महिन्यात संप केला. महार जातीचे झाडू कामगार आणि भंगी यांनी एकी करून; ते संयुक्तपणे संपावर गेले. त्यांच्या मागण्या मान्य झाल्यावरच संप मिटला. अन्यायाविरुद्ध संघर्ष करावा, अशी वैचारिक जडणघडण सत्यशोधक चळवळीने केली होती.

## बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना

विधवा, टाकलेल्या बायका; पुराणिक, शास्त्री, कथाडे, बुवा यांच्या नादी लागलेल्या स्त्रिया आणि इतर कारणाने व्यभिचाराची प्रकरणे होत असत. अशा स्त्रिया गर्भपात करीत. तेव्हा आजच्याप्रमाणे गर्भपाताच्या सुविधा नव्हत्या. याबाबत सामाजिक दृष्टिकोनही अनुदार होता. अशा फसलेल्या किंवा फसविल्या गेलेल्या स्त्रिया गर्भपातासाठी काहीतरी अघोरी उपाय करीत. त्यांच्या प्राणावरही संकट येई. काही गरोदर स्त्रिया अनौरस संततीला जन्म देऊन मारून टाकीत किंवा त्या शिशूला कोठेतरी टाकून निघून जात असत. तीर्थांच्या ठिकाणी, मोठ्या शहरात हे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत असत.

जोतिबा फुले सर्व सामाजिक प्रश्नांकडे नैतिक दृष्टीने पाहात असत. असे प्रकार पाहून ते व्यथित होत असत. काशीबाई नावाची एक ब्राह्मण विधवा होती. मर्यादशीलतेने राहणाऱ्या या तरूण सुंदर स्त्रीला शेजारच्या एका कावेबाज शास्त्र्याने मोहपाश टाकून फसविले. ती गरोदर राहिली. शास्त्रीबोवाने बाळाचे पितृत्व नाकारले. तिने गर्भपाताचा प्रयत्न केला. तो फसला. तिने बाळाचा गळा, सुरीने कापून ते सदाशिवराव गोवंडे यांच्या परसातील विहिरीत फेकून दिले. ते फुगून पाण्यावर आल्यानंतर काशीबाईचे कृत्य उघड झाले. ह्या प्रकरणी तिला अंदमानच्या काळ्यापाण्याची शिक्षा झाली. इ.स. १८६३ मध्ये ही घटना घडली. यामुळे गोवंडे आणि जोतिबा व्यथित झाले. अशा स्त्रियांना आधार देण्यासाठी काहीतरी प्रयत्न करावा, असा निर्णय घेतला. त्याचवर्षी जोतिबा फुले यांनी सावित्रीबाई यांच्याशी विचारविनिमय करून

आपल्या राहत्या घराजवळच 'बालहत्या प्रतिबंधक गृह' काढले. "विधवांनो, येथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा. तुम्ही आपले मूल न्यावे किंवा येथे ठेवावे, हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील. त्या मुलांची काळजी हा अनाथाश्रम घेईल." अशा प्रकारची माहितीपत्रके छापून, ती पुण्यात घराघरावर लावली. वाट चुकलेल्या स्त्रियांचे प्राण वाचावेत, जन्माला येणाऱ्या निर्व्याज शिशूंचे संगोपन व्हावे, या उद्देशाने फुले दांपत्याने अनाथाश्रम काढला. हे माणुसकीचे महान कार्य होते. पण यामुळेही त्यांची खूप निंदानालस्ती झाली. त्यांच्यावर घाणेरडे आरोप करून, त्यांचे चारित्र्य कलंकित करण्याचा प्रयत्न केला. सर्व शस्त्रे बोथट झाल्यावर सनातनी मंडळी; चारित्र्य बदनाम करण्याचा प्रयत्न करतात, ही त्यांची फार जुनी खोड आहे, याचा अनुभव ते पंधरा वर्षांपासून घेत होते.

या अनाथाश्रमामध्ये इ.स. १८८४ पर्यंत ३०-३५ बालके जन्माला आली. आलेल्या स्त्रियांची बाळंतपणे व शुश्रूषा स्वत: सावित्रीबाई करीत असत. त्यांच्या मदतीला गंगुबाई नावाची एक वृद्ध ब्राह्मण स्त्री होती. झाडलोट, भांडी, धुणी, सडासारवण इत्यादी हलकी कामे करण्याकरिता मुख्यत: सनातनी ब्राह्मणांना हिणवण्याकरिता, त्यांनी तिला मोठा पगार देऊन मुद्दाम नोकरीवर ठेवले होते. ते तिला आदराने 'माई' म्हणत. आश्रमात जन्माला आलेली बहुसंख्य बालके फार काळ जगली नाहीत. त्यातील ३-४ बालके चार-पाच वर्षे जगली.

इ.स. १८७४ मध्ये एका मामलेदाराची काशीबाई नावाची तरूण विधवा बहीण गरोदर अवस्थेमध्ये आश्रमात आली. ती ब्राह्मण होती. तिचे बाळंतपण सावित्रीबाईंनी स्वत: केले. तिचा अनौरस पुत्र यशवंत; या दांपत्याने दत्तक घेतला. पुढे मालमत्तेसंबंधी कटकटी निर्माण होऊ नयेत, म्हणून जोतिबा फुले यांनी स्वत:चे मृत्युपत्र तयार केले. ते नियमाप्रमाणे निबंधकांच्या कार्यालयात नोंदविले. त्यामध्ये यशवंतराव फुले यांच्या हक्कासंबंधी स्पष्ट नोंद केली.

अनाथाश्रम काढल्यामुळे वाट चुकलेल्या विधवा स्त्रियांचे प्राण वाचतात. भ्रूणहत्या आणि शिशुहत्या टाळता येतात. या कामाचे सामाजिक आणि नैतिक महत्त्व लक्षात घेऊन लालशंकर उमाशंकर याज्ञिक, न्या. म. गो. रानडे यांनी पंढरपूर येथे, अशा प्रकारचे विधवांसाठी सूतिकागृह काढण्याचा निर्णय घेतला. जोतिबा-सावित्रीबाई यांनी चालविलेला विधवाश्रम आणि बालहत्या प्रतिबंधक गृह त्यांनी स्वत: येऊन पाहिले. प्रार्थना समाजाच्यावतीने पंढरपूर या

तीर्थयात्रेच्या ठिकाणी तशाच धर्तीवर अनाथाश्रम काढला. तो आजही अस्तित्वात आहे. त्यानंतर विविध तीर्थयात्रा, धार्मिक स्थळे, मोठ्या शहरातून असे आश्रम निघाले. शासनानेही अशा कामाला आर्थिक साहाय्य देण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्याच काळात जोतिबांनी 'विधवांची भयानक अवस्था' या नावाची एक लहानशी पुस्तिका प्रसिद्ध केली होती, अशी आठवण महाघटशास्त्री यांनी लिहिली आहे. ती पुस्तिका उपलब्ध झालेली नाही.

## छत्रपती शिवाजीराजे यांच्या समाधीचा जिर्णोद्धार

छत्रपती शिवाजीराजे भोसले यांच्याविषयी जोतिबा फुले यांच्या मनात अपार आदरभाव होता. ते त्यांना 'कुळवाडी भूषण', 'शूद्रातिशूद्रांचा राजा', 'शूद्रातिशूद्रांना जाणीव देऊन क्षत्रियत्वाचे भान देणारा रयतेचा राजा' असे गौरवाने म्हणतात. त्यांनी 'छ. शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' लिहिला. त्यामध्ये वस्तुनिष्ठ इतिहासाची मांडणी केली. देवीचा आशीर्वाद आणि तलवार, रामदास आणि दादोजी कोंडदेव यांचे गुरूत्व, गोब्राह्मण प्रतिपालक या प्रचलित दंतकथांना नकार दिला. उच्चवर्णीय मंडळींनी स्वार्थासाठी निर्माण केलेल्या दंतकथांना इतिहास म्हणून मान्यता देण्याच्या सामाजिक मानसिकतेला त्यांनी धक्का दिला. शूद्रातिशूद्र, कष्टकरी सोबत्यांना संघटित करून अन्यायी राज्यसत्तेला छ. शिवाजी महाराज यांनी विरोध केला. राजे, सरंजामदार आणि उच्चवर्णीय यांच्या अन्यायाला विरोध करणारा हा शूर, पराक्रमी, धाडसी, प्रजाहितदक्ष असा असामान्य राजा होता. मराठे, कुणबी, माळी, धनगर, आग्री, कोळी, मुसलमान यांनाही सत्तेत वाटा दिला. बळी वंशातील हा महत्त्वाचा दुवा होता; म्हणून त्यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी ते पुण्याहून रायगडावर गेले. त्या विस्तीर्ण परिसरात फिरून समाधीचा शोध घेतला. तिथे खूप झाडेझुडपे वाढलेली होती. त्यांनी ती काटेरी झुडपे तोडून-उपटून टाकली. थोड्या वेळाने पुजारी आला. 'येथे तुम्ही का निगा करीत आहात?' असा जाब विचारला. त्यांनी त्याच्याशी बोलून, त्याला समजावून सांगितले. समाधी धुवून काढून त्यावर आदराने फुले वाहिली. तरीही त्या उच्चवर्णीय पुजाऱ्याने उर्मटपणाने ती फुले लाथेने उडवून दिली. जोतिबा फुले यांनी त्याची कान उघाडणी केली.

पुणे येथे येऊन काही मंडळींची बैठक घेतली. रायगड येथील समाधीस्थानाच्या दुरवस्थेची माहिती दिली. त्यानंतर 'शिवजयंती महोत्सव मंडळ' स्थापन करावे, असा विचार पुढे आला. इ.स. १८६७ मध्ये या विचाराला मूर्त स्वरूप

आले. याप्रमाणे शिवजयंती उत्सवाचे महत्त्व ओळखून, तो उत्साहाने साजरा करण्यात पुढाकार घेण्याचे श्रेय सत्यशोधक जोतिबा फुले यांच्याकडे जाते.

## 'जातिभेदविवेकसार'चे प्रकाशक

वर्णजातिव्यवस्थेतून निर्माण झालेली विषमता, उच्चनीच भेदभावातून निर्माण होणारा अहंकार, यामुळे समाजातील फार मोठ्या लोकसंख्येचा होणारा अपमान प्रत्येक विचारी आणि संवेदनाशील मनाला अस्वस्थ करीत होता. ब्राह्मणी धर्ममध्ये सुधारणा करण्यासाठी ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज, मानवसभा, परमहंस मंडळी अशा सभा आणि मंडळी पुढे येत होती. वर्णजातिव्यवस्थेला शास्त्रांमध्ये आधार नाही. ही व्यवस्था कृत्रिम आणि मानवनिर्मित आहे; अशी मांडणी प्राचीन काळापासून आपल्या देशात झाली आहे. सुधारणा कार्याला शास्त्रीय आधार देण्यासाठी त्या काळात ग्रंथ निर्मिती होऊ लागली. तत्त्ववैचारिक मांडणी करणारे खंडन-मंडनात्मक शास्त्रीय लेखन होणे आवश्यक होते. असे लेखन करणारे अभ्यासक कमी होते. त्यातही लेखन करण्याचे धाडस करणारे कमी होते. आणि लिहिलेच तर कोणी प्रकाशित करावयाचे, हा प्रश्न होता. कारण या सर्वांचा छळ होत होता. त्यांची निंदानालस्ती होत होती. अशाही प्रतिकूल परिस्थितीमध्ये तुकाराम तात्या पडवळ या भंडारी समाजात जन्मलेल्या धनिक गृहस्थाने धाडस केले. प्रतिकूल परिस्थितीशी झगडून मराठी, इंग्रजी आणि संस्कृत भाषेत त्यांनी प्रगती केली. रेल्वे खात्यात आणि वॉलकॉट कंपनीत नोकरी केली. नंतर 'एस. नारायण आणि कंपनी' या नावाचा स्वतंत्र उद्योग सुरू केला. मुंबईतील थिऑसॉफी आणि होमिओपॅथीचे ते अग्रदूत मानले जातात. १९व्या शतकातील सामाजिक आणि वैचारिक चळवळीत ते सक्रिय सहभाग घेत होते. ते प्रार्थना समाजाशी संबंधित होते. जोतिबा फुले यांचे ते मित्र होते.

तुकाराम तात्या पडवळ यांनी 'तत्त्वविवेचक ग्रंथ प्रसारक मंडळी' स्थापन करून ख्रिस्ती मिशनऱ्यांचे हिंदू धर्मावरील हल्ले परतविण्यासाठी संतकाव्ये आणि चरित्रे प्रकाशित केली. "सर्व जग देवांच्या स्वाधीन, ते देव मंत्रांच्या स्वाधीन, ते मंत्र ब्राह्मणांच्या स्वाधीन; म्हणून ब्राह्मण हेच सर्वांचे दैवत होय. पृथ्वीमध्ये सर्व तीर्थे आहेत. ती समुद्राच्या ठायी आहेत, आणि समुद्रातील सर्व तीर्थे ब्राह्मणांच्या उजव्या पायात आहेत. म्हणून त्यांचे पाय धुवून, ते पाणी तीर्थ म्हणून सर्वांनी प्यावे. विवादामध्ये ब्राह्मणांवर कोणीही विजय मिळवू नये. ब्राह्मणांची संपत्ती विषाप्रमाणे असते, (सबब ती कोणीही घेऊ नये.)"

याप्रमाणे मंत्र तयार केले. विद्याबंदी केली. ज्ञानाची कवाडे बंद करून ठेवली. चर्चा, वादविवाद, शंका, संशोधन, चिकित्सा यावर बंदी आणली. पर्यटन निषेधार्ह मानले. स्वत:चे स्तोम माजविले. याचा परिणाम असा झाला की, हिंदुधर्मीय समाजाला अवकळा आली. प्रगती, विकासाला खीळ बसली. म्हणून जातिभेदाचे खंडन करून माणुसकीचा पुरस्कार करणारा साधार ग्रंथ तुकाराम तात्या पडवळ यांनी 'एक हिंदू' या टोपणनावाने इ.स. १८६१ मध्ये प्रकाशित केला. या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशक जोतिबा फुले यांचे हितचिंतक वासुदेव बाबाजी नवरंगे हे होते. 'जातिभेदाचे वास्तविक स्वरूप आणि त्यापासून होणारे विपरित सामाजिक परिणाम' हा ग्रंथाचा विषय होता. 'हा ग्रंथ हिंदुधर्मद्रोही आहे आणि लेखक घरभेदी आहे' असा या ग्रंथावर आरोप झाला. खूप आगपाखड झाली. सनातन्यांनी चिडून आक्रमक भूमिका घेतली. या ग्रंथाची पहिली आवृत्ती संपल्यानंतर, दुसरी आवृत्ती काढण्याचे धाडस कोणताच प्रकाशक करीत नव्हता. इ.स. १८६५ मध्ये दुसरी आवृत्ती काढताना, जोतिबांनी त्यांचे नाव प्रकाशक म्हणून छापण्यासाठी संमती दिली.

'हिंदुजनांना जातिभेदापासून मुक्त करणे, यापेक्षा दुसरे महत्त्वाचे धार्मिक कृत्य कोणतेच नाही.', असे या आवृत्तीच्या प्रस्तावनेत लेखकाने नमूद केले होते.

"ज्ञानमेवाश्रयेद्विद्वान जातिदोषविनाशयेत ।
जातिदु:खविनाशेन सर्वदु:खविनाशनं ॥

(पद्मपुराण, सह्याद्रीखंड, अ. ४; श्लो. ७५) हा श्लोक मुखपृष्ठावरच उद्धृत केला होता. संस्कृत ग्रंथातील आधार देऊन, लेखकाने जातिभेदांचे खंडन केले म्हणून जोतिबा फुले यांनी या ग्रंथाची मौलिकता ओळखून, स्वत:चे नाव प्रकाशक म्हणून छापले. प्रार्थना समाजाचे मामा परमानंद, वासुदेव बाबाजी नवरंगे, तुकाराम तात्या पडवळ आणि जोतिबा फुले यांची वैचारिक मैत्री होती. हाच वैचारिकतेचा धागा प्रार्थना समाजाचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी पुढे टिकविला.

## पितृछाया हरवली

जोतिबा-सावित्रीबाई यांच्या कार्याचा विस्तार वाढत होता. विविध प्रकारचे सामाजिक कार्य, चळवळी, सभा, प्रचारदौरे, ग्रंथलेखन, प्रकाशन अशा सर्व आघाड्यांवर त्यांच्या गरूडझेपा सुरू होत्या. त्यांचा त्याग, सचोटी, प्रामाणिकपणा, सत्याविषयीची निष्ठा सिद्ध होत होती. प्रसिद्धी आणि लोकप्रियता वाढत होती.

राजमान्यता आणि लोकमान्यता प्राप्त झाली होती. ते अनेक दिव्यातून पार पडले. त्यांच्याभोवती एक वलय निर्माण झाले. हितचिंतक, अनुयायी यांची संख्या वाढू लागली. तनमनधनाची मदत मिळू लागली. पण त्यामुळे सनातनी मंडळी जोतिबांचा, त्यांच्या अनुयायांचा छळ करीत होती. त्यांच्या नातेवाईकांनाही या वैरभावाचे चटके बसत होते. वडील गोविंदराव फुलेही त्यांच्या कचाट्यातून सुटले नाहीत. जोतिबा-सावित्रीबाईंना सनातन्यांच्या दबावामुळे घरातून बाहेर काढल्यानंतर ते राजाराम या मुलासोबत राहत होते. पुन्हा पुन्हा त्यांना जोतिबा-सावित्री यांच्या कामाविषयी आपलेपणा वाटू लागला. ते चांगलेच काम करीत आहेत, याविषयी त्यांची खात्री पटली. इ.स. १८६८ मध्ये त्यांचे निधन झाले. यामुळे त्यांचा मानसिक आधार नाहीसा झाला.

वडिलांच्या निधनानंतर कोणताही वैदिक विधी किंवा पारंपरिक कर्मकांडे केली नाहीत. ब्राह्मणांना बोलावले नाही. ब्राह्मणभोजन न देता अंध, अपंग, अनाथ, अतिशूद्र यांना मिष्टान्न भोजन दिले. गरीब विद्यार्थ्यांना पाट्या, पेन्सिली, पुस्तके वाटली. वर्षश्राद्धाचे कार्यक्रमही याच पद्धतीने पार पाडले. धार्मिक कार्यामध्ये, समारंभांमध्ये ब्राह्मण-पुरोहित या मध्यस्थांची गरज नाही, अशी त्यांची भूमिका होती. त्या त्या प्रसंगी त्यांनी तसे आचरण केले. कोणी निंदा करोत की स्तुती करोत, मानापमानाची तमा केली नाही. कृतीला महत्त्व दिले.

## अस्पृश्यांसाठी हौद खुला केला

पुणे येथील गंजपेठ, मीठगंज, कसबापेठ, शनिवारपेठ या भागात शूद्रातिशूद्र जातींची संख्या जास्त होती. त्या वेळी पुणे नगरपालिकेमध्ये ब्राह्मण सदस्यांची संख्या जास्त होती. अधिकारी आणि कर्मचारीही ब्राह्मण होते. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पाणी पुरवठा, रस्ते या सर्व नागरी सुविधा नानापेठ, सदाशिवपेठ या ब्राह्मणांची संख्या अधिक असलेल्या भागातच मुबलक प्रमाणात उपलब्ध होत्या. त्या काळी पुण्यामध्ये श्रीमंत, बड्या असाम्यांच्या वाड्यांपुढे मोठमोठे हौद बांधलेले होते. नगरपालिकेच्या नळाचे पाणी त्या हौदात साठविले जाई. स्वतः वापरल्यानंतर उरलेले पाणी ते इतरांना घेऊ देत असत. तेव्हा सोवळे-ओवळे, शिवाशिव सांभाळण्यासाठी फक्त गरीब ब्राह्मणांना ते पाणी वापरता येत असे. अस्पृश्यांचे पाण्यावाचून हाल होत होते. हे सर्व अस्पृश्य स्त्री-पुरुष, जोतिबा-सावित्रीबाई यांना मदत करतात म्हणून सर्वच ब्राह्मणांचा त्यांच्यावर राग होता. त्या हौदातील पाणी त्यांना कोणी वाढीत नसत. पाणी सोडणारे नगरपालिकेचे ब्राह्मण कर्मचारी शूद्रातिशूद्रांच्या

भागात पुरेसा पाणीपुरवठा करीत नसत. हौदातील साठविलेले पाणी अस्पृश्यांना शेंदून वाढावे लागायचे. अस्पृश्यांचीच एवढी सेवा स्पृश्यांनी कशी करावयाची? तेवढा वेळ कोणी द्यावयाचा? परिणामी पाण्यावाचून अस्पृश्यांचे हाल होत होते. अस्पृश्यही माणसे आहेत. त्यांना पाणी मिळाले पाहिजे. पाण्यालाच जीवन म्हणतात. जोतिबा फुले यांनी त्यांचे अंत:करण जाणले. त्यांच्याही वाड्यापुढे मोठा बांधलेला हौद होता. इ.स. १८६८ मध्ये हा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला. या कामी सावित्रीबाई यांचा पुढाकार होता. त्यांनी आपापल्या हाताने पाणी शेंदून न्यावे; त्यांचा बाट पाळला जाणार नाही; असे जाहीर केले. स्वत: पाणी शेंदून ते, पिण्याचा आनंद कितीतरी पिढ्यानंतर या अस्पृश्यांना मिळाला. सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत, असे उदात्त तत्त्वज्ञान सांगणारे उच्चवर्णीय, अमंगळ भेदाभेद करीत होते. जोतिबांनी आपल्या अनुभवाला गुरू मानले आणि आपल्याच विवेकाशी वादविवाद केला.

## अस्पृश्यताविरोधी जाहीरनामा

इ.स. १८७२ मध्ये तर त्यांनी उघड उघड अस्पृश्यताविरोधी जाहीरनामा प्रकाशित करून तत्कालीन वृत्तपत्रांकडे प्रसिद्धीसाठी पाठविला. "जे दास (शूद्र) फक्त आपल्या उत्पन्नकर्त्यास मानून नीतीस अनुसरून स्वच्छ उद्योग करण्याचा निश्चय करून त्याप्रमाणे आचरण करीत आहेत, अशी त्याजविषयी माझी खात्री झाल्याबरोबर, मी त्यास केवळ आपल्या कुटुंबातील बांधवांप्रमाणे समजून त्याजबरोबर अन्नव्यवहार करीन, मग तो कोणत्याही देशातील असो." हे पत्रक ब्राह्मणी पत्राने प्रसिद्ध केले नाही. काही ब्राह्मणी वृत्तपत्रांनी त्यांची निंदा केली. मात्र कोल्हापूर येथील 'शुभवर्तमानदर्शक व चर्चसंबंधी नानाविधसंग्रह' या ख्रिस्ती पत्राने जात्यातीत भूमिकेची स्तुती करून ते १ फेब्रुवारी १८७३च्या अंकामध्ये प्रसिद्ध केले.

## सत्यशोधक समाजाची स्थापना

तळागाळांतील कष्टकरी, शेतकरी, बलुतेदार, आलुतेदार, भटके स्त्री-पुरुष यांच्या दु:खमुक्तीचा ध्यास घेऊन, विविध प्रकारची कामे जोतिबा फुले यांनी हाती घेतली आणि यशस्वी केली. वर्णजातिव्यवस्था आणि स्त्रीदास्याचा अंत झाल्याशिवाय हा समाज सामाजिक गुलामगिरीतून मुक्त होणार नाही. धर्माच्या पडद्याआड येथे दासानुदास निर्माण केले जातात, हे सत्य समजण्यासाठी समाजाला ब्राह्मणी ग्रंथ वाचता आले पाहिजेत. ग्रंथ वाचल्यानंतर त्यांना

सत्यासत्य यातील भेद कळेल. पुरोहितवर्ग स्वत:च्या स्वार्थासाठी असत्य हेच सत्य आहे; अन्याय हाच न्याय आहे; असे सांगतो आणि हे अक्षरशत्रू लोक त्यावर विश्वास ठेवतात. म्हणून जोतिबा फुले यांनी शाळा काढून विद्येचा प्रसार केला. पुनर्विवाह घडवून आणले, केशवपनाला विरोध केला. धार्मिक कार्यात दलाल नको, अशी भूमिका घेतली. अस्पृश्यतेविरुद्ध जाहीर पत्रक काढले. परशुरामाला जाहीर आव्हान दिले. या चळवळीत नव विचारांची बीजे होती. नैतिकतेचे अधिष्ठान होते. माणूसकीचा ओलावा होता. कारूण्याचे झरे होते. सत्याची चाड, मानवी कल्याणाविषयी प्रीती आणि सौंदर्याची आवड होती. या विचारांच्या प्रसारासाठी ते पुणे, भांबुर्डे, कोथरूड, हडपसर, सासवड, सातारा, लोणावळा, ठाणे, मुंबई, जुन्नर, ओतूर, भीमाशंकर, कोकण, बडोदे, कर्नाटक आणि आंध्रप्रदेशाच्या काही भागांत त्यांचे दौरे झाले.

या विचारांभोवती कार्यकर्ते आणि अनुयायी यांचे आग्यामोहोळ तयार झाले. खंदे, तरूण, तडफदार नेते तयार झाले. हा विचार संघटित चळवळीच्या रुपाने खेड्यापाड्यांत सर्वदूर पोहोचणे आवश्यक होते. लोकांची तशी मागणी होती. धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्याची मागणी असल्यामुळे, त्या त्या क्षेत्रातील प्रस्थापितांचा त्यांना विरोध होता. तरीही एखादी व्यापक संस्था स्थापन करावी, असा निर्णय समविचारी मित्रांनी घेतला. महाराष्ट्रातील निवडक मंडळींना आमंत्रणे पाठविली. २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे सुमारे साठ प्रमुख मंडळी उपस्थित झाली. एका मध्यवर्ती संस्थेच्या आवश्यकतेवर भर देणारी प्रभावी भाषणे झाली. इतरांनीही आपापले विचार मांडले. संस्थेच्या नावाविषयी सविस्तर चर्चा होऊन 'सत्यशोधक समाज' हे नाव निश्चित झाले. सत्याचा शोध घेणे, सार्वजनिक सत्याचा आग्रह धरणे, सत्याच्या अनेक बाजू, अनेक पैलू, अनेक शक्यता लक्षात घेणारी ही संस्था म्हणून 'सत्यशोधक समाज' हे अन्वयार्थक नाव सर्वांनी संमत केले. सत्याचा शोध विवेकनिष्ठ, नैतिक भूमिकेने, सामुदायिक पातळीवरून घ्यावयाचा, म्हणून 'समाज' हे पद त्या नावात समर्पक आहे.

## सत्यशोधक समाजाची तत्त्वे

अ) सर्व मनुष्ये एकाच ईश्वराची लेकरे आहेत व तो सर्वांचा मायबाप आहे.

आ) आईला विनवण्यास किंवा बापाला संतुष्ट करण्यास लेकराला जशी मध्यस्थाची गरज नसते, तसेच भक्तांना ईश्वराची ओळख करून

देण्यासाठी व प्रसन्न करून घेण्यासाठी उपाध्याय किंवा धर्मगुरू असल्या मध्यस्थाची (दलालाची) जरूरी नाही.

इ) हे तत्त्व ज्यांना मान्य आहे, तो सत्यशोधक समाजियन होय.

## सत्यशोधक समाज : प्रवेश व प्रतिज्ञा

सत्यशोधक समाजाचा प्रवेशविधी निश्चित केला होता. सत्यशोधक समाजात प्रवेश घेणारे सभासद वारकरी परंपरेत वाढलेले; खंडोबा, जोतिबा या लोकदैवतांवर श्रद्धा असणारे कष्टकरी होते. त्या काळातील उच्चशिक्षित मंडळींनी स्थापन केलेल्या इतर संस्थेचे विधी पाश्चात्त्य वळणाचे होते. जोतिबा फुले यांनी लोकदैवतांचे मानुषीकरण केले. सर्व लोकदेव क्षत्रिय, शूर, पराक्रमी, प्रजाहितदक्ष राजे किंवा कारभारी होते, अशी मांडणी केली. खंडोबापुढील बेलभंडारा आणि तळी उचलण्याचा, हा विधी पुढीलप्रमाणे होत असे. एका पिशवीमध्ये हळद, खोबरे ठेवले जाई. बाजूला विड्याची पाने, सुपारी ठेवली जाई. "येळकोट येळकोट जयमल्हार, खंडोबाचा चांगभला, भैरोबाचा चांगभला" असा उद्घोष करून ती बेलभंडाराची पिशवी उचलावी लागे. त्या पिशवीत गुलाल, गुळाचा खडा, धणे ठेवलेले असत. यालाच 'तळी' म्हणतात. या विधीला लोकजीवनात फार महत्त्व आहे. एखादी प्रतिज्ञा करून तळी उचलली म्हणजे प्राण गेला तरी प्रतिज्ञा मोडू द्यावयाची नाही, असा निर्धार होता. जोतिबा हे खऱ्या अर्थाने क्रांतिकारी तत्त्वज्ञ होते तसेच लोकनेते होते. लोकांच्या विचारभावनांची स्पंदने त्यांना अचूक कळली होती. तळी उचलल्यानंतर सभासदाचे नाव रजिस्टरमध्ये नोंदवीत असत. सभासद होताना पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा करावी लागे. "सर्व मनुष्य एकाच ईश्वराची लेकरे आहेत. त्यांचे व माझे बंधुत्वाचे नाते आहे, हे जाणून वागण्याचा मी नित्य प्रयत्न करीन. देवाची भक्ती, उपासना वगैरे करताना तसेच धर्मविधी करताना मी कोणाही मध्यस्थाची जरूर ठेवणार नाही व असे वागण्याविषयी मी इतरांचे मन वळविण्यास झटेन. मी स्वत: शिकून मुलामुलींस विद्या शिकविल्याशिवाय राहणार नाही. राज्यकर्त्यांशी एकनिष्ठेने वागेन, अशी सर्वसाक्षी सत्यस्वरूप परमात्म्याला स्मरून मी प्रतिज्ञा करतो. हा माझा पवित्र उद्देश सिद्धीस नेऊन जन्माचे सार्थक करण्यास परमेश्वर मला सामर्थ्य देवो." ही प्रतिज्ञा इ.स. १८९१ मध्ये बालीवाला थिएटर, पुणे येथे भरलेल्या सत्यशोधक समाजाच्या सभेत मंजूर केली आहे. प्रतिज्ञेच्या शब्दात फेरफार होत गेले. मात्र मूळ आशय नेहमी तोच राहिला आहे. या प्रतिज्ञेतील राजनिष्ठेसंबंधीचा भाग नेहमीच विवाद्य

ठरलेला आहे. इंग्रजी राजवटीमध्ये ब्राह्मणेतर जातींना स्वत:चा विकास करण्याची संधी आहे. पेशवाईत मनूचे कायदे अमलात होते. म्हणून जोतिबा फुले आणि त्यांचे सहकारी इंग्रजी राजवटीचे स्वागत करीत होते. इंग्रजी राजवटीचे स्वागत लोकहितवादी, दादाभाई नौरोजी, न्या. म. गो. रानडे, नाम. गोपाळ कृष्ण गोखले यांनीही केले. बा. गं. टिळक यांनीही प्रारंभी या राजवटीच्या चांगुलपणाचा उल्लेख करून स्वागत केले. अन्यायी पेशवाई राजवटीच्या पार्श्वभूमीवर इंग्रजी राजवट सर्वसामान्य लोकांना आणि तत्कालीन उच्चविद्याविभूषित मंडळींना स्वागतार्ह वाटली. त्यांनी कायदे केले, कायद्यापुढे सर्वांना समान दर्जा दिला. सर्वांना शिक्षणाचा अधिकार, वैयक्तिक विकासाला प्राधान्य, संघटनेचा अधिकार, वर्णजातिलिंगभेदनिरपेक्ष समानसंधी या तत्त्वामुळे सत्यशोधकांनी या राजवटीशी एकनिष्ठ राहण्याचे धोरण ठरविले. ही राजवट कायमच येथे राहणार नाही, आज ना उद्या लोक शहाणे होऊन राजकीय स्वातंत्र्याची मागणी करतील, याची जाणीव त्या सर्वांना होती.

सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष आणि खजिनदार जोतिबा फुले होते. नारायण गोविंदराव कडलक यांची पहिले कार्यवाह म्हणून निवड झाली. भट, सावकार, इंग्रज सरकारचे काळेगोरे अधिकारी यांच्याकडून होणाऱ्या शोषणाला आणि अन्यायाला विरोध, मानवी हक्कांची शिकवण आणि मानसिक व सामाजिक गुलामगिरीतून बहुजनांची मुक्तता; हा सत्यशोधक समाजाचा त्रिसूत्री कार्यक्रम होता. सत्यशोधक समाजाच्या विचारांचा प्रभाव महाराष्ट्राच्या समाज जीवनावर कायम स्वरूपी राहिला आहे.

खंडोबा, भैरोबा, जोतिबा, शंकर, विठोबा, आसरा, लक्ष्मीआई, जाणाई, जोखाई या देव-देवतांची उपासना करणारा समाज वृत्तीने सात्त्विक आणि सदाचरणी आहे. उत्पादक श्रम करून संपत्ती, ऐश्वर्य आणि सौंदर्याची निर्मिती करणे, हेच जीवनाचे सार्थक आहे, अशी त्यांची निष्ठा आहे. विद्रोही वारकरी संत तुकाराम आणि इतर संतांच्या शिकवणुकीने त्यांच्या विचारभावनांचे पोषण झाले आहे. देहू, आळंदी, जुन्नर, ओतूर, सासवड, सातारा, सोलापूर, मराठवाडा, पुणे परिसरातील लोकांना सत्यशोधक विचार पटले, म्हणून ते सत्यशोधक समाजाचे अनुयायी झाले. सत्यशोधक समाजाच्या जमाखर्चाचे काम गोविंद गणपतराव काळे यांच्याकडे सोपविले होते. सत्यशोधक समाजाच्या बैठका वेताळपेठेतील रामचंद्र मनसाराम ढवारे नाईक यांच्या दोन मजली हवेलीमध्ये होत असत. हे गृहस्थ सुप्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर होते. ते सत्यशोधक समाजाचे सभासद नव्हते; तरीही त्यांनी आपली हवेली, सवलतीचे भाडे

आकारून समाजाला दिली. डॉ. विश्राम रामजी घोले, हे त्या काळातील नामांकित शल्यविशारद आणि शल्यचिकित्सक होते. त्यांच्या प्रयत्नामुळे ही जागा भाड्याने मिळाली. सत्यशोधक समाजाला असंख्य मान्यवर धनिक मंडळी हितचिंतक म्हणून, विविध प्रकारचे सहकार्य करीत होती. जोतिबांनी त्यांच्या घरावर 'सत्यमेव जयते' अशी सुवर्णाक्षरे लिहिलेले तांबड्या रंगाचे निशाण लावले होते.

२४ सप्टेंबर १८७५ रोजी सत्यशोधक समाजाचा पहिला वार्षिकोत्सव मोठ्या उत्साहाने आणि थाटामाटाने साजरा केला. पुणे आणि सभोवतालचा परिसर, ठाणे, मुंबई येथे सत्यशोधक समाजाचे काम वाढले होते. जोतिबांना तिकडून बोलावणे आले होते. प्रचार दौरे यशस्वी झाले. सभासद संख्या वाढली होती. सत्यशोधक समाजाच्या झेंड्याची भव्य मिरवणूक काढून शक्तिप्रदर्शन करणे गरजेचे होते. सनातन्यांच्या बालेकिल्ल्यात गुडीपाडव्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढली. पुणे, मुंबई आणि आजूबाजूच्या खेडेगावातील खूप लोक आले होते. सत्यशोधक समाजाचा झेंडा वाडी-रत्नागिरीच्या जोतिबादेवाच्या काठीप्रमाणे होता. एका उंच बांबूला पिवळ्या रंगाच्या खादीचा कपडा गुंडाळलला होता. काठीच्या टोकाला पिवळे, हिरवे आणि पांढरे पागोटे बांधलेले होते. त्या पागोट्यांचे शेमले लोंबकळत ठेवले होते. त्यावर भंडार, गुलाल, कुंकू, बुक्का उधळला होता. फुले, लिंबू, खोबरे, नारळ, विड्याची पाने वगैरेंच्या माळा बांधल्या होत्या. भर उन्हात ही मिरवणूक निघाली होती, तरीही त्यामध्ये प्रचंड जनसमुदाय उल्हासाने सहभागी झाला होता. एक नवा चैतन्यदायी अनुभव त्यांना येत होता. या मिरवणुकीमध्ये न्या. म. गो. रानडे, सदाशिवराव गोवंडे यांच्यासारखे अनेक सन्माननीय हितचिंतक भरउन्हातून मिरवणुकीत चालत होते. या मिरवणुकीमध्ये विघ्न निर्माण करण्याचा सनातन्यांनी विचार केला. मिरवणुकीतील संख्या प्रचंड होती. ते सगळे कष्ट करणारे, धष्टपुष्ट लोक होते. तालमीतील पहिलवान होते. सरकारदरबारी राजमान्यता आणि लोकमान्यता असलेले प्रतिष्ठित मान्यवर होते. शूद्रातिशूद्र होते. त्यांना खवळणे आपल्या खूपच अंगलटीला येईल. यातून काहीही वाईट निष्पन्न होईल, या सार्थ भीतीपोटी त्यांनी तो कुविचार सोडून दिला. मिरवणुकीनंतर मोठी जाहीर सभा झाली.

अशी ही प्रचंड मिरवणूक इ.स. १८८५ मध्येही काढली होती.

त्या काळात, सत्यशोधक समाजाएवढे सभासद आणि अनुयायी दुसऱ्या

कोणत्याही संस्थेत नव्हते. हे सर्व अनुयायी सरकारी नोकर, गुत्तेदार, व्यावसायिक, शेतकरी, मिस्त्री इत्यादी काम करणारे बहुजन जातींतील होते. अस्पृश्य जातींची संख्या लक्षणीय होती. स्त्रिया समाजाच्या कार्यात पुरुषांच्या बरोबरीने सहभागी झाल्या होत्या. सर्वात गरीब, कष्टकरी, उपेक्षित व्यक्ती ही सत्यशोधक समाजाने केंद्रबिंदू मानला. अन्यायग्रस्ताला अन्यायाची जाणीव करून दिली तर तो न्यायासाठी, संघर्षासाठी तयार होतो. रस्ता हे लोकन्यायालय आहे, हे सत्य प्रस्तुत समाजाने प्रस्थापित केले.

## महर्षी दयानंद यांच्या मिरवणुकीला संरक्षण

महर्षी दयानंद सरस्वती यांनी इ.स. १८७५ मध्ये आर्य समाजाची स्थापना केली. वेद हे ईश्वरनिर्मित, अपौरुषेय नाहीत. ते मानवनिर्मित आहेत. वर्णजातिभेद, अस्पृश्यता निसर्गनिर्मित नाहीत, अशी आर्यसमाजाने मांडणी करताच सनातन्यांनी विरोध केला. ब्राह्मणी मूल्यव्यवस्थेच्या विरोधात महर्षी दयानंद भाषणे करीत होते. त्यांच्या भूमिकेतील मौलिकता ओळखून लोकहितवादी आणि न्या. म. गो. रानडे यांनी त्यांना महाराष्ट्रात मुंबई आणि पुणे येथे आमंत्रित केले. मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना करून जुलै १८७५ मध्ये ते पुणे येथे आले. त्यांची जातिभेद आणि अस्पृश्यताविरोधी भाषणे बंगाल आणि उत्तर भारतामध्ये खूप गाजली होती. त्यांच्या विचारांचा देशातील फार मोठमोठ्या व्यक्तींवर प्रभाव पडला होता. ते पुणे येथे कोणती भूमिका मांडतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. सनातनी तर अगोदरपासूनच दातओठ खात होते.

पुणे येथे पेशवाई सत्ता असल्यामुळे ब्राह्मणी वर्चस्वाचा प्रभाव समाज जीवनावर खूपच जाणवत होता. ब्राह्मणांच्या—त्यातही चित्पावन ब्राह्मणांच्या मनात आपण राज्यकर्ते होतो आणि आणखीही राज्यकर्ते होऊ ही भावना जागती होती. मनुस्मृतीचे कायदे इंग्रज राजवटीतही प्रत्यक्षाप्रत्यक्ष अमलात होते. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाजाचे विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचले नव्हते. सत्यशोधक समाजाची स्थापना होऊन दोन वर्षेही झाली नव्हती. त्यांनी लोकांच्या मनाची परिवर्तनाला अनुकूल अशी मशागत सुरू केली होती. आर्य समाजाची नुकतीच स्थापना झाली होती.

पुण्यातील सनातन्यांना मनुशंकराचार्यांच्या विचारांचे फार आकर्षण वाटते. त्याविषयी बोलणे, ऐकणे हा त्यांच्या आवडीचा, आदराचा भाग असतो. त्यांना सुधारणा आणि क्रांतिकारी विचारांची नेहमीच भीती वाटते. त्यांची; धर्मसत्ता,

त्यांची राज्यसत्ता आणि वर्चस्व, सुरक्षित आणि सुखी जीवन; याचाच ते विचार करतात. त्यांच्या सुरक्षिततेला थोडासाही ओरखडा निघाला, तर चवताळून उठतात. त्यांच्यावर किरकोळ संकट आले की, त्याला गंभीर, राष्ट्रीय संकट मानून प्रसिद्धी माध्यमातून तशी ओरड करतात. ते प्रतिपक्षाशी विचाराने विरोध करीत नाहीत. कारण त्यांच्याकडे व्यापक विचारच नसतात. शारीरिक हल्ले करण्याचीही हिंमत नाही. मग ते भावनेला आवाहन करतात. चिथावणी देतात. दंगे, हिंसा, दहशतीच्या मार्गांचा अवलंब करतात. ब्राह्मणी मूल्यव्यवस्थेला विरोध करणारा, त्यांचा कट्टर शत्रू ठरतो. मग तो ब्राह्मण असला तरी त्याला क्षमा नसते. वेणराजा, बळीराजा, संत तुकाराम, म. गांधी यांना संपविले. म. बसवेश्वर, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, श्री. चक्रधर यांचाही त्यांनी छळ केला.

जुलै-ऑगस्टमध्ये पुण्यातील विविध विभागांत महर्षी दयानंद सरस्वती यांची ओघवती, प्रभावी, वैचारिक खाद्य पुरविणारी भाषणे झाली. त्यांना वाढता प्रतिसाद मिळाला. ते परत जाण्यापूर्वी त्यांची पुण्यातून सवाद्य मिरवणूक काढावी, असे आयोजकांनी ठरविले. ५ सप्टेंबर १८७५ रोजी मिरवणूक निघाली. सनातनी आणि प्रतिगामी ब्राह्मणांनी ही मिरवणूक उधळून लावण्याचा निर्धार केला. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे अनुयायी या कामी आघाडीवर होते. गोपाळराव जोशी या विक्षिप्त गृहस्थाकडे नेतृत्त्व होते. मिरवणुकीत अडथळे येतील, गोंधळ घालण्याचा प्रयत्न होईल, अशी कुणकुण होती. लोकहितवादी आणि म. गो. रानडे यांनी एक दिवस अगोदर जोतिबा फुले यांची भेट घेऊन मिरवणुकीला संरक्षण देण्याची मागणी केली. त्यांनी ती मागणी मान्य केली. पोलीस संरक्षणही होते.

सुशोभित हत्तीवर महर्षी दयानंद सरस्वती बसले होते. एका पालखीमध्ये पवित्र ग्रंथ ठेवले होते. ताशे, तुतारी, नगारे, भेरी, शंख इत्यादी वाद्यांसह मिरवणूक वाजत, गाजत, गर्जत निघाली.

सनातन्यांनीही एका गाढवाला सजविले. त्याचे नाव गर्दभानंद असे ठेवले. महर्षी दयानंद यांच्या मिरवणुकीच्या नेमक्या उलट दिशेने जाऊन, त्याच वेळी, त्याच स्थळी, पोहचून तेथे गोंधळ घालावयाचा; असा त्यांचा बेत होता. त्यांची मिरवणूक; आरडाओरड करीत, बोंबा मारीत निघाली. यामुळे गुंडागर्दी होईल. अपशकून होईल, असा त्यांचा कयास होता. त्यांच्या बंदोबस्तासाठी पोलिस आणि लहुजीबुवा वस्ताद यांच्या तालमीतील पहिलवान होते. धोंडीबा साळवे,

ग्यानोबा कृष्णाजी ससाणे आणि इतर तरूण सत्यशोधक मंडळींवर मिरवणुकीला संरक्षण देण्याची जबाबदारी होती.

परस्परविरोधी दिशांनी दोन्ही मिरवणुका एके ठिकाणी आल्या. गोंधळ सुरू झाला. आरडाओरड, बाचाबाची सुरू झाली. मारामारीपर्यंत प्रकरण पोहचले. तालीमबाजांनी आणि पोलिसांनी विरोधकांना चांगलाच चोप दिला. त्यांना पळून जाऊन स्वत:ची सुटका करून घ्यावी लागली. दोन्ही बाजूंच्या लोकांना दुखापती झाल्या. धर्मरक्षक आणि संस्कृतीचे ठेकेदार म्हणवून घेणाऱ्यांचे, हे असंस्कृत वर्तन कोणालाही आवडले नाही. त्याचा पश्चात्ताप त्यांना वाटला नाही. उलट विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी 'निबंधमाले'च्या ४४व्या अंकात उपरोधिक आणि तिरकस शैलीत, गालिप्रधान, अशिष्ट भाषेत, ब्राह्मणेतर स्त्रियांविषयी अनुदारदृष्टीने उद्‌गार काढून, या गोंधळाचे रसभरीत वर्णन केले आहे. विद्येच्या किल्ल्या आमच्याच कमरेला आहेत, असा तोरा मिरवणारे; 'इंग्रजी वाघिणीचे दूध प्यालेला मी मराठीचा शिवाजी आहे' अशी दर्पोक्ती करणारे आणि उच्चवर्णीय असल्याच्या अहंकारी डरकाळ्या फोडणारे हे विद्वान किती खुजे, किती संकुचित, किती सुमार उंचीचे होते, हे काळाने सिद्ध केले आहे. काळ मोठा न्यायाधीश असतो, तो असा.

सत्यशोधक समाजाने आपले सामाजिक कर्तव्य पार पाडले. ब्राह्मण आहे म्हणून त्यांना विरोधच करावयाचा, अशी भूमिका त्यांनी कधीही घेतली नाही. तात्त्विक भूमिकेवरूनच या ऐतिहासिक मिरवणुकीला जोतिबा फुले यांनी संरक्षण दिले.

## दुष्काळग्रस्तांना साहाय्य

इ.स. १८७७ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. महाराष्ट्राच्या कोणत्या ना कोणत्यातरी भागात दरवर्षी अतिवृष्टी किंवा अनावृष्टीमुळे दुष्काळ असतो. एखाद्या वर्षी त्याचे स्वरूप फार अक्राळविक्राळ असते. त्या काळात आजच्याप्रमाणे दळणवळणाची साधने नव्हती. अन्नधान्य, कपडालत्ता, पाणी इत्यादी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा तातडीने करणे शक्य नव्हते. राज्य परक्यांचे होते. प्रजेच्या हालअपेष्टांची त्यांना फार पर्वा नव्हती. भूकबळी, रोगराई हे दुष्काळाचे सोबती असतात. महाराष्ट्रातील शेतकरी तर अगणित पिढ्यांपासून अस्मानी आणि सुलतानी संकटांशी सामना करीतच जगत आहेत. इ.स. १८६० पासूनच महाराष्ट्रात दुष्काळाने अक्षरश: थैमान घातले होते.

१८७७चा दुष्काळ दक्षिण महाराष्ट्रात तांडव करीत होता. शेतकरी आणि सावकार यांच्यामध्ये संघर्ष वाढला. अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. सहकार्याऐवजी वैरभाव वाढला. या वेळी प्रत्येकाच्या माणुसकीची कसोटी पणाला लागली. आपापल्या पातळीवर जे जे प्रयत्न शक्य आहेत, ते करणे आवश्यक होते. सत्यशोधकांनी खेड्यापाड्यांतील दुष्काळग्रस्तांची हलाखी, जनावरांच्या हालअपेष्टा पाहिल्या. त्यांना कोणत्या स्वरूपाच्या आणि किती मदतीची आवश्यकता आहे, याविषयीचे इतिवृत्त सरकारकडे पाठविले. लोकहितवादी, दादाभाई नौरोजी, न्या. रानडे यांनीही अहवाल आणि सूचना पाठविल्या. सार्वजनिक सभेने अर्ज केला. सरकारने चौकशी मंडळ नेमले. मंडळाने अहवाल दिल्यानंतर 'डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स रिलिफ ॲक्ट' संमत केला.

या दुष्काळात लोक उपाशी पोटी तडफडत होते. भुकेच्या वेदना सहन होत नव्हत्या. मुलेबाळे डोळ्यांसमोर हातपाय खोडीत होती. तडफडत होती. लोकांची पोटे खपाटीला गेली होती. शरिराची हाडे सापळ्याप्रमाणे दिसत होती. अन्नधान्याची लुटालूट होत होती. मूठभर धान्यासाठी पोटची पोरे विकावी लागत होती. या संकटाचा गैरफायदा गावोगाव भटब्राह्मण घेत होते.

सत्यशोधक मंडळींनी बैठक घेऊन दुष्काळग्रस्तांना साहाय्य करण्यासाठी धनकवडी येथे एक कँप उघडला. येथे आंधळे, पांगळे लहान मुले यांच्यासाठी रोज हजार भाकऱ्या फुकट वाटीत असत. महादू सहादू वाघोले, या सत्यशोधकाची आई आणि इतर बाया स्वयंपाक करीत होत्या. सत्यशोधक समाजाचे चिटणीस या नात्याने जोतिबा फुले यांनी २४ मे १८७७च्या '*ज्ञानप्रकाश*'मधून दुष्काळपीडितांसाठी आर्थिक साहाय्य पाठविण्याचे आवाहन सर्व सभासदांना केले. "... दुष्काळपीडित लोक आपली मुले सोडून जाऊ लागले आहेत. व त्या प्रमाणे इंदापूर, मीरज, तासगावकडील ब्राह्मणजातखेरीजकरून बाकी सर्व जातीतील कित्येक अनाथ लोक आपली मुलेबाळे घेऊन जमले आहेत. कधी कधी दोन दोन, तीन तीन दिवस उपास काढून त्यांची हाडे मात्र उरली आहेत. वस्त्रांवाचून त्यांचे इतके हाल झाले आहेत की, त्यांचे येथे इत्यंभूत वर्णन करण्यात मला दुःख वाटते. यास्तव गृहस्थांनी कृपाळू होऊन आपल्या शक्तिनुसार काहीना काहीतरी, ही जाहिरात पाहताच, मदत पाठविण्याची त्वरा केल्यास आपण आपले कर्तव्यकार्य अशा वेळी बजावल्याचे श्रेय होणार आहे." दुष्काळाचे हे शब्दचित्र हृदय हेलावणारे आहे. हे आवाहन वाचून विविध ठिकाणच्या सत्यशोधकांनी यथाशक्ती साहाय्य पाठविले. रामसेठ

उरवणे आणि डॉ. शिवाप्पा यांनी खर्चाचा फार मोठा भार उचलला होता. सावित्रीबाई फुले यांनी स्वयंपाक करणे, देखरेख, वितरण याची जबाबदारी स्वतंत्रपणे पार पाडली. त्यावेळी सत्यशोधकांनी ५२ मदतकेंद्रे सुरू केली होती.

## पुणे नगरपालिकेचे सभासद

१८५०च्या नगरपालिका कायद्याप्रमाणे १ जून १८५७ रोजी पुणे नगरपालिकेची स्थापना झाली. २० मे १८५८ पासून प्रत्यक्ष कामकाज सुरू झाले. सर्व सभासदांची नियुक्ती सरकारकडून होत होती. इ.स. १८८२ पासून लॉर्ड रिपनने निवडणूक पद्धत अंमलात आणली.

जोतिबा फुले इ.स. १८७६ ते १८८२ या कालखंडासाठी सरकारनियुक्त सभासद होते. स्थानिक स्वराज्य संस्थेतील कामकाजात सक्रिय सहभाग घेऊन त्यांनी आपल्या कामाचा ठसा निर्माण केला. समाज हिताचे महत्त्वाचे पायंडे प्रशासनात निर्माण केले. १८७८-९०च्या अर्थसंकल्पावर चर्चा सुरू होती, तेव्हा त्यांनी सूचना केली की, ५० रु. मासिक वेतनावर एक कारकून नेमण्याऐवजी ३० रु. आणि २० रु. मासिक वेतन देऊन दोन कारकून नेमावेत. यामुळे दोघांना वेतन मिळेल आणि कामाचा उरक वाढेल. ही सूचना लगेच मान्य झाली. इ.स. १८६५-६८ ते १८७७-७८ या कालावधीतील हिशोबाची तपासणी करण्यासाठी नेमलेल्या उपसमितीवर त्यांची नेमणूक झाली होती. यावरून त्यांची सचोटी सिद्ध होते. शहरातील कचरा कोणत्या जागी टाकावा, याचा निर्णय घेण्यासाठी १८७९ मध्ये नेमलेल्या समितीवरही त्यांना घेतले होते. डॉ. विश्राम रामजी घोले, हरी रावजी चिपळूणकर आणि जोतिबा फुले यांनी त्या काळात लोकोपयोगी कामे केली. बुधवारवाड्याच्या जागेवर पुणे नेटिव्ह लायब्ररीसाठी खोल्या बांधण्याची सूचना रा. ब. खंडेराव विश्वनाथ रास्ते यांनी केली. विजयारंगम आर्य मुदलियार यांनी अनुमोदन दिले. जोतिबा फुले आणि डॉ. घोले यांनी या ठरावाच्या बाजूने बहुमत प्राप्त केले, तरीही पालिकेने ती सूचना फेटाळून लावली. बहुजनांपर्यंत ज्ञान पोहचविण्याचा प्रश्न आला की, पालिकेतील उच्चवर्णीय सभासद आणि अधिकारी एक होऊन, त्या कामात अडथळे आणीत असत.

पुणे शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी सातारा रस्त्याजवळ झगड्याची वाडी येथे पालिकेतर्फे तलावाचे बांधकाम सुरू होते. तेथे फिल्टर बसवून शहराला स्वच्छ पाणी पुरवठा करण्याचा निर्णय झाला होता. पालिका सदस्य

या नात्याने जोतिबांनी त्या कामाची पाहाणी केली. त्या कामासाठी वापरला जाणारा चुना पाहिजे तसा कमावला जात नाही, त्यामुळे तलावाच्या तळाचे बांधकाम दर्जेदार होत नाही. कामाच्या निकृष्ट दर्जामुळे त्यामध्ये पाण्याचा साठा होणार नाही, ते पाझरून जाईल. पालिकेचा पैसा व्यर्थ खर्च होईल. लोकांना स्वच्छ पाणी मिळणार नाही, अशी पालिकेकडे त्यांनी तक्रार केली. बहुसंख्य सभासदांनी ते काम उत्कृष्ट चालले आहे, असे मत दिले. त्यांच्या तक्रारीची दखल घेतली नाही. अखेर त्या तलावात पाणी साठलेच नाही.

## लिटनसाहेबांच्या मानपत्रासाठीच्या खर्चाला विरोध

हिंदुस्थानचे महाराज्यपाल लॉर्ड लिटन हे इ.स. १८८० मध्ये पुणे शहराला भेट देणार होते. त्यांच्या स्वागतासाठी पुणे शहर सुशोभित करावयाचे होते. त्यांना मानपत्र देण्याचा निर्णय पालिकेने घेतला होता. सुशोभीकरणासाठी त्या काळात एक हजार रुपये खर्च करण्याला संमती मिळविण्यासाठी ३० नोव्हेंबर १८८० मध्ये एक परिपत्रक पालिकेतर्फे सभासदांकडे पाठविले. त्यांनी सह्या करून मान्यता द्यावयाची होती. ३२ सभासदांपैकी ३१ जणांनी होकार देऊन सह्या केल्या. "नामदार व्हॉईसरॉयसाहेबांच्या मानपत्रासाठी पैसा खर्च करण्यापेक्षा पुणे शहरातील गरीब नागरिकांच्या शिक्षणासाठी ती रक्कम खर्च केली तर चांगला उपयोग होईल," असा निःसंदिग्ध अभिप्राय जोतिबांनी लिहून पाठविला. याच लिटनसाहेबांनी हिंदुस्थानमध्ये मुद्रण स्वातंत्र्यावर बंधने घातली होती. इंग्रज अधिकाऱ्यांची सूचना फेटाळण्याचा सभासदाचा हक्क जोतिबांनी सिद्ध केला. मानपत्राला विरोधही केला आणि मानपत्रापेक्षा गरीब नागरिकांच्या शिक्षणासाठी खर्च करणे जास्त महत्त्वाचे आहे, या तीन भूमिका एकाचवेळी पार पाडल्या. इंग्रजी राजवटीचे स्वागत करणारे जोतिबा इंग्रज अधिकाऱ्यांच्या अधिकाराला, दराऱ्याला भीक घालीत नव्हते. त्या काळात कोणत्याही राष्ट्रीय पुढाऱ्याने एवढे धाडस दाखविले नाही. त्यांनी जबाबदार लोकप्रतिनिधीची आदर्श भूमिका पार पाडली.

## दारूबंदीसाठी प्रयत्न

दारूबंदीच्या प्रश्नावर जोतिबा फुले यांनी इंग्रज अधिकाऱ्यांना विरोध करून कटुता पत्करली. त्या काळात लोकांचे दारूचे व्यसन वाढत होते. उत्पन्न वाढविण्यासाठी या संधीचा फायदा घेण्याचे धोरण सरकारने अवलंबिले इ.स. १८७३ ते १८७७ मध्ये पुणे येथे फक्त चार दारूगुत्ते

होते. त्यानंतर सहा गुत्ते वाढविले. दारूचा खप १५,६९७ गॅलनवरून २२,९१२ गॅलनवर वाढला. 'चोरट्या आणि अशुद्ध दारूचा सुळसुळाट झाला म्हणून आणखी गुत्त्यांना परवानगी दिली,' असे स्पष्टीकरण अबकारी खात्याचे अधिकारी हेन्री डिक्सन यांनी दिले. पुण्यात पेशवाईच्या काळातच दारूचे व्यसन वाढले होते. उच्चवर्णीय मंडळी शाक्त होऊन मद्य, मांस आणि इतर भोगांच्या आहारी गेलेली होती.

१८ जुलै १८८० रोजी नगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष मि. प्लंकेट यांना लिहिलेल्या पत्रात जोतिबा फुले म्हणतात, "नगरपालिकेने बराच पैसा खर्च करून लोकांचे आरोग्य सांभाळण्याच्या उद्देशाने बराच मोठा नोकरवर्ग नेमला आहे. लोकांचे आरोग्य सांभाळण्याच्या दृष्टीने तसे एक खातेसुद्धा ती चालवीत आहे. तथापि ज्या पुणे शहराला दारूचे गुत्ते परिचित नव्हते, त्यात आता भरवस्तीत गुत्ते उघडल्यामुळे लोकांच्या नैतिक अध:पतनाची सर्व प्रकारची बीजे पेरली जात आहेत. त्यामुळे शहराचे आरोग्य सांभाळणे हा जो नगरपालिकेचा एक उद्देश आहे, त्याला बाधा येत आहे." दारूचा प्रश्न लोकांच्या आरोग्याशी आणि नैतिकतेशी संबंधित आहे, ही बाब त्यांनी जिल्हाधिकारी यांनाही पटवून दिली. या पत्राची पोलिस खाते आणि अधिकारी यांच्या पातळीवर खूप चर्चा झाली. आपले उत्पन्न वाढविण्यासाठी सामाजिक आरोग्य आणि नीतिमत्ता धोक्यात आणू नये, असे त्यांनी निर्भीडपणे सूचित केले आहे. या व्यसनामुळे आर्थिक आणि कौटुंबिक स्थितीही बिघडते, हा सार्वत्रिक अनुभव आहे.

दारूचे व्यसन जगात सगळीकडेच प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. त्या त्या काळात दारूला निरनिराळी नावे आहेत. समाजात लोकविधीत दारूला स्थान आहे. वैदिक ब्राह्मणांनी यज्ञात सोमरसाला स्थान दिले. सोमरसाची आराधना करण्यासाठी ऋचांची रचना केली. एक उत्तेजक पेय म्हणून, मीतप्राशन म्हणून, मद्याचे समर्थन केले जाते. उच्चवर्णीय मंडळी यज्ञविधीत आणि शाक्तपूजेत मद्यपान व व्यभिचार करतात; तरीही त्याला धर्म म्हटले जाते. इतरांनी तेच आचरण केले तर त्याला अधर्म आणि पाप समजले जाते. सामाजिक प्रश्नांकडे बघण्याचा हा वर्णजातीवादी दृष्टिकोन आहे. जोतिबा फुले सर्व वर्णजातींच्या आरोग्य आणि नैतिकतेसाठी दारूबंदीची मागणी करीत होते.

नगरपालिका सदस्य म्हणून त्यांना जनहिताची कामे करता आली. तेथेही

त्यांनी सत्याचा आग्रह धरला. अनेकांशी कटुत्व निर्माण झाले. काहींनी वैर धरले. जोतिबांनी मात्र मिळेल त्या संधीचे सोने करण्याचे आपले धोरण सोडले नाही.

## 'रे मार्केट'च्या इमारतीला विरोध

भाजीपाल्याच्या बाजारासाठी मोठी इमारत बांधण्याचा ठराव नगरपालिकेने केला. ही नवीन इमारत इ.स. १८८५ मध्ये बांधून पूर्ण झाली. तेव्हा जोतिबा फुले यांचा सभासदपदाचा कार्यकाल संपलेला होता. तरीही या विवाद्य प्रश्नात त्यांना सक्रिय सहभागी व्हावे लागले. ही इमारत बांधून तयार झाल्यावरही त्यातील दुकाने; व्यापारी भाड्याने घेत नव्हते. भाजी विक्रेत्यांना मारझोड करून त्या इमारतीत जाण्यासाठी सक्ती केली. या इमारतीला मुंबईचे राज्यपाल 'लॉर्ड रे' यांचे नाव दिले.

भाजी विक्रेत्यांना आणि ग्राहकांना या इमारतीची गरज नसताना; लाखो रुपये खर्च करून ती बांधू नये. त्याऐवजी ती रक्कम गरीब जनतेच्या शिक्षणासाठी खर्च करावी. ही रक्कम गरिबांच्या करातूनच खर्च झाली होती. मुख्य म्हणजे त्या गरीब भाजी विक्रेत्यांना त्या दुकानांची भाडी परवडणार नव्हती. म्हणून जोतिबांनी नगरपालिकेचे सभासद आणि सरकारी अधिकाऱ्यांची भेट घेतली. गरीब भाजी विक्रेत्यांची परिस्थिती विचारात घेऊन, त्या प्रश्नांकडे पाहावे. त्या गरिबांवर कर बसवू नये, अशी विनंती त्यांनी केली. "भाजी विक्रेते हे अत्यंत गरीब लोक असतात. दरदिवशी ते माल खरेदीसाठी आठ आणे किंवा एक रुपया सावकाराकडून कर्ज काढतात आणि उन्हातान्हातून सर्व वस्त्यांत फिरून भाजी विकतात. त्यांना आपले जीवन जगणे कठीण, कष्टाचे वाटते. कचेरीतून काम करणारे लोक आणि ज्यांना उसंत मिळते; असे बहुतांशी ब्राह्मणवर्ग हेच त्या भाजीविक्रेत्यांची गिऱ्हाईके. ब्राह्मणवर्ग मीतव्ययी नि काटकसरीने वागणारा. त्यामुळे विक्रेत्यांना फार नफा मिळत नाही. अशा परिस्थितीमध्ये दुकानांची भाडी आणि कर त्यांच्यावर लादला तर भाजीचे दर वाढवावे लागतील, परिणामी लोक भाजी विकत घेणार नाहीत." एवढे पटवून देऊनही अधिकारी आणि सभासदांनी त्यांच्या सूचनेला विरोध केला. या भाजीमंडईला राज्यपाल 'रे' यांचे नाव दिल्यामुळे जोतिबा विरोध करणार नाहीत, हा अंदाज खोटा ठरला. इंग्रज अधिकारी त्यांच्यावर नाराज झाले. त्यांचे विरोधक मात्र खूष झाले. या प्रकरणावरून जोतिबा आणि इंग्रज अधिकारी यांच्यात तणाव वाढला, याचा त्यांना आनंद वाटत होता.

जोतिबांना कोणाच्या रागाची किंवा आनंदाची पर्वा नव्हती. गरिबांच्या हितरक्षणासाठी ते स्वतःला झोकून घेत असत. या भूमिकेतूनच त्यांनी रे मार्केटला विरोध केला. कालांतराने याच 'रे मार्केट'चे नामांतर 'फुले मार्केट' असे झाले. जोतिबांना हसणाऱ्यांचेच पुढे हसे झाले.

नगरपालिकेतील अधिकारी आणि सभासद यांच्या मनात अनेक वर्षांपासून निरनिराळ्या कारणामुळे रोष आणि सूड भावना साठली होती. घाण घेऊन जाणाऱ्या नगरपालिकेच्या गाड्या जोतिबांच्या घराजवळून मुद्दाम पाठवू लागले. एवढ्यावरच त्यांचे समाधान झाले नाही; तर घाण मैला टाकण्याचे कुंडे त्यांच्या घराजवळ आणून ठेवले. या दुर्गंधीचा त्यांना फार उपद्रव झाला. ही वार्ता खेड्यापाड्यांत पसरली. रिकामटेकड्या उपद्रव देणाऱ्यांबद्दल चीड आणि जोतिबा यांच्याविषयी आदरभाव निर्माण झाला.

## सत्यशोधक समाज आणि कामगार चळवळ

१८व्या शतकात युरोपमध्ये औद्योगिक क्रांती झाली. या क्रांतीने भांडवलशाही आणि कामगारवर्गाला जन्म दिला. या देशात सरंजामशाही आणि पुरोहितशाही यांची अमंगळ युती मध्ययुगात झाली होती. त्यांचे परस्पर संगनमत झाल्यामुळे बहुजनांचे शोषण बिनबोभाटपणे सुरू होते. इंग्रजी राजवट स्थिरावल्यानंतर शोषणाची प्रगत शस्त्रे घेऊन, भांडवलशाही येथे आपले हातपाय पसरू लागली. नव्या काळात कामगारवर्ग निर्णायक भूमिका बजावणार आहे, ती एक लक्षणीय शक्ती ठरणार आहे, याचा वेध पहिल्यांदा या देशात सत्यशोधकांनी घेतला. म्हणून त्यांनी, मुंबईतील कामगारवर्ग, हा विचार आणि कार्याचा केंद्रबिंदू मानला.

कामगारवर्ग आणि उद्योगधंदे हे राष्ट्र उभारणीचे आधारस्तंभ ठरले. यामुळे जागतिक पातळीवर कामगार वर्गाला महत्त्व आले. कार्ल मार्क्स आणि मायकेल एंजोलो यांनी साम्यवादाची मांडणी करणारा 'भांडवल' या नावाचा बृहद् ग्रंथ लिहिला. कामगारवर्गाच्या हुकुमशाहीचा पुरस्कार करणारा 'साम्यवादी जाहीरनामा' इ.स. १८४८ मध्येच त्यांनी प्रसिद्ध केला होता. कामगार; त्यांच्या श्रम आणि कौशल्यातून उत्पादन करतात. त्यातून उपभोक्त्यांच्या गरजा पूर्ण होतात आणि भांडवलदारांना नफा मिळतो. भारत हा कृषिप्रधान देश आहे. इंग्रजी राजवटीनंतर सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थित्यंतरे झाली. शेतीवर लोकसंख्येचा भार वाढला. वाढती लोकसंख्या आणि शेतीच्या वाटण्या यामुळे शेतीचे लहान

तुकडे मशागतीसाठी परवडत नव्हते. सूत गिरण्या, कापड गिरण्या आल्यामुळे वरकड भार तिकडे वळला. कृषी आणि हे उद्योग यांच्यात ताणेबाणे निर्माण झाले. ग्रामीण कारागिरांची हलाखी सुरू झाली.

ब्रिटिश राजवटीत रेल्वे, गिरण्या, निरनिराळ्या प्रकारची यंत्रे या देशात आली. मंत्रांच्या, जादूच्या चमत्कारावर विश्वास ठेवणारी मंडळी चकित झाली. हे फिरंगीच चेटके आहेत, असे म्हणू लागले. पहिल्यांदा रेल्वे सुरू झाली; तेव्हा तिच्यात बसून प्रवास करायला लोक भीत होते, एवढी कर्मठ, अशास्त्रीय मानसिकता होती. गिरण्यातून यंत्रांच्या साह्याने तयार होणारा माल कमी वेळात जास्त, चांगल्या दर्जाचा होता. ग्रामीण कारागिरांनी तयार केलेला माल, गिरण्यातील मालाच्या स्पर्धेत टिकत नव्हता. या काळात राजकीय, आर्थिक, सामाजिक स्थित्यंतराचे आघात व्यक्ती, कुटुंब आणि नाते संबंधांवर होत होते.

७ जुलै १८५४ रोजी कावसजी दावर या पारशी गृहस्थाने मुंबई प्रांतात 'स्पिनिंग अँड विव्हिंग' या नावाची पहिली गिरणी काढली. मुंबईमध्ये गिरण्या काढाव्यात; अशी कल्पना डॉ. भाऊ दाजी लाड यांनी मांडली. पण तशी ठोस योजना सादर केली नाही. गिरण्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत गेली. त्या प्रमाणात कामगारांची संख्याही वाढत गेली. इ.स. १८७५ पर्यंत मुंबई-४१, कलकत्ता-५, मद्रास-२, कानपूर-२, हैदराबाद, इंदूर व नागपूर येथे प्रत्येकी १ याप्रमाणे सर्व हिंदुस्थानमध्ये ५३ गिरण्या निघाल्या. कामगारांना १२-१४ तास काम करावे लागत होते. त्यांना अल्प मोबदला मिळत होता. सुट्ट्या नव्हत्या. लाभांश मिळत नव्हता. बाल कामगारांना वेठबिगाऱ्यांप्रमाणे राबवून घेतले जाई. स्त्री कामगारांना रात्रीही कामावर बोलावीत. त्यांच्या कोणत्याही अडचणींचा विचार होत नव्हता. कामगारांच्या प्रश्नांसंबंधी विचार सुरू होता. सत्यशोधक मंडळींचे या प्रश्नांकडे लक्ष गेले. जोतिबा फुले मुंबईला जाऊन सत्यशोधक समाजाची मते लोकांना समजावून सांगत असत. त्यांचे श्रोते जास्ती करून कामगारच होते. तरूण आणि तडफदार सत्यशोधक नारायण मेघाजी लोखंडे यांनी 'मील हँड असोसिएशन सोसायटी' स्थापन केली. हिंदुस्थानातील ही पहिली कामगार संघटना; सत्यशोधकांनी इ.स. १८८०च्या प्रारंभी स्थापन केली. नारायण मेघाजी लोखंडे हे पहिले कामगार-नेते; 'दीनबंधू' हे कामगार आणि शेतकऱ्यांचे पहिले मुखपत्र आहे. इ.स. १८८० मध्ये लोखंडे आणि रामजी संतुजी आवटे यांनी 'दीनबंधू'पत्र पुण्याहून मुंबईला

नेले. दामोदर सावळाराम यंदे; हे तरूण, तडफदार, बहुश्रुत, लोक संग्राहक, मधुरभाषी आणि योजनाकुशल असे संपादक 'दीनबंधू'ला लाभले. रामय्या व्यंकय्या आय्यावारू, जाया कराडी लिंगू; हे तेलुगू समाजाचे नेते; आनंदराव तालचेरकर, यशवंतराव मणेरीकर, व्यंकू बाळाजी कालेवार; हे सर्व जोतिबा फुले यांचे मुंबईतील सहकारी आणि अनुयायी होते. ते कामगारांपुढे जोतिबांच्या व्याख्यानांचे आयोजन करीत. यातून कामगार संघटना स्थापन करण्याचा विचार पुढे आला. 'दीनबंधू'ने कामगार प्रश्नांना वाचा फोडली. लोखंडे यांनी कामगारांच्या प्रश्नांचा अभ्यास करून ते सोडविण्यासाठी काही ठोस उपाय योजनांसह सरकारपुढे गाऱ्हाणे मांडले. सरकारवरचा दबाव वाढत गेला. इ.स. १८८० मध्ये सरकारने फॅक्टरी कमिशन नेमले. लोखंडे यांना कामगार प्रतिनिधी म्हणून कमिशनवर घेतले. इ.स. १८८१ मध्ये कामगार कायदा झाला, परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. तरीही कामगारांचे वाढते संघटनात्मक सामर्थ्य आणि कायदा यामुळे गिरणी मालक काही प्रमाणात सरळ झाले. मुंबई येथील गिरणी कामगारांच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी मँचेस्टर येथील मिडकिंग नावाच्या कारखानातपासनीसाची नेमणूक केली. त्यांनी पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या.

१. आठ वर्षांच्या आतील मुलांना कारखान्यात कामावर घेऊ नये.
२. मुलींना आणि स्त्रियांना सकाळी सहापूर्वी आणि सायंकाळी सहानंतर कामावर बोलावू नये.
३. त्यांच्या सर्व कामाच्या वेळात विश्रांतीसाठी सुट्टी द्यावी.

या शिफारशींमुळे मुंबईचे जिल्हाधिकारी डब्ल्यू. बी. मुलक यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी मंडळ नेमले. एम. बी. जिजिभाई, मंचेरजी मुरबान, डॉ. थॉमस ब्लॅने आणि जी. कॉटन; हे त्या मंडळाचे सदस्य होते. डॉक्टरांची एक समिती नेमून, कामगारांची आरोग्यविषयक पाहणी करून एक प्रतिवृत्त तयार करून घेतले. त्या चौकशी मंडळापुढे लोखंडे यांच्यासह पस्तीसजणांच्या साक्षी झाल्या.

मुंबईतील कामगार मुळात कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील होते. त्यांची नाळ खेड्याशी जोडलेली होती. त्यामुळे कामगार आणि सत्यशोधक नेते यांचे सर्वार्थाने सूर जुळले. कामगारांनी संघटितपणे लढे दिले. या कामगार चळवळीने खलाशी, गोदी कामगार यांच्यासह भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात मोलाची कामगिरी केली. कामगार संघटनेतील वैचारिक बैठक प्रारंभी

सत्यशोधकी होती. साम्यवादी नेतृत्त्वाने अर्थवादावरच भर दिला. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये सत्यशोधकांच्या नेतृत्त्वाखाली अखंडपणे दोन वर्षे संप करून; जगात उच्चांक प्रस्थापित केला.

## देवदासी प्रथेला विरोध

कर्नाटक राज्यातील धारवाडजवळ सौंदती येथे यलम्मा नावाची जागृत देवता आहे, असा समज फार जुना आहे. पहिले अपत्य मुलगी असेल; तर ती देवीला अर्पण करीन, असा तिला नवस करतात. त्या मुलीचा देवीशी विवाह लावून; तिच्या शेजेला व सेवेला अर्पण करण्याची; ही प्रथा आजही आहे. सोलापूर, सांगली, कोल्हापूर, निपाणी या भागांत या प्रथेचे खूप प्रस्थ आहे. देवीला अर्पण केलेल्या या मुलींना 'देवदासी' म्हणतात. त्या धर्मगुरू आणि पैसेवाले यांच्या 'भोगदासी' म्हणून जगतात. मुंबईसारख्या महानगरात देह विक्रय करून जगतात.

एखाद्या मुलीच्या केसात बट तयार झाली, तरीही त्या मुलीला सौंदती येथे नेऊन सोडतात. त्यासाठी एक विधी करावा लागतो. त्यालाच 'लग्न' म्हणतात. मुलीचे देवीशी लग्न ही कल्पनाच अशास्त्रीय आहे. लग्नानंतर त्या मुलीला तिच्या आईबापाच्या घरी जाता येत नाही. भगताबरोबर किंवा झुलवा ठेऊन राहावे लागते. काही मुली वेश्या व्यवसाय करतात. काही काही वेश्या लाखोपती आणि त्या शहरातील नामांकित व्यक्ती होत्या.

इ.स. १८८३ मध्ये एके दिवशी मुंबईमध्ये जोतिबा फुले, आनंदराव तालचेरकर आणि त्यांचे एक ब्राह्मणमित्र यशवंतराव मणेरीकर; तिसरे प्रहरी घोडागाडीतून मार्केटकडे निघाले होते. एका देवदासीच्या लग्नाची मिरवणूक त्याच रस्त्याने निघाली होती. त्या तरूण देवदासीच्या मुलीची आई देवदासीच असून, मुंबईतील ते एक मोठे प्रस्थ होते. ती त्या काळात चार-पाच लाख रुपयांची धनीण होती. तिला तेवढीच एकुलती एक मुलगी होती. प्रथेप्रमाणे पुरोहिताच्या सल्ल्याने व स्वर्गसुखाच्या काल्पनिक आशेने, त्या मुलीचे लग्न खंजिराबरोबर लावून, तिला देवीच्या शेजेला वाहण्याचे ठरविले होते. ही सर्व माहिती जोतिबा फुले यांना; त्यांच्या मित्रांकडून कळली. ही अनिष्ट प्रथा नष्ट झाली पाहिजे, हा प्रकारही थांबविला पाहिजे म्हणून त्यांनी मणेरीकर यांच्या मदतीने त्या वेळच्या मुंबईच्या इंग्रज पोलीस अधिक्षकांची भेट घेतली. या प्रकारातील विकृतीचा भाग समजून सांगितला. पण त्या युरोपियन अधिकाऱ्याने ही धार्मिक बाब असून आपण हस्तक्षेप करणार नाही, असे ठामपणाने सांगितले

व असमर्थतेबद्दल दिलगिरी व्यक्त केली. १८५७च्या बंडानंतर ख्रिस्ती अधिकारी धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करावयास घाबरत होते. कंपनी सरकारची राजवट संपून ब्रिटिश पार्लमेंटची सत्ता प्रस्थापित झाल्यावर हे धोरण अवलंबिले होते. त्यामुळे सुधारकांना सरकारकडून सहकार्य मिळत नव्हते. अंधश्रद्धा असल्यामुळे लोकांचा पाठिंबा नव्हता. या परिस्थितीचा फायदा सनातन्यांना होत होता. पोलीस अधिक्षकांनी सहकार्य देण्याचे नाकारले; म्हणून जोतिबा निराश झाले नाहीत. ते तिघेही मित्र पोलीस आयुक्त सावटन यांच्याकडे गेले. या प्रथेतील दुष्टता, अमानुषता, धर्माच्या नावाखाली चालणारा व्यभिचार, अनैतिकता पटवून दिली. त्याने पोलीस अधिकाऱ्यांना पाठवून ते लग्न थांबविले. यामुळे सर्व मुंबईमध्ये खळबळ उडाली. कोणाला आश्चर्य वाटले. कोणाला दैवी कोपाची भीती वाटली. मात्र कोवळ्या मुली भोगावयास मिळणाऱ्या धर्म मार्तंडांना ही गोष्ट फारच झोंबली. पुजारी संतापले. धर्मभोळ्या लोकांनाही सरकारविषयी राग आला. धर्म बुडाला, कली आला, अशी ओरड उठली. वर्तमानपत्रात रकाने भरून मजकूर येऊ लागला. हे सर्व कोणामुळे घडले, हे मात्र कोणालाच कळले नाही. शेवटी काही दिवसानंतर तो विधी झाला. सनातन्यांचे आत्मे (?) तृप्त झाले. जोतिबा फुले यांच्या प्रयत्नाला यश आले नाही; पण त्यांनी केलेल्या विरोधाला नैतिक, शास्त्रीय विचारांचे अधिष्ठान आहे. भोगदासी तयार करण्याचे कारखाने बंद करण्याची भूमिका गुरुवर्य कृष्णराव केळुस्कर, रा. ब. बाबासाहेब बोले, डॉ. बाबा आढाव या सत्यशोधकांनी घेतली आणि आज महाराष्ट्र शासनाने कायदा करून ती भूमिका उचलून धरली.

## हंटर शिक्षण आयोगापुढे लेखी साक्ष

शूद्रातिशूद्रांच्या मुलामुलींच्या शिक्षणासाठी जोतिबा फुले खूप आग्रही होते. त्यांचा तो आग्रह रास्त होता. मानवी जीवन सुखी, समृद्ध, नैतिक होण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. दुःख आणि शोषणाची कारणे आणि उपाय कळण्यासाठी शिक्षण अटळ आहे, अशी त्यांची भूमिका होती; म्हणून शिक्षणाचा आग्रह ते पुन्हा पुन्हा धरतात. इतर संस्था, सभा, पुढारी यांच्याकडून ही मागणी वाढत होती. रेटा वाढत होता. हिंदुस्थानमधील शिक्षणविषयक समस्यांची पाहणी करण्यासाठी आणि सुधारणा सुचविण्यासाठी इंग्रज सरकारने १८८२ मध्ये सर वुईल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला. ब्रिटिश पार्लमेंटमध्ये मजूर पक्षाचे सभासद हिंदुस्थानातील प्रश्नांवरून सरकारला

धारेवर धरीत होते. त्याचाही हा परिणाम होता. देशभर हिंडून सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या प्रमुख व्यक्तींच्या गाठीभेटी घेणे, चौकशी व चर्चा करणे, त्यांनी सुचविलेल्या उपाय योजनांची नोंद घेणे; यासाठी त्यांनी दौरे सुरू केले. या आयोगाला मदत करण्यासाठी ब्रिटिश इंडियातील सर्वच प्रांतांमध्ये एक एक समिती स्थापन केली. या प्रांतिक समितीने; आपल्या प्रांतातील शिक्षणविषयक परिस्थितीची माहिती, या आयोगाला सादर करावयाची होती. या समितीने आपापल्या प्रांतातील, शिक्षणविषयक प्रश्नांसंबंधी साक्षी घेतल्या. निवेदने स्वीकारली. शिक्षण तज्ज्ञ, शिक्षण क्षेत्राशी संबंधित व्यक्ती, कार्यकर्ते आणि सुधारक यांचा त्यामध्ये समावेश होता.

शिक्षण हे वरच्या स्तरातील लोकांना अगोदर द्यावे; ते शिकून शहाणे झाले की, खालच्या स्तरातील लोकांना ते शहाणे करतील, असा 'शिक्षणविषयक पाझरण्याचा सिद्धान्त' (फिल्टर डाऊन थिअरी ऑफ एज्युकेशन) मेकॉले यांनी मांडला होता. सतराव्या शतकापासून तो इंग्लंडमध्ये अस्तित्वात होता. तेथील परिस्थितीमध्ये तो यशस्वी ठरला होता. तेथील चर्च आणि सरंजामदारांनी मोठमोठ्या देणग्या देऊन गोरगरिबांच्या शिक्षणाची व्यवस्था केली होती. तेव्हा जगात कोठेही शिक्षण ही सरकारची जबाबदारी आहे, असे मानले जात नव्हते. इंग्लंडमध्ये उदारमतवाद, मानवतावाद, उच्च दर्जाचा सुसंस्कृतपणा, प्रामाणिकपणा यामुळे चर्च, धर्मोपदेशक आणि सरंजामदार यांनी पुढाकार घेऊन लोकांना बायबल वाचता यावे, धार्मिक ज्ञान व्हावे, या उद्देशाने शिक्षण सार्वत्रिक केले. हिंदुस्थानातील परिस्थिती; या सिद्धान्ताला पोषक नव्हती. येथे वर्ण-जातिभेद आणि त्यावर अधिष्ठित उच्च-नीच भेदभाव, पवित्र-अपवित्र; याविषयीचे समज लोकमनात घट्ट बसलेले होते. ज्ञानाच्या सार्वत्रिकीकरणाला पुरोहित-ब्राह्मणांचा विरोध होता. धर्मशास्त्राचे कारण पुढे करून विद्याबंदी केली होती. सनातनी लोक; अनुदार, आत्मकेंद्री, मतलबी आणि कोत्या मनाचे होते. हंटर आयोगापुढे त्या उच्चवर्णीय-जातीय पुढाऱ्यांची मनोवृत्ती उघड झाली. त्यांनी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाला सक्त विरोध केला. न्यू इंग्लिश स्कूलचे पर्यवेक्षक वा. शि. आपटे यांनी, "प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने न घेता ती लोकांवरच सोपवावी." अशी लेखी स्वरूपात मागणी केली. "ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे, शाळा स्थापन करण्याचे प्रयत्न हे काही स्वेदशी प्रयत्न नव्हते. त्यांचे ध्येयही शुद्ध शैक्षणिक स्वरूपाचे नाही. त्यांनी शाळेतून बायबल शिकविले तर त्यांना वार्षिक अनुदान देऊ नये," अशी मागणी त्यांनी केली.

शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणाला विरोध करणारे गृहस्थ 'राजा शिवाजी' या खंडकाव्याचे कर्ते महादेव मोरेश्वर कुंटे हे आणखी एक प्रतिनिधी होते. शिक्षण पंडित म्हणून त्याकाळात ते ओळखले जात होते. "महारधेड यांना शाळेत प्रवेश मिळावा, हा प्रश्न स्वत: महारांनी आणि धेडांनी उपस्थित केलेला नाही. त्यात काही सत्य नाही. तो प्रश्न व्यवहाराला सोडून आहे. भावना–प्रधान इंग्रज अधिकारी आणि अव्यवहारी देशी सुधारक यांची ही निराधार चळवळ आहे." आपल्या शब्दांच्या बळावर बुद्धिभेद करणे, खोटी गोष्ट सत्य म्हणून दडपून आणि ठामपणाने सांगणे ही सर्वच कर्मठ, सनातनी उच्चवर्णीय मंडळींची जुनी सवय आहे. ती या दोन्ही अभिप्रायामध्ये पुरेपूर आढळते. शूद्रातिशूद्र शिकून शहाणे होऊ नयेत, नोकऱ्यांमध्ये स्पर्धक म्हणून, ते उतरू नयेत, त्यांना बरोबरीचा दर्जा; कधीही मिळू नये, धर्मग्रंथातील लबाड्या त्यांना कळू नयेत, या हेतूने शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाला त्यांचा विरोध होता. त्यांची मते तत्कालीन सर्व सनातन्यांचे प्रतिनिधित्व करणारी आहेत.

१९ ऑक्टोबर १८८२ रोजी जोतिबा फुले यांनी हंटर शिक्षण आयोगापुढे लेखी निवेदन सादर केले. या इंग्रजी निवेदनात आपण एक व्यापारी, शेतकरी आणि नगरपिता आहोत, असा स्वत:चा परिचय दिला आहे. येथील शिक्षणविषयक वास्तवाचे वर्णन करताना ते म्हणतात, "वरिष्ठ वर्गातील लोक कनिष्ठ वर्गांना शिक्षण देतील, हे इंग्रज सरकारचे सुखस्वप्न आहे. हे सुखस्वप्न पाहत इंग्रज सरकार गरीब शेतकऱ्यांकडून शेतसारा सक्तीने वसूल करून वरिष्ठ वर्गाच्या शिक्षणावर उधळते. विद्यापीठे श्रीमंतांच्या मुलांना शिक्षण देतात म्हणून त्यांचीच ऐहिक उन्नत्ती होते. या उच्चशिक्षितांनी आपल्या गरीब शूद्रातिशूद्र देशबांधवांच्या प्रगतीसाठी काहीही प्रयत्न केले नाहीत. त्यांनी स्वत:च्या घरी किंवा दुसरीकडे शाळा काढल्या नाहीत. इतरांनी काढलेल्या शाळांना मदतही केली नाही, उलट अडथळेच आणले. राष्ट्राची नैतिक व बौद्धिक पातळी उंचावण्यासाठी शिक्षणाचा दर्जा वाढला पाहिजे. विश्वविद्यालयातील पदवीधारकांची संख्या, तेथून शिकून तयार होणारे रँग्लर, डीन आणि प्रॉक्टर यामुळे सर्व देशाचे हित होत नाही." राष्ट्राचे कल्याण आणि उन्नत्ती झाली की नाही, हे मोजण्यासाठी शिक्षण हे एक महत्त्वाचे साधन मानले जाते. आपल्या देशात पूर्वीपासून वैयक्तिक हित, वैयक्तिक उद्धार यावर भर दिला आहे. सामुदायिक हित, सामुदायिक उद्धाराला, उच्चवर्णीयांच्या तत्त्वज्ञानामध्ये आणि आचारामध्ये स्थान नाही. म्हणून मुंग्यांना साखर देणारे, वृक्ष आणि प्राण्यांची पूजा करणारे; मानवांना हीन समजतात. यामध्ये खूप विसंगती आहे, हे आचरण हास्यास्पद

आहे, अमानुष आणि क्रूर आहे, असे त्यांना वाटत नाही. उलट वैयक्तिक पुण्य पदरात पडल्याचा आनंद त्यांना होतो. ते पुढे म्हणतात, "या शिक्षण पद्धतीमुळे सर्व सरकारी वरिष्ठ जागांवर ब्राह्मण वर्गाची मक्तेदारी निर्माण झाली आहे. सरकारी हुद्द्यांवर इतर जातींतील लोकांच्या नेमणुका करून त्यांच्या मक्तेदारीचा संकोच केला पाहिजे. प्राप्त परिस्थितीमध्ये सरकारने उच्च शिक्षणावरील खर्च कमी करावा. जनतेच्या प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करून त्यावरचा खर्च तातडीने वाढवावा. यामुळे चारित्र्यवान आणि नीतिमान लोक तयार होतील. जबाबदारीची उच्च पदे सांभाळण्यासाठी ते पात्र आणि सक्षम होतील. उच्च वर्णातील लोक त्यांच्या उच्च शिक्षणाची सोय स्वत: करण्यासाठी समर्थ आहेत.

"सध्या उपलब्ध असलेल्या शिक्षणाचीही फारच आबाळ होत आहे. तेथे शैक्षणिक साहित्य पुरविण्यात येत नाही. शेतकऱ्यांची नव्वद टक्के मुले-मुली प्राथमिक शिक्षणापासून वंचित आहेत. जी शाळेत जातात, ती टिकून राहत नाहीत. कारण त्यांचे पालक दारिद्र्याने गांजलेले व पिडलेले असतात. त्यांची गळती थांबविण्यासाठी शिष्यवृत्त्या आणि बक्षिसे द्यावीत. बारा वर्षांच्या वयोगटापर्यंतचे प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करावे.

"मराठी आणि इंग्रजी भाषेची आवड नसल्यामुळे मुसलमान मुलेमुली शिक्षणापासून दूर राहतात.

"विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील यशाच्या प्रमाणावर शिक्षकांच्या वेतनाचे प्रमाण ठरवू नये. विद्यार्थ्यांकडून वसूल होणाऱ्या शुल्कावर एकही शाळा चालणार नाही.

"अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यात व्यवहारोपयोगी ठरले पाहिजेत. म्हणून अभ्यासक्रम आणि शिक्षकांची यंत्रणा, यामध्ये आमुलाग्र सुधारणा झाली पाहिजे. शिक्षकांचे वेतन आणि दर्जा यामध्ये वाढ करावी. प्रशिक्षित आणि ब्राह्मणेतर शिक्षक नेमावेत.

शिक्षकांमध्ये शेती कामाची आवड असावी. शेती कामाचे आणि श्रमाचे संस्कार त्यांनी विद्यार्थ्यांवर करावेत. कनिष्ठ वर्गातील लोकांशी त्यांनी एकरूप व्हावे. अभ्यासक्रमात सर्वसामान्य विषयांबरोबरच शेती आणि आरोग्य या विषयांचा प्राथमिक शिक्षणामध्ये समावेश करावा.

"प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक, सक्तीचे आणि मोफत असावे," अशी

मागणी या देशात पहिल्यांदा त्यांनी केली. अभ्यासक्रम, त्यातील विषय, शिष्यवृत्ती, बक्षिसे, ग्रंथालय, सुट्टीच्या वेळा, सुट्टीचा कालावधी, शाळा तपासणी, शिक्षकांची पात्रता आणि वेतन, विद्यार्थ्यांची गळती; याविषयी मूलगामी विचार मांडले. शिक्षणाचा संबंध मानवी नैतिकता आणि बुद्धिमत्तेशी जोडला. वर्णजातिवर्चस्व आणि शिक्षण यांच्या परस्परसंबंधांवरही पहिल्यांदा त्यांनी प्रकाश टाकला.

जोतिबा फुले यांनी हंटर शिक्षण आयोगाला सादर केलेल्या निवेदनातील महत्त्वपूर्ण सूचनांचा उपयोग स्वातंत्र्योत्तर काळात मार्गदर्शक तत्त्वे म्हणून झालेला आहे.

## शेतकरी, शेतकरी-नेते आणि कृषिअर्थतज्ज्ञ

जोतिबा फुले हाडाचे शेतकरी होते. त्यांच्या कुटुंबात पिढ्यान्‌पिढ्यांपासून कुणबिकीची परंपरा होती. त्यांना शेतकऱ्यांच्या दुःख-यातना माहीत होत्या. त्यांच्या प्रश्नावर ते पोटतिडकीने बोलत होते. लिहीत होते. कृती करीत होते. त्यांच्या लेखनातील शब्दन्‌शब्द शेतकऱ्यांविषयीच्या जिव्हाळ्याने ओथंबलेला आहे.

शेती, शेती व्यवसाय, शेती मालाचे उत्पादन तंत्र, शेती मालाची बाजार पेठ, शेतीमालाचे भाव याविषयीचा त्यांचा दृष्टिकोन आधुनिक होता. शेती आणि शेतकरी यांच्या प्रश्नांकडे त्यांनी भावविव्हल दृष्टीने पाहिले नाही. त्यांचा शास्त्रीय दृष्टिकोन होता. मांजरी येथील शेतीमध्ये त्यांनी मुळामुठा धरणाचे पाणी पहिल्यांदा घेतले. ते पाणी घ्यायला इतर शेतकरी घाबरत होते. धरणाचे पाणी घेतले तर इंग्रज सरकार आपली जमीन बळकावील, अशी त्यांना भीती वाटत होती. जोतिबांनी पहिल्यांदा एका कालव्यातून आपल्या शेतीला पाणी घेतले. त्यावर बाग फुलविली. त्या कालव्याला 'फुल्याची नळी' असे म्हणत. 'जोतिबाच सरकारला फितूर झाले आहेत' असा त्यांच्यावर आरोप होऊ लागला. त्यांनी शेतकऱ्यांना समजावून सांगितले. त्यापासून होणारे लाभ लक्षात आणून दिले. त्यांनी स्वतः मोसंबी, संत्री, बटाटे, कोबी इत्यादी फळांची आणि भाजीपाल्याची लागवड केली. ऊसाचे पिक घेऊन त्यापासून गुऱ्हाळ करून, भरपूर उत्पन्न काढले. त्या अगोदर ते स्वतः मोट चालवीत असत. पिकांमध्ये दारे धरीत असत. हे पाहून शेजारचे शेतकरीही वांगी, टॉमेटो, बटाटे, कोबी, अंजीर, डाळिंबे, लिंबू, पेरू, केळी अशी इतरही देशी-विदेशी

फळे आणि भाज्यांचे उत्पादन घेऊ लागले. इ.स. १८८६-८७ पर्यंत जोतिबा मांजरी येथील शेती करीत होते. त्यानंतर आर्थिक अडचणींमुळे, ती विकावी लागली. त्यांनी स्वत: शेती केल्यामुळे सर्व बरे-वाईट अनुभव त्यांनाही आले होते. स्वत:चे अनुभव, चिकित्सक आणि शास्त्रीय दृष्टिकोन, प्रतिभा, संशोधकवृत्ती, यामुळे शेतीविषयी मूलगामी विचार त्यांनी मांडले.

शेतीची मशागत, विविध हंगाम, अवजारे, खते, बी-बियाणे त्यासाठी येणारा खर्च, शेतीचा कस वाढविण्यासाठी आणि तो टिकविण्यासाठी करावयाची उपाय योजना, शेतीव्यवसाय शिक्षणाला प्रोत्साहन; याविषयी त्यांनी अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. जुने उत्पादन तंत्र, भावनाधिष्ठित शेतीव्यवसायाचे तोटे त्यांनी लक्षात घेतले. शेतकरी, त्याची बायको, मुले, जनावरे रात्रंदिवस शेतावर राबतात. ऊन, पाऊस, थंडी-वाऱ्यामध्ये ढोरमेहनत करतात. त्यांच्या घरचे बी, खते, जनावरांचा चारा, शेतकरी, त्याची बायको, मुले, जनावरे यांच्या सर्वांचा मोबदला धरून शेतीमालाचा उत्पादनखर्च काढला पाहिजे. शेतीमाल लिलावपद्धतीने विकून शेतीमालाचे आणि शेतकऱ्यांचे अवमूल्यन होते. मालाची योग्य किंमत थेट उत्पादक शेतकऱ्यांना मिळावी. ग्राहक आणि शेतकरी यांच्यामध्ये दलाल-आडते असू नयेत. हा विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीत आणण्याचा प्रयत्न केला. महादू सहादू वाघोले आणि ग्यानोबा कृष्णाजी ससाणे यांच्या सहकार्याने एक सहकारी कंपनी स्थापन केली. या कंपनीने पुणे येथे भाजीपाला खरेदी करून विक्रीसाठी मुंबई येथे पाठवावा असे ठरले. ही कंपनी महिन्या-दोन महिन्यापेक्षा जास्त काळ चालली नाही. येथील प्रस्थापित पोलादी चौकट असलेल्या कोणत्याही व्यवस्थेला नकार देणे, पर्यायी व्यवस्था निर्माण करणे अवघड आहे. अपयश येईल म्हणून कृती करावयाची नाही, असे त्यांचे धोरण नव्हते. शेतीत पेरले तर उगवेल का? जनावरे, पाखरे खाऊन जातील का? चोर नेतील का? या भीतीने शेतकरी शेतीची मशागत सोडून देत नाही. जोतिबा हे जातिवंत शेतकरी असल्यामुळे विधायक आणि उत्पादक श्रम आनंदाने करीत होते. त्यातून काही तत्त्वे, काही मूलगामी सिद्धान्त प्रस्थापित करीत होते. काही संस्थात्मक संकल्पनांची बीजे रोवीत होते. वरील प्रयत्नामधून त्यांनी आधुनिक काळातील सहकारी तत्त्वावरील खरेदी-विक्री संघाचे बीज रोवले.

शेतीला पूरक जोडव्यवसाय असावा; यावर त्यांचा कटाक्ष होता. 'शेतकऱ्यांचा असूड' (१८८३) या प्रबंधग्रंथामध्ये त्यांनी शेती आणि शेतकरी

यांच्या उन्नतावस्थेसाठी कोणकोणती उपाययोजना करावी, त्यासाठी एक प्रदीर्घ योजना सरकारला सादर केली. त्या वेळी इंग्रज सरकारने त्याकडे गांभिर्याने पाहिले नाही. मात्र स्वातंत्र्यानंतर आज महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकार, त्या उपाययोजनांची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करीत आहे. सर्व प्रकारच्या पर्यावरणामुळे आणि परिस्थितीच्या रेट्यामुळे; त्या सूचना अमलात आणण्याची अटळ स्थिती निर्माण झाली आहे.

लोकहितवादी, दादाभाई नौरोजी, न्या. म. गो. रानडे प्रभृती विद्वानांना मान्यताप्राप्त अर्थतज्ज्ञ मानले जात होते. जोतिबा फुले यांच्या समकालीनांमध्ये त्यांना महत्त्वाचे स्थान होते. सरकार दरबारी त्यांच्या शब्दाला किंमत होती. जोतिबा आणि त्यांच्यामध्ये मूलभूत फरक होता. जोतिबांना शेतीव्यवसायाची परंपरा होती. शेतकरी जातीत जन्म, कुणबिकीचा स्वतःचा अनुभव, शेतकऱ्यांमध्ये राहाणे, वावरणे, त्यांच्यासारखा पेहराव आणि राहणीमान; हा फरक तर होताच; पण शेतीव्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही भिन्न होता. इ.स. १८८५ मध्ये एका कार्यक्रमामध्ये न्या. रानडे यांनी 'गेल्या तीस वर्षांत शेती आणि शेतकरी यांची स्थिती बरी आहे' असे विधान केले. त्यांच्या गाजलेल्या भाषणांपैकी हे एक भाषण मानले जाते. जोतिबा फुले यांना रानडे यांचे हे मत रुचले नाही. त्यांच्या मताचा परखड समाचार घेण्यासाठी 'इशारा' (१८८५) नावाची पुस्तिका लिहून, इंग्रजी राजवटीमध्ये शेतकऱ्यांची हलाखी कशी वाढली आहे, याविषयी त्यांनी सविस्तर आणि साधार विवेचन केले आहे.

सृष्टीच्या निर्मितीपासून मानव आणि मानवेतर प्राणी यांची उत्क्रांती कशी झाली, विविध सामाजिक संस्थांचा उदय कसा झाला, शासन-शोषण संस्थेत कसकशी परिवर्तने झाली, राजेशाही, सरंजामशाही, हुकूमशाही राजवटी, प्राचीन काळातील प्रजासत्ताक राजवटी आणि प्रजेची सुखे यांचा परस्पर संबंध कसा होता, हे विशद केले. पुरोहितशाही आणि राजेशाही संगनमत करून शेतकऱ्यांना पीडा देतात. शेतकरी हाच सर्वांच्या शोषणाचा मूलाधार राहिला आहे, याविषयाकडे त्यांनी प्रथम लक्ष वेधले आहे. प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळातील राज्यसत्ता या शोषण करणाऱ्या राहिल्या आहेत. बळीराजा आणि त्याचा वंश आणि परंपरेतील राजवटी प्रजासत्ताक किंवा लोकसत्ताक राजवटी होत्या, म्हणून त्या काळात शेतकरी आणि इतर प्रजा सुखी होती, अशी त्यांनी साधार मांडणी केली.

इंग्रजी राजवट ही कायद्यापुढे सर्वांना समता, न्याय देणारी, सर्वांना

शिक्षणाचा आणि स्वोन्नतीचा अधिकार देणारी राजवट आहे. मात्र इंग्रज सरकारचे काळे-गोरे अधिकारी, शोषक, कामचुकार, बेजबाबदार आणि सुखलोलुप आहेत. भट, सावकार आणि काळे-गोरे सरकारी अधिकारी हे घटक शेतकऱ्यांचे चौफेर शोषण करतात.

हा देश बळीराजाचा म्हणून 'बळीस्थान' आहे. शेतकऱ्यांना बळीराजा म्हटले जाते. येशूख्रिस्त, महंमद पैगंबर, लाफायत हे बळीचे अनुयायी आहेत. बळीराजा ही व्यक्ती नव्हे तर ती एक मूल्यसरणी आहे. जीवनप्रणाली, समाजव्यवस्था आणि शासनव्यवस्थेची प्रणाली आहे, असा व्यापक विचार ते मांडतात. शेती आणि शेतकऱ्यांची उन्नती झाल्याशिवाय देशाची उन्नती होणार नाही, हा त्यांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन आहे. शेती आणि शेतकरी यांच्या उन्नतीसाठी जोतिबा फुले यांनी पुढीलप्रमाणे उपाययोजना सुचविल्या आहेत.

१. बळीस्थानातील शेतकऱ्यांना इंग्रज सरकारने युरोपियन शेतकऱ्यांप्रमाणे कृषिविज्ञान शिकवावे. त्यासाठी कृषिशाळा, कृषिमहाविद्यालये आणि कृषिविद्यापीठ निर्माण करावे.

   यंत्राच्या सहाय्याने शेती करण्याची क्षमता आणि पात्रता निर्माण होईपर्यंत शेतीला उपयोगी असणारे बैल आणि त्यांना जन्म देणाऱ्या गायी तसेच वासरांना मुसलमान वगैरे लोकांनी कापून खाऊ नये. शेतीतील मनुष्यबळ आणि जनावरे यांच्याकडे उपयुक्ततावादी दृष्टीने पाहण्याची त्यांची भौतिकवादी पद्धती मौलिक आहे.

२. डोंगरपर्वतावरील वृक्ष, गवत यांची पाने-फुले, त्यावर जगणारे कृमी कीटक, श्वापदांची मांसहाडे यांचे कुजलेले सत्त्व पावसाच्या पाण्याबरोबर जमिनीत एकरूप व्हावे; यासाठी उद्योगी सरकारने सोयीसोयीने काळ्यागोऱ्या लष्करांसह पोलिस खात्यातील फालतू शिपायांकडून शेतीत जागोजागी तालीवजा बंधारे बांधावीत.

३. डोंगरटेकड्यांजवळ शक्य तेवढे जास्त तळी-तलाव टप्याटप्याने बांधून घ्यावेत. यामुळे त्या खालच्या भागातील ओढे, नदी, नाले यामध्ये भर उन्हाळ्यात पाणी राहील. जागोजाग धरणे बांधली तर विहिरींना पाणीपुरवठा होईल आणि बागायती उत्पन्न वाढून शेतकऱ्यांचा फायदा होईल. सरकारचे महसुली उत्पन्न वाढेल.

४. शेतीची धूप होऊ नये, शेतांमध्ये खोंगळ्या पडू नयेत म्हणून उताराच्या

बाजूने शेतांच्या बांधांवर ताली बांधाव्यात. त्या वरचेवर दुरूस्त करावयात.

५. सर्व शेतांची पाणाड्यांकडून पाहणी करून भरपूर (दोन मोटांचे) पाणी असलेले झरे असतील तेथे गावांच्या नकाशात खुणा करून ठेवाव्यात. सरकारच्या मदतीशिवाय विहिरी पाडून बांधणाऱ्या शेतकऱ्यांना आणि पाणी सांगणाऱ्या पाणाड्याला सरकारने बक्षिसे द्यावीत.

६. नदीनाले, तळी-तलाव यामध्ये साचलेला गाळ शेतकऱ्यांना फुकट नेऊ द्यावा.

७. ज्या गावाची गायराने, सरकारने, फॉरेस्ट खात्याच्या ताब्यात दिली असतील, ती पुन्हा त्या गावाच्या ताब्यात द्यावीत. सरपण, शेतीची अवजारे यासाठी जंगलातील लाकडे नेऊ द्यावीत. विकण्यासाठी इमारती लाकडे तोडू देऊ नयेत, असा कायदा करून अन्यायी जंगलखात्याची होळी करावी.

८. इतर देशांतील विविध प्रकारच्या उत्तम उत्तम जातींच्या शेळ्या-मेंढ्यांची बेणी सरकारी खजिन्यातील रक्कम खर्च करून खरेदी करावी. त्या त्या जातींची पैदास येथे करावी. त्यामुळे शेतीला सेंद्रीय खतांचा विपूल पुरवठा होऊन, शेती सुपीक होईल. त्यांच्या दुधापासून आणि लोकरीपासून शेतकऱ्यांना उत्पन्न मिळेल.

९. सरकारी जंगलातील श्वापदांपासून शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांना उपद्रव होतो. पिकांचा बचाव करण्यासाठी गावठी बंदुका जवळ बाळगण्याची परवानगी शेतकऱ्यांना द्यावी. १८५७च्या बंडानंतर घाबरून जाऊन, लोकांनी कोणतीही हत्यारे जवळ बाळगू नयेत, असा सक्त कायदा केला होता. पण त्यामुळे हिंस्त्र श्वापदांपासून पिकांना, जीविताला आणि पशुधनाला धोका निर्माण झाला होता. शस्त्रे बाळगण्याची परवानगी देण्याची सरकारला हिंमत होत नसेल तर पीक आणि जीवितांचे नुकसान झाले, तर त्याची भरपाई पोलीस खात्यातील वरिष्ठ अंमलदारांच्या वेतनातून किंवा सरकारी खजिन्यातून देण्याचा कायदा करावा.

१०. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून सरकारला आपला महसूल वाढवावयाचा असेल तर शेती मालांची प्रदर्शने प्रत्येक श्रावण महिन्यात भरवावीत. शेती पिकांसंबंधीच्या आणि औत चालविण्याच्या परीक्षा अश्विन

महिन्यात घ्याव्यात. शेती व्यवसायाचे प्रावीण्य प्राप्त करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषिविज्ञानातील पदव्या द्याव्यात.

११. शेतकऱ्यांच्या हुशार मुलांनी उत्तम शेती करून, लोहारी-सुतारी कामातील आवश्यक तेवढे ज्ञान घेऊन, त्याच्या परीक्षा दिल्या तर त्यांना इंग्लंडमधील कृषिशाळा बघण्यासाठी सरकारी खर्चाने पाठवावे, म्हणजे ते तिकडील कृषितंत्रांचा अवलंब करून आपल्या शेतीतील उत्पन्न वाढवतील.

१२. आमच्या नीतिमान सरकारने जोगतिणी, आराधिणी, मुरळ्या, कोल्हाटिणी आणि कसबिणी यांच्यावर बारीक नजर ठेवून, त्यांच्यासाठी प्रत्येक तालुक्याला एक लॉक इस्पितळ काढावे.

१३. मुरळ्या, कोल्हाटिणी, कसबिणी, तमासगीर, नाटककार, कथाडे वगैरे लोकांनी कुनीतिपर गाणी गाऊ नयेत. यासाठी त्यांच्यावर सक्त देखरेख ठेवावी. तशा वर्तनाबद्दल त्यांना वरचेवर कडक शिक्षा कराव्यात. यामुळे अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांचे आरोग्य आणि नीतिमत्ता यामध्ये लक्षणीय अनुकूल बदल होईल.

१४. एकंदर सर्व प्रांतांतील लष्करामध्ये व पोलीस खात्यामध्ये शूद्रातिशूद्रांचा मोठा भरणा आहे. ते इजिप्त, काबूल प्रांतातील आडदांड सैन्याशी शौर्य आणि पराक्रमाने लढतात. सर्व शेतकरी आपल्या मुलामाणसांसह रात्रंदिवस उर फुटेपर्यंत शेतीत कष्ट करतात. कर, पट्ट्या, फंड, जकात याद्वारे सरकारला दरवर्षी कोट्यवधी रुपये देतात. त्याच शेतकऱ्यांच्या मुलीमुलांना शेतीसंबंधीचा ग्रंथ किंवा देशी वर्तमानपत्र वाचण्यापुरते ज्ञान या धर्मशील सरकारने दिले नाही. लाखो शेतकरी कुटुंबांना वेळच्या वेळी अन्न आणि अंगभर कपडा मिळत नाही. मात्र त्यांच्या सुख संरक्षणाच्या निमित्ताने आमचे न्यायशील सरकार लष्करी, पोलिस, न्याय, जमाबंदी वगैरे खात्यातील नोकरांना मोठमोठे जाडे पगार आणि सेवानिवृत्तीसाठी अतोनात द्रव्य उधळते.

१५. सरकारच्या नाकाचे बाल असणाऱ्या कित्येक काळ्या-गोऱ्या कामगारांनी दरमहा हजारो रुपये वेतन घेऊन, तीस-पस्तीस वर्षे नोकऱ्या केल्या की सरकार त्यांना शेकडो रुपये निवृत्ती वेतन देते. काही सरकारी कामगार आंधळे, अशक्त असल्याचा खोटा बहाणा करून, खंगल्याचे नाटक करतात आणि सेवानिवृत्ती घेऊन विलायतेला पलायन करतात.

काही काळे कामगार सेवानिवृत्त होऊन, निवृत्ती वेतन उपटून, जणूकाय येशूख्रिस्त महाराजांनी मेलेल्यांमधून उठविल्यासारखे तरूण पठ्ठे बनतात, मिशांना काळा कळप लावून नगरपालिका किंवा व्यापारी यांच्याकडे मोठमोठे पगार घेऊन नोकऱ्या करतात.

१६. आमच्या खबरदार सरकारने सर्व सरकारी खात्यातील काळेगोरे कामगार, शिपाई, लष्करी डोलीवाले, बांधकाम खात्यातील लोहार, सुतार, बिगारी यांच्या वेतनात बदल न करता सर्वच मोठमोठ्या काळ्या व गोऱ्या कामगारांचे वाजवीपेक्षा जास्त असलेले वेतन व निवृत्तीभत्ते हळूहळू कमी करावेत.

वरील उपाययोजना अमलात आणल्याशिवाय शेतकऱ्यांच्या नशिबातील लंगोट्या जाऊन त्यांना चांगले दिवस येणार नाहीत.

जोतिबा फुले यांनी अर्थशास्त्रीय विचार मांडताना अर्थशास्त्रीय परिभाषा वापरली नसेल, म्हणून विचारांचे महत्त्व कमी होत नाही. आता जोतिबा फुले यांना अर्थशास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळत आहे. त्यांच्या परखड आणि निर्भिड लेखनामुळे इंग्रज अधिकाऱ्यांचा रोष वाढत होता. त्याची त्यांनी पर्वा केली नाही. 'शेतकऱ्यांचा असूड'ची (१८८३) शेवटची तीन प्रकरणे प्रकाशित करावयास 'दीनबंधू'च्या संपादकांनी नाइलाजाने नकार दिला. एवढी निर्भिड भूमिका त्यांच्या काळात एकाही उच्चवर्णीय विद्वानाने घेतली नाही. तरीही जोतिबा ख्रिस्ताळलेले, इंग्रजधार्जिणे आणि राजनिष्ठ ठरतात, तर हातचे राखून लिहिणारे जहाल राष्ट्रवादी ठरतात.

## शेतकऱ्यांच्या असंतोषाचे जनक

त्या काळात बागायती जमीन, चार-पाच टक्केही नव्हती. निसर्गाच्या लहरीवरील शेती म्हणजे जुगार. लग्न, सण, समारंभासाठी, सरकारी कर भरण्यासाठी, कर्जफेड करण्यासाठी, कर्ज घ्यावे लागत होते. सावकारांकडून कर्ज घ्यावे लागे. २५ ते ४०० टक्के व्याजाचे दर होते. सावकार शेतकऱ्यांकडून भांडी, घर, सोने, जमीन तारण म्हणून ठेवीत असत. मुदतीत कर्ज फेड झाली नाही तर तारण वस्तूवरचा शेतकऱ्यांचा हक्क संपुष्टात येई. जप्तीचे हुकूम आणून शेतकऱ्यांची स्थावर व जंगम मालमत्ता ताब्यात घेत. शेतकऱ्यांच्या घरांवर गाढवाचा नांगर फिरे. शेतकरी देशोधडीला लागत. त्या काळात धर्मसत्ता, अर्थसत्ता आणि राज्यसत्ता एकमेकींच्या हातात हात घालून

चालत. ग्रामीण भागात या तिन्ही सत्ता ब्राह्मण जातीकडे एकवटल्या होत्या. होळी, पोळा वगैरेंचे मान, पाटीलकी, मुकादमीचे हक्क, जमिनीचे बांध, घराच्या हद्दी; यावरून शेतकऱ्यांचीच आपापसात भांडणे लावीत असत. पोलिस ठाणे, कोर्ट-कचेऱ्यांमध्ये त्यांचेच भाईबंद असत. शेटजी-भटजींची युती होती. शेतकऱ्यांचा भट-सावकारांकडून अतोनात छळ होत होता. सावकार शेतकऱ्यांच्या घरी जाऊन, चुलीत पाणी ओती. शेतकऱ्याला, पाठीवर दगड देऊन भर ऊन्हात उभे करी. मिरच्यांची धुरी देई. शेतकऱ्यांकडे थांबून मिष्टान्न भोजनावर ताव मारून, त्याला अद्वातद्वा बोलून सक्त ताकीद दिली जाई.

या आणि असल्या अन्यायाविरुद्ध शेतकऱ्यांनी संघर्ष केल्याशिवाय, त्यांना सन्मानाने जगता येणार नाही. शिक्षणातून जागृती येईलच, पण संघर्षातूनही प्रबोधन होईल, असा विचार करून १८७५ नंतर सत्यशोधक समाजाच्या अन्य सहकार्यांसह त्यांनी प्रचार दौरे सुरू केले. जुन्नरचे शेटे, ओतूरचे भाऊ कोंडाजी पाटील, डुमरे; यांनी या कामात मोठा वाटा उचलला. मुंबई, कोकण, अहमदनगर, सोलापूर, सातारा, जुन्नर; या भागात कृष्णराव भालेकर, गणपतराव सखाराम पाटील यांचा संपर्क होता. शेतकऱ्यांच्या बैठका, सभा होत होत्या. मोठ्या संख्येने शेतकरी जमत होते. "ते भट-सावकार सामाजिक दृष्टीने तुम्हाला नीच मानतात. तोपर्यंत तुम्हीही त्यांना तसेच नीच मानून पाणवठ्यांवर किंवा कुठेही सार्वजनिक ठिकाणी येऊ देऊ नका." असा संदेश शेतकऱ्यांना दिला. भट, सावकार, जमीनदार हे समाजात अल्पसंख्य असतात. ते कष्ट करीत नाहीत. उलट कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांनी निर्माण केलेल्या संपत्तीवर त्यांची चैन अवलंबून असते. तरीही ते शेतकऱ्यांना नीच मानतात. शिरजोरपणा करतात. या पुढे हे खपवून घ्यावयाचे नाही. ऐतखाऊंच्या नाड्या आवळण्यासाठी त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाका, असा जाहीर सल्ला दिला. लोकांना तो फारच पटला. भट-सावकारांना परीट, न्हावी मिळत नव्हता. दूध, भाजीपाला मिळत नव्हता. त्यांना मजूर मिळत नव्हते. भट-सावकारांच्या हजारो एकर जमिनी शेतकऱ्यांनी पडक पाडल्या. कोकणातील खोतांनाही असेच वठणीवर आणले. सत्यशोधकांनी सुरू केलेले आंदोलन तीव्र झाले. शेतकरी कुळे धाडशी बनली. अहमदनगर भागात शेतकऱ्यांनी, सावकारांची दप्तरे जाळली. काही ठिकाणी अन्यायी व जुलमी सावकारांची नाके कापली. हा संप सलग तीन वर्षे चालला. त्या काळात संघटित स्वरूपात एवढा प्रदीर्घ काळ आणि संघटित लढा जगात कुठेही झाला नव्हता. १८८५ ते १८८८ या संपकाळात, ब्राह्मण अधिकाऱ्यांनी, शेतकऱ्यांचा आणि

सत्यशोधकांचा खूप छळ केला. त्यांच्यावर खोटे व बनावट गुन्हे दाखल केले. भाऊ कोंडाजी पाटील यांच्यावर कुभांडे रचून कोर्टात अनेक खटले घातले. आंबेगावच्या महालकर्‍याने त्यांना एक वर्षाची शिक्षा दिली. शेवटी अपिलात ते निर्दोष सुटले. सत्यशोधक पुढाऱ्यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. ब्राह्मण पंतोजी, ब्राह्मणेतर मुलांना शिकवीत नसत. भाऊ कोंडाजी पाटील आणि जोतिबा फुले यांनी ब्राह्मणेतर शिक्षक नेमण्याची विनंती, शाळा खात्याच्या संचालकांना केली. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा काढून, त्यावर ब्राह्मणेतर शिक्षकांच्या नेमणुका झाल्या. त्यांचा डाव त्यांच्यावर उलटविण्यात सत्यशोधक पुढारी तेवढेच तरबेज होते.

कोकणातही खोतांच्या विरोधात, कुळे आणि महादेव कोळी संपात उतरले. हा संघर्ष दिवसेंदिवस वाढत होता. सामाजिक बहिष्कार आणि असहकार यामुळे भट-सावकार-जमीनदार जेरीला आले. त्याचा परिणाम असा झाला की, शेतसाऱ्यावर वीसपट खंड घेणारे जमीनदार, फक्त शेतसाऱ्यावर जमिनी कसण्यासाठी द्यायला राजी झाले. हा संप यशस्वी झाला.

याच काळात भट-जोशी, सावकारांच्या म्हणजे ब्राह्मण, मारवाडी, भाटे, गुजर यांच्या बाजूने होते. त्यामुळे भट-जोश्यांवरही बहिष्कार टाकला. त्यांना न बोलाविता लग्नादी विधी पार पडू लागले. त्याचाही परिणाम असा झाला की, त्या काळात वीस रुपये मांडव खंडणी सक्तीने घेणारे भट रुपया-आठ आण्यात लग्न लावू लागले. तरीही त्यांना कोणी बोलावीत नव्हते.

या संपाला विधायक कार्याची जोड दिली होती. गावोगाव सत्यशोधक समाज स्थापन होत होता. शाळा काढण्याची मागणी, ब्राह्मणेतर शिक्षक नेमण्याचा आग्रह, सरकारी नोकऱ्यांमध्ये जातिसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा असाव्यात, ही मागणी त्याच काळात पुढे आली. धर्म, अर्थ आणि राज्यसत्तेला एवढा संघटित, सैद्धांतिक, शांततापूर्ण विरोध एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सत्यशोधकांच्या नेतृत्त्वाखाली शेतकरी शूद्रातिशूद्रांनी केला.

## सहकार चळवळीचे बीजारोपण

सावकारी कचाट्यातून शेतकऱ्यांची सुटका करावी, या हेतूने त्यांनी ग्यानोबा ससाणे आणि सहकाऱ्यांच्या मदतीने हडपसर येथे सहकारी पतपेढी काढली. १०-१२ वर्षांत या पेढीला ५०,००० रु. नफा झाला. व्हाईसराय आणि मुंबईच्या गव्हर्नरने या पेढीला मुद्दाम भेटी दिल्या. पुढे कृ. अ. केळुसकर,

केशवराव विचारे यांनी राजर्षी शाहूमहाराजांच्या सहकार्याने ही चळवळ विकसित केली.

## राष्ट्रीय सभेची उदासीनता

सार्वजनिक सभा, फक्त नावाची सार्वजनिक होती. शेती आणि शेतकरी प्रश्नांवर तिच्यातील नेत्यांनी उदासीन भूमिका घेतली. इ. स. १८८५ मध्ये तिनेच 'राष्ट्रीय सभा' असे नाव धारण करून, नवा अवतार घेतला. नावात 'राष्ट्रीय'ता होती पण तिच्यामध्ये राष्ट्रातील सर्वसामान्य लोकांचा एकही प्रतिनिधी नव्हता. शेतकऱ्यांचे संख्याधिक्य जास्त असलेल्या, या देशातील 'राष्ट्रीय' नाव धारण करणाऱ्या सभेत शेतकऱ्यांचा प्रतिनिधी नव्हता. राष्ट्रीय सभेच्या वार्षिक अधिवेशनांमध्ये उच्चवर्णीय जातीय मंडळींच्या हितसंबंधांचे रक्षण करणाऱ्या मागण्या होत असत. उच्च पदासाठी होणाऱ्या परीक्षा हिंदुस्थानमध्ये घ्याव्यात, देशी मंडळींना उच्च पदावर नेमावे, सत्तेत सहभाग द्यावा, या आणि अशाच स्वरूपाच्या मागण्या असत. जोतिबा फुले आणि त्यांचे सत्यशोधक सहकारी या संकुचित वर्णजातिविशिष्ट धोरणांवर प्रखर टीका करीत होते. राष्ट्रीय सभेवर टीका म्हणजे राष्ट्रविरोध असा उच्चवर्णीय मंडळींनी अर्थ लावून त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला. ब्राह्मणांच्या म्हणजे कोणत्याही एकाच वर्णजातीच्या हाती पुन्हा सत्ता जाऊ नये, जनद्रोही पेशवाई राजवट पुन्हा येऊ नये, इंग्रजी राजवट केव्हा ना केव्हा जाणार, याची त्यांना खात्री होती. राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनी शेती, शेतकरी, ग्रामीण कारागीर यांच्यासंबंधी एकही मागणी केली नाही. ती मान्य होण्यासाठी आग्रह धरला नाही. कृष्णराव भालेकर यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी जास्त कळवळा होता. ते कल्पक, संशोधक, सर्जक व्यक्तिमत्त्व असलेले धडाडीचे नेते होते. विविध प्रसंगी काही कल्पक कार्यक्रम घडवून आणून खळबळ उडवून देत असत. त्याचा परिणाम प्रदीर्घ काळ टिकून राहत असे. इ.स. १८८७ मध्ये त्यांनी एक व्यंगचित्र काढून त्याच्या हजारो प्रती शेतकऱ्यांना वाटल्या. हिंदी समाज वृक्षाच्या शेंड्यावर पारशी, दुसऱ्या फांदीवर ब्राह्मण, तिसऱ्या फांदीवर मारवाडी, भाटे वगैरे; चौथ्या फांदीवर बंगाली, नंतर मुसलमान, असे सर्व त्यांच्या त्यांच्या सामाजिक दर्जाप्रमाणे त्या वृक्षावर उंच-खाली बसलेले आहेत. हे सर्व झाड शेतकऱ्याच्या डोक्यावर उगवलेले आहे. तो शेतकरी अशक्त, हडकुळ्या शरिरयष्टीचा, कमरेतून वाकलेला, गलितगात्र, भांबावलेला चेहरा, असा दाखविला आहे. त्याच्या बोकांडीवर सर्व ऐतखाऊ, तुंदिलतनू खुशालचेंडूप्रमाणे

बसले आहेत. ते ओझे उतरावे म्हणून, तो आशेने कोणाची तरी वाट पाहत आहे. त्याला कोणीही मदत करीत नाही. या समाज व्यवस्थेत शोषकांचीही श्रेणीबद्धता आहे. उच्चनीच भेदभाव आहेत. शेतकऱ्यांना यातना देण्यासाठी आपापसातील भेदभाव विसरून ते एक होतात. शेतकऱ्यांना दुसरे कोणीही मदत करणार नाही. त्यांचे प्रश्न त्यांनीच स्व-बळावर सोडवावेत, असा अर्थ त्या चित्रातून स्पष्ट होतो.

असेच दुसरे अर्थपूर्ण चित्र काढून शेतकरी प्रश्नांकडे त्यांनी लक्ष वेधून घेतले. राष्ट्राचा गाडा मराठे, माळी, धनगर, महार, मांग, भिल्ल ओढीत आहेत. त्या गाड्यात युरोपियन आणि देशी उच्चवर्णीय मंडळी बसली आहेत. वाट; उंच टेकड्या आणि खोल उताराची आहे. तरीही गाड्यातील मंडळी खाली उतरत नाहीत. देशी मंडळी, गाड्यात आपणालाच स्वत:ची जागा पाहिजे, म्हणून युरोपियनांशी भांडत आहेत. गाडा ओढणाऱ्यांच्या पोटात अन्न-पाणी नाही. डोळ्यांवर अज्ञानाची ढापणे आहेत. त्यांना कोणीही अन्नपाणी देत नाही किंवा त्यांची ढापणे काढण्याचा प्रयत्न करीत नाही. ज्यांच्या कष्टावर राष्ट्राचा गाडा चालतो, त्यांच्या अन्नान्नदशेचा कोणीच विचार करीत नाही. राष्ट्राच्या गाड्यात बसून तो हाकण्यासाठी मात्र भांडणे चालू आहेत. म्हणजे राज्यसत्ता कोणाच्या हातात असावी, याविषयी त्यांच्यामध्ये जागृती होती. राष्ट्रीय म्हणविणाऱ्या पुढाऱ्यांच्या प्रवृत्तीचे ते बोलके चित्र रेखाटले होते. ते चित्र त्या काळात फारच गाजले आणि चर्चेचा विषय झाले.

इ. स. १८८८ मध्ये प्रिन्स अलबर्ट व्हिक्टर यांनी पुणे येथे भेट दिली. तेव्हा भालेकरांनी 'दीनबंधू फ्री स्कूल' ही शाळा स्थापन करून त्यांचे भाचे गणपत सखाराम पाटील यांची मुख्याध्यापकपदी नेमणूक केली. प्रिन्स व्हिक्टर यांच्या स्वागतासाठी दीनबंधू शाळेचे विद्यार्थी रांगेत उभे केले. त्यांच्या हातात एक बोर्ड होता. त्यावर इंग्रजी मोठ्या अक्षरात पुढील अर्थाचा मजकूर होता. "आपल्या आजीबाईंना सांगा, आम्ही लोक सुखी आहोत. पण एकोणीस कोटी लोक विद्याविहीन आहोत." या कल्पक घटनेचा परिणाम अपेक्षित झाला.

राष्ट्रीय सभेविषयी शेतकऱ्यांचे काय मत आहे आणि त्यांची कोणती गाऱ्हाणी आहेत, हे राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांना आणि इंग्रज सरकारला कळावे म्हणून जोतिबा, भालेकर आणि त्यांच्या सहकार्यांनी इ.स. १८८९च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशन मंडपाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर भुसा भरलेला शेतकऱ्यांचा एक पुतळा उभा केला. त्याच्या अंगावर फाटक्या कपड्यांची लक्तरे लोंबत

आहेत, त्याचे पोट पाठीस लागले आहे, गालफडे बसलेली, भुकेमुळे चेहरा केविलवाणा झालेला, असा तो पुतळा राष्ट्रीय सभेच्या नेत्यांपुढे आपले दुःख, दैन्य, दारिद्र्य, पीडा याविषयी मूकपणे बोलत होता.

शेतकऱ्यांची गाऱ्हाणी थेट इंग्लंडच्या राणीपर्यंत जावीत, यासाठी एक संधी आयतीच चालून आली. इ.स. १८८८च्या मार्च महिन्यात व्हिक्टोरिया राणीचा मुलगा ड्यूक आणि डचेस ऑफ कॅनॉट पुण्याला सहकुटुंब आला होता. जोतिबा फुले यांचे जिवलग मित्र आणि पुण्यातील एक श्रीमंत गृहस्थ हरी रावजी चिपळूणकर हे ड्यूक ऑफ कॅनॉटचे मोठे चाहते होते. त्याच्या सन्मानासाठी हरी रावजी यांनी फार मोठी मेजवानी दिली. समारंभाचे ठिकाण सुशोभित करण्यासाठी त्यांनी खूप मोठा खर्च केला. स्वागत समारंभाची व्यवस्था योजनापूर्वक आणि चोख केली होती. कोणी कोठून प्रवेश करावयाचा? कोणी कोठे बसावयाचे, मंचावर कोण कोण, कोठे बसणार, हे सर्व निश्चित केले होते. समारंभासाठी दरबारी मानकरी, संस्थानिक, अधिकारी यांना प्रवेश पत्रिका पाठवून निमंत्रित केले होते. २ मार्च १८८८ रोजी अत्यंत थाटामाटात आणि झगमगाटात भव्य कार्यक्रम सुरू झाला. भरजरी कपडे, जडजवाहिरे परिधान करून सर्व मानकरी मेजवानीला उपस्थित राहिले.

मोक्याच्या जागी पहारेकरी आणि पोलीस होते. जोतिबा फुले आता वयोवृद्ध झाले होते. दगदग, धावपळ, संप, बहिष्कार यामुळे थकवा जाणवत होता. पण मन आणि बुद्धीमध्ये पूर्वीचाच उत्साह, उल्हास आणि तडफ होती. त्यांनी डोक्याला जुने फाटके मुंडासे बांधले. अंगात अंगरखा न घालता खांद्यावर एक फाटकी घोंगडी घेतली. फाटलेले, मळके आखूड धोतर गुडघ्यापर्यंत नेसले. कमरेला एक विळा खोवला. फाटलेला जोडा जाडभरड दोरीने बांधून पायात घातला. हातात एक उंच जाड काठी घेऊन ते अशा वेषात मुद्दाम मेजवानीला आले. हरी रावजी आणि मित्रांनी गुप्तपणे हा बेत केला होता. याची वाच्यता झालेली नव्हती. त्यांचा हा अवतार पाहून सोल्जरांनी त्यांना अडवून धरले. आत जाण्याची परवानगी मिळेना. हे गृहस्थ हरी रावजी यांचे मित्र असतील आणि ते निमंत्रित असतील, यावर सोल्जरांचा विश्वास बसत नव्हता. ही गोष्ट आत हरी रावजी यांना कळली. ते लगबगीने बाहेर आले आणि जोतिबा फुले यांना आत घेतले. ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्या शेजारी त्यांच्यासाठी आसन राखून ठेवले होते. ड्यूक ऑफ कॅनॉट यांनी 'हे गृहस्थ कोण?' असे विचारले. त्यांनी राजपुत्राला त्यांच्या महान कार्याविषयी माहिती दिली आणि आता ते इंग्रजी भाषेतून बोलणार आहेत, असे सांगितले.

राजपुत्राला फारच आश्चर्य वाटले. मेजवानीला जमलेल्या मंडळींमध्ये कुजबूज सुरू झाली. जोतिबा फुले उठून उभे राहिले आणि इंग्रजी भाषेतून ओजस्वी, प्रभावी वाणीने बोलू लागले. राजपुत्राला उद्देशून ते म्हणाले, "आपणास मेजवानी देणारे, या मेजवानीला येणारे, तसेच आपल्या भेटीला येणारे ऐश्वर्य-संपन्न एतद्देशीय गृहस्थांना पाहून, या देशातील सर्व प्रजेच्या स्थितीबद्दल आपण जी कल्पना कराल ती चुकीची आहे. त्यांच्या भरजरी कपड्यांकडे आणि मौल्यवान चकाकणाऱ्या हिऱ्यांकडे पाहून तुम्हास असा भास होईल की, हिंदुस्थान देश मोठा सुखी-समाधानी आहे. परंतु वस्तुस्थिती निराळीच आहे. सुवर्णालंकारांनी मढविलेले नि अत्तरांच्या फायांनी सुगंधित केलेली वस्त्रे परिधान केलेले श्रीमंत लोक या देशातील जनतेचे खरे प्रतिनिधी नाहीत. खरा हिंदुस्थान खेड्यात आहे. त्यांचा मुख्य उद्योग शेती कसणे, हा आहे. त्यांची संख्या बळीस्थानातील एकूण लोकसंख्येच्या ऐंशी टक्के एवढी आहे. जगात सुधारलेल्या या इंग्रजी राजवटीत तरी आपली सुधारणा होईल, अशी त्यांना फार आशा होती. परंतु या शेतकऱ्यांची खरी स्थिती कशी आहे, हे आमच्या दयाळू राणीला बरोबर कळले नसल्यामुळे त्यांच्या खऱ्या सुधारणेचे कार्य तिच्या या देशातील सरकारकडून पाहिजे तसे होत नाही. या देशातील सर्व शेतकऱ्यांची कशी हीन दशा आहे; हे आपल्या लक्षात यावे, म्हणून मी या पोशाखात आपल्यासमोर उभा आहे. आपण विलायतेस परत जाल, तेव्हा महाराज, आपण आपल्या दयाळू आईला भेटून तिच्या कानावर आम्हा सर्व शेतकऱ्यांच्या दुःस्थितीची कहाणी घाला. त्यांचा एकच पण महत्त्वाचा संदेश तिच्या कानावर घाला, तुझ्या या दुःस्थितीत पडलेल्या खऱ्या प्रजेला प्राथमिक शिक्षण सक्तीने व मोफत दे... गोऱ्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांची आणि शेतकऱ्यांना गोऱ्या अधिकाऱ्यांची भाषा कळत नसल्यामुळे रयतेच्या खऱ्या अडचणी सरकारला कळत नाहीत. त्यामुळे ब्राह्मण कारकुनांच्या मध्यस्थीने साहेब लोकांशी बोलावे लागते. लाच दिली तरच काळे-गोरे अधिकारी शेतकऱ्यांची कामे कारतात. लाच दिली नाही तर ते कारकून; साहेबांना भलतेच सांगून शेतकऱ्यांना अडचणीत आणतात.

"जर राजपुत्रांना खरा हिंदुस्थान पाहवयाचा असेल आणि राणीला खरा वृत्तान्त सांगावयाचा असेल, तर त्यांनी आजूबाजूच्या काही खेड्यांना भेटी द्याव्यात. अज्ञानी जनतेचे दारूण दारिद्र्य प्रत्यक्ष पाहावे. महारमांगांच्या वस्त्यांनाही भेटी द्याव्यात, आणि त्या वस्त्या उकिरड्यापेक्षाही वाईट असून

मनुष्य वस्तीसाठी अयोग्य आहेत की नाहीत, या विषयी स्वत: खात्री करून घ्यावी. खरा हिंदुस्थान असा आहे. राजपुत्राने आणि त्यांच्या पत्नीने महाराणी व्हिक्टोरियाला असे सांगावे की, गरीब जनता दारिद्र्यामध्ये पिचत असून त्यांना शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे, हा आमचा निरोप द्यावा.''

जोतिबा फुले यांचे हे इंग्रजीतील ओजस्वी, धारदार भाषण ऐकून राजपुत्र चकित आणि प्रभावित झाले. या भाषणानंतर जोतिबांनी 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथातील काही भाग वाचून तो इंग्रजीतून समजून सांगितला.

जोतिबा फुले यांनी आयुष्यभर, शिक्षणप्रसार, शेती आणि शेतकऱ्यांच्या परिस्थितीमध्ये क्रांतिकारी परिवर्तनाचा ध्यास घेतला. त्यांच्या सहकारी आणि अनुयायांनी मन:पूर्वक साथ दिली. 'दीनबंधू' या सत्यशोधकी वृत्तपत्राने शेतकरी आंदोलनाला आणि सर्वच कार्यक्रमांना ठळक प्रसिद्धी दिली. सत्यशोधकांवर होणाऱ्या टीकेला आणि आरोपांना सडेतोड उत्तरे दिली. त्यामुळे विरोधकांना माघार घ्यावी लागली. संघर्षाच्या या धोरणाबरोबर शेती उत्पादन कसे वाढवावे, नव्या नव्या उत्पादन तंत्रांचा विकास आणि अवलंब कसा करावा, यावरही लेख प्रसिद्ध केले. कृष्णराव भालेकर यांनी ऑईल इंजिनचे ड्रॉईंगच तयार केले होते. त्यात यश आले नाही. विदर्भामध्ये सूतगिरणी काढण्याचा प्रयत्न केला. पण ते काम पूर्ण होऊ शकले नाही. म्हणून शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी केलेल्या प्रयत्नांचे महत्त्व कमी होत नाही. विकासाच्या दिशा आणि वाटा त्यांना अचूक कळल्या होत्या. हे प्रयत्न पुढे राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, नाम. भास्करराव जाधव, डॉ. पंजाबराव देशमुख 'जागृति'कार भगवंतराव पाळेकर, 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील, कर्मवीर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सुरू ठेवले. त्यामध्ये त्यांना यशही आले.

## लष्कराच्या पलटणीत भाषणे

१८८२ ते १८८८ हा काळ सत्यशोधक चळवळीच्या विविध उपक्रमांनी गजबजलेला काळ आहे. जोतिबा फुले यांना विविध भागांतून, विविध स्तरांतून, विविध व्यावसायिकांची निमंत्रणे येत होती. वेगवेगळ्या वर्णजातिस्तरातील अनुयायी मिळत होते. सत्यशोधक समाज आणि पुढाऱ्यांची लोकप्रियता शिगेला पोहोचली होती. ग्रामीण भागात वैचारिक जागृतीचे वादळ निर्माण झाले होते. विविध आंदोलने होत होती. रचनात्मक, सामाजिक, शैक्षणिक कार्यक्रम होत होते. लष्करातील अधिकारी जोतिबा फुले यांना पलटणीतील

जवानांपुढे भाषण करण्यासाठी बोलावीत असत. दर्याजीराव थोरात, आर. एस. घाडगे, सरदार बहाद्दर लक्ष्मणराव देसाई, हवालदार शिवाजीराव देसाई, लष्करातील मोठ्या हुद्द्यावर असलेली मंडळी सत्यशोधक विचारांची अनुयायी होती. ते जोतिबा फुले यांना मुद्दाम पाचारण करून त्यांची भाषणे आयोजित करीत होते. त्या भाषणांचा आशय पुढीलप्रमाणे असायचा : "शिक्षण सार्वत्रिक, सक्तीचे आणि मोफत असले पाहिजे. या इंग्रजी राज्यात शिक्षण घेण्याची सर्वांना मुभा आहे. अस्पृश्यांनी शिकून झटपट शहाणे व्हावे. तुम्ही सगळे सत्यशोधक मताप्रमाणे वागा म्हणजे जातिभेद नष्ट होऊन समता प्रस्थापित होईल.

"देशासाठी रक्त सांडणाऱ्या क्षत्रियांच्याच हातात देशाचे राज्य असले पाहिजे. लढवय्या क्षत्रियांची मने भट-पुरोहितांनी गुलाम बनविली आहेत. हे राज्य; भट-पुरोहितांच्या हातात जाता कामा नये. महार-मांग हे कट्टर क्षत्रीय आहेत, म्हणून उच्चवर्णीय त्यांचा द्वेष आणि छळ करतात. त्यांच्या नादी लागून आपणही अस्पृश्यांना नीच मानले आहे. आता त्यांना बंधुभावाने मदत करा. देशात व धर्मात उच्च-नीच भेदभाव माजविणाऱ्यांवर सर्व बाजूंनी बहिष्कार घालून त्यांचा इंगा जिरवा, म्हणजे ते शुद्धीवर येतील. बळीस्थानातील शेतकरी, कारागीर, मजूर व शिपाई हेच प्रथम सुशिक्षित झाले पाहिजेत. कारण त्यांच्या प्रयत्नांमुळेच देशाचा उद्धार होणार आहे. तुम्ही शूर शिपायांनी पळपुट्या पुरोहितांच्या पाया पडू नये. त्यांच्या नादी लागू नये. मुला-मुलींना शिक्षण द्या. त्यांना स्वाभिमानी बनवा." भाषणातून असा संदेश देत असत. विचारांचे मूळ सूत्र सुटू न देता समयोचित विचार ते मांडीत असत. प्रजाहितदक्ष राजवट त्यांना अपेक्षित होती. इंग्रज-ब्राह्मणी नोकरशाही; प्रजेला पीडा देणारी; होती. त्यांच्यावर इंग्रज सरकारचा अंकुश नव्हता. म्हणून जोतिबा त्या राजवटीला विरोध करतात. शिक्षणावर भर देतात.

## छत्रपतींच्या गादीविषयी कृतज्ञता

कोल्हापूर आणि सातारा येथील दोन्ही गाद्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वंशजांच्या आहेत. कोल्हापूरच्या महाराणी ताराबाई यांनी गादीच्या रक्षणासाठी अभूतपूर्व संघर्ष केला. शौर्य आणि पराक्रमाची शर्थ केली. ती क्षत्रीय कुळातील खरी रणरागिणी होती.

तिकडे साताराचे प्रतापसिंह महाराज कर्मठ भट-पुरोहितांविरुद्ध संघर्ष करीत

होते. छ. शिवाजी महाराज आणि छ. संभाजी महाराज यांच्यातील सद्गुण त्यांच्या रक्तात उतरले होते. त्यांनी वेदोक्ताचा अधिकार बजावला, मुलींना संस्कृतादी भाषेचे शिक्षण, शस्त्र चालविण्याचे शिक्षण दिले. छापखाना टाकायला प्रोत्साहन दिले. बहुजनांना विद्या देण्याचा कोणीही प्रयत्न केला की, कर्मठ ब्राह्मण त्यांच्याशी वैर धरतात. प्रतापसिंह महाराजांना त्यांनी वेडे ठरविले. त्यांना सातारा येथील अजिंक्यतारा येथे कैदेत ठेवून त्यांच्यावर कडक पहारा ठेवला. इ.स. १८६६ नंतर छत्रपती राजाराम महाराज यांनी भिक्षुकशाहीला विरोध केला. त्यांच्यानंतर चौथे शिवाजी महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले. ते अल्पवयीन होते म्हणून तेथील एजंट आणि दरबारचे दिवाण रा. ब. महादेव वासुदेव बर्वे या दोघांचे दरबारात खूपच प्रस्थ वाढले. प्रजेच्या प्रश्नांकडे ते लक्ष देत नव्हते. ब्राह्मणांसाठी सत्तेचा वापर होत होता. प्रजा त्रस्त झाली होती. चौथे शिवाजी महाराज वयात आल्यावर त्यांनी स्वत: राज्यकारभारात लक्ष घातले. त्यांची लोकप्रियता वाढू लागली. बर्वे अप्रिय झाले. कारभारावरील त्यांची पकड सैल होऊ लागली. त्यांनी कावा केला. महाराजांना वेड लागले आहे, अशी अफवा पसरविली. लोकांचा विश्वास बसत नव्हता. ही खोटीच हूल आहे, हे ब्रह्मकपट आहे, हे लोकांनी ओळखले. न्यायप्रिय इंग्रज सरकारकडून तरी न्याय मिळेल, अशी अपेक्षा होती. पण इंग्रज अधिकारीही ब्राह्मणांच्या कानी लागले. महाराजांना अहमदनगरच्या किल्ल्यात कोंडून ठेवले. तेथे त्यांचा अवमान करणे, अवज्ञा करणे, घालूनपाडून बोलणे, महाराजांना मुद्दाम चिडविणे, चिडले की त्यांचा शारीरिक छळ करणे, अशा प्रकारे अमानुष, क्रूर आणि विकृत वागणूक दिली. काही समजदार ब्राह्मणांना बर्वे यांची वागणूक आवडली नाही. ते बर्वे यांच्या विरोधात आणि महाराजांच्या बाजूने उभे राहिले. महाजारांचा कैवार घेऊन लोकक्षोभ वाढला तर इंग्रजी राजवट पालथी पडेल आणि पुन्हा पेशवाई येईल आणि महाराज संपले; तर ब्राह्मणांचा शत्रू संपेल, अशा दोन्हीही गोष्टी किंवा दोन्हींपैकी एकही घडून आली तरी ब्राह्मणांना हवी होती, म्हणून काही ब्राह्मणांनी दोन्ही बाजू उचलून हे प्रकरण पेटते ठेवले.

या प्रकरणात 'केसरी' आणि 'मराठा' या पत्रांच्या तरूण संपादकांनी— बा. गं. टिळक आणि गो. ग. आगरकर यांनी—महाराजांची बाजू उचलून धरली. बर्वे आणि इंग्रज सरकार यांच्यावर परखड टीका केली. म्हणून त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. तो मुंबईच्या हायकोर्टात चालला. बॅरिस्टर, वकील आणि इतर खर्च करण्याची या तरूण संपादकांची ऐपत

नव्हती म्हणून जोतिबा फुले यांनी त्यांचे मित्र आणि श्रीमंत व्यापारी रामसेठ उरवणे यांना दहा हजार रुपयांचा जामीन द्यावयास सांगितले. वकिलांचा खर्चही दिला. हा खटला आपण जिंकलो तर इंग्रज सरकार, महाराजांवर म्हणजेच देशी संस्थानिकांवर अन्याय करते, हे सिद्ध होईल. बर्वे आणि त्या प्रवृत्तींच्या दुष्ट कारवायांना आळा बसेल, असा जोतिबा फुले यांचा विचार होता. कोर्टाचा निकाल लागला. टिळक-आगरकरांना चार महिने साध्या कैदेची शिक्षा झाली. इ.स. १८८२ मध्ये त्यांची मुंबईजवळील डोंगरीच्या तुरुंगातून सुटका झाली. मुंबईतील सत्यशोधक कामगार पुढारी रा. ब. नारायण मेघाजी लोखंडे आणि इतर मराठा सत्यशोधक मंडळींनी त्यांची थाटात मिरवणूक काढली. त्यांना शेला-पागोटे, हार-तुरे अर्पण केले. त्यांच्या सन्मानासाठी पानसुपारीचा कार्यक्रम आयोजित केला. पुणे येथेही जोतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची सभा बोलावून त्यांच्या सन्मानाप्रीत्यर्थ शेला-पागोटे, हार-तुरे दिले. पानसुपारीचा कार्यक्रमही आयोजित केला. छत्रपतींच्या गादीवर होणाऱ्या अन्यायाला या तरूण संपादकांनी वाचा फोडली. सरकारच्या पक्षपाती धोरणावर टीका केली आणि छत्रपतींच्या गादीविषयी निष्ठा व्यक्त केली; म्हणून त्यांचा दोन्ही प्रमुख शहरात, जाहीर सन्मान केला.

## विष्णुशास्त्रींच्या प्रेताची विटंबना थांबविली

कृष्णशास्त्री चिपळूणकर यांना त्या काळात पुण्यामध्ये प्रतिबृहस्पती म्हणून ओळखले जात होते. जोतिबा फुले यांच्याशी त्यांची मैत्री होती. जोतिबा फुले यांच्या शैक्षणिक कार्याला प्रारंभी त्यांनी सहकार्य केले. त्या काळातील अनेक शास्त्री मंडळी अंगवस्त्र बाळगीत असत. बाहेर सोवळे आणि पवित्रपणाचा डौल मिरवत असत. कृष्णशास्त्री यांनीही अंगवस्त्र ठेवले होते. 'गुलामगिरी' (१८७३) या ग्रंथात कोणाचाही नामनिर्देश न करता 'रांडेने भ्रष्ट केलेला प्रतिबृहस्पती' असा सूचकतेने उल्लेख आला आहे. हे शब्द विष्णुशास्त्री चिपळूणकर यांना चांगलेच झोंबले. त्यांच्या उर्मी लागले, तो राग होताच. शिवाय सनातनी छावणीचे वैचारिक नेतृत्त्व त्यांच्याकडे होते. जोतिबा फुले आणि सत्यशोधक समाजाला त्यांनी शत्रुस्थानी मानले होते. 'निबंधमाले'तून (१८७४) सत्यशोधक समाजाच्या वार्षिक अहवालावर अभिप्राय देण्याचे निमित्त करून 'ब्राह्मणांचे कसब' (१८६९) आणि 'गुलामगिरी' (१८७३) या ग्रंथांवर उथळ शेरेबाजी करीत करीत जोतिबा फुले यांच्यावर वैयक्तिक हल्ला केला. निंदानालस्ती केली. चिपळूणकरांचा सर्वच सुधारकांवर राग होता.

म्हणून लोकहितवादी, मोरोबा कान्होबा विजयकर, घाशीराम कोतवालचे (१८६३) कर्तेही त्यांच्या टीकेतून सुटले नाहीत.

माधव वासुदेव बर्वे प्रकरणाची सुनावणी मुंबई येथील उच्चन्यायालयात सुरू असताना; चिपळूणकर, बर्वे यांच्या बाजूने उभे राहिले. या निकालानंतर बर्वे यांनी टिळक-आगरकर यांच्यावर संपादक या नात्याने अब्रू नुकसानीचा दावा दाखल केला. त्या काळातच विष्णुशास्त्री आजारी पडले. त्या वेळी त्यांचे वय अवघे बत्तीस वर्षे होते. त्यांच्या पोटात आग पडत होती. डॉ. विश्राम रामजी घोले, त्यांच्यावर उपचार करीत होते. त्यांना खूप ताप येत होता. तापाच्या भरात ते असंबद्ध बडबडत होते. "काका, मला धरा, मी मरतो आहे. मी तुमचे औषध घेणार नाही. मला विष घेऊन मरावयाचे नाही. याद राखा. तुम्हाला जाब द्यावा लागेल. हा कोल्हापूर महाराजांचा खटला आहे." असे ते बडबडत होते. डॉ. घोले हे, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचेही मित्र होते. त्यांच्यावरही डॉ. घोले यांनी उपचार केले होते. त्या नात्याने विष्णुशास्त्री, डॉ. घोले यांना काका म्हणीत होते. विष्णुशास्त्रींचा आजार बरा झाला नाही. १७ मार्च १८८२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूविषयी पुण्यामध्ये खूप प्रवाद पसरले होते. ते फारच संकुचित विचार विश्वामध्ये राहिले, वावरले आणि जगले. एका जातीच्या पलीकडे त्यांनी विचार केला नाही. इतरांच्या हिताअहिताची काडीमात्र पर्वा केली नाही. त्यांना तशी गरजही वाटली नाही. वर्णाहंकार माणसाला किती विचारांध आणि बौद्धिकदृष्टीने पंगू बनवू शकतो; त्याचे हे समर्पक उदाहरण आहे. म्हणून त्यांच्या लेखनात रुक्षपणा आणि सहानुभूतिशून्यता मोठ्या प्रमाणात आहे. त्यांचे लेखन ब्राह्मणी अहंकारावर फुंकर मारून त्यांच्यात चेतना निर्माण करीत होते. एकलकोंडेपणामुळे त्यांचे मानसिक संतुलन बिघडले होते. कोल्हापूर खटल्याचा धसका घेऊन त्यांनी आत्महत्या केली, अशी चर्चा सुरू झाली. त्यांच्या अंत्यविधीच्या वेळी पोलिसांनी प्रेताला हात लावावयास मनाई केली. "विष्णुशास्त्री चिपळूकर यांचे निधन नैसर्गिक मृत्यूमुळे झाले आहे, असे प्रमाणपत्र डॉक्टरकडून आणल्याशिवाय प्रेत उचलता येणार नाही." असे पोलिसांनी बजावले. विष्णुशास्त्री यांच्यावर, त्यांच्या काही अन्य डॉक्टर, मित्रांनी उपचार केले होते, त्यांनी, पोलिसी ससेमिरा पाठीमागे लागेल म्हणून घाबरून प्रमाणपत्र देण्यास नकार दिला. शेवटी प्रा. केरो नाना छत्रे आणि इतर वजनदार मंडळी डॉ. विश्राम रावजी घोले यांच्याकडे साहाय्य मागण्यासाठी गेली. विष्णुशास्त्री मरतानाही वैर विसरले नाहीत, म्हणून तर उपचार करावयास गेलेल्या डॉ. घोले यांना अद्वातद्वा बोलले.

ते औषधाऐवजी विष देतील, असा संशय घेतला. जोतिबा आणि डॉ. घोले प्रगल्भ विचारांचे होते. त्यांच्याकडे क्षमाशीलता होती. डॉ. घोले यांनी त्यांना हवे तसे प्रमाणपत्र लिहून दिले. 'जीवनान्तानंतर वैराचाही अंत होतो' या सुभाषितातील जीवनमूल्याची आणि नैतिकमूल्याची त्यांनी प्रतिष्ठा राखली. ते प्रमाणपत्र घेऊन पोलिसांना नेऊन दिले. आणखी काही कटकटी वाढू नयेत म्हणून प्रेतयात्रा धावत पळत स्मशानात नेली. भीतीने अंत्ययात्रेत फार कमी लोक सहभागी झाले होते. तेथे श्रद्धांजलीचे एकच भाषण झाले. प्रेताला अग्नी देऊन; पोलिसांच्या भीतीमुळे लोकांची ताबडतोब पांगापांग झाली.

## स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार

स्त्रियांना पुरुषांसारखा समान दर्जा, समान अधिकार असले पाहिजेत, असे विचार जोतिबा फुले मांडीत होते. सर्वच धर्माच्या धर्मग्रंथांचे कर्ते पुरुष असल्यामुळे तेथेही स्त्रियांच्या बाबतीत पक्षपात झालेला आहे, असे त्यांचे मत होते. पुरुष अनेक बायका करतात, तसेच पाहिजे त्या वेळी तिला घटस्फोटही देतात. अटळ आणि अपरिहार्य परिस्थितीमध्ये स्त्रियांनाही घटस्फोटाचा अधिकार असला पाहिजे, असेही त्यांना वाटत होते. तसा आग्रह धरण्याची संधी एका घटनेमुळे मिळाली.

रखमाबाई नावाच्या बावीस वर्षे वयाच्या महिलेचे, तिच्या लहानपणीच लग्न झाले होते. तिचा पती रोगीट, अक्षरशत्रू आणि दरिद्री होता. अशा पतीबरोबर मी संसार करणार नाही, असा ठाम निर्णय तिने घेतला. त्या वेळी सर्व समाज तिच्या विरोधात खवळून उठला. देवाब्राह्मणांच्या साक्षीने केलेल्या नवऱ्याशी संसार करावयास एक हिंदू स्त्री नकार देते, म्हणून तिचा छळ झाला. निंदानालस्ती झाली. मुंबई येथील वरिष्ठ न्यायालयाने तिच्या विरोधात निकाल दिला. रखमाबाईला शिक्षणाची आवड होती. सर्वार्थाने अनुरूप पती असावा, अशी तिची इच्छा होती. ती चुकीची नव्हती, असे सुधारकांना वाटले. इ.स. १८८६ मध्ये जोतिबा फुले आणि मुंबई येथील सहकाऱ्यांनी पुढाकार घेऊन तिला सर्व प्रकारचे साहाय्य केले. तिच्या नवऱ्याला काही रोख रक्कम देऊन त्याची समजूत घातली. खरे तर घटस्फोट घेणे-देणे वाईटच आहे. पण विशिष्ट अपरिहार्य परिस्थितीमध्ये तो पुरुषांनीच द्यावा, याला कायदा आणि समाजही मान्यता देतो. मग तशाच विशिष्ट अटळ परिस्थितीमध्ये स्त्रियांनाही, पुरुषांना घटस्फोट देण्याचा अधिकार असला पाहिजे, या तत्त्वालाही कायदा आणि समाजाने मान्यता द्यावी, हे नैसर्गिक आणि सामाजिक न्यायाचे

तत्त्व, स्त्री-पुरुष समतेचे तत्त्व, या भूमिकेच्या पाठीमागे होते. हे प्रकरण मिटल्यानंतर रखमाबाई इंग्लंडला गेल्या. तेथे स्त्री-स्वातंत्र्याची कैवारी म्हणून त्यांचा १८८९ मध्ये जयजयकार झाला. तिथे शिक्षण घेऊन त्यांनी वैद्यकीची एम.डी. ही उच्च पदवी प्राप्त केली. इ.स. १८९५ पासून गुजरातमध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून नोकरी केली. इ.स. १९३० मध्ये त्या सेवानिवृत्त झाल्या आणि २५ डिसेंबर १९५५ रोजी मुंबईतील फ्रेंचपुलाजवळ त्यांच्या निवासस्थानी या कर्तृत्ववान महिलेचा अंत झाला.

## स्त्री-पुरुष समतेचा कैवारी

स्त्री-पुरुष समान दर्जा, समान हक्कांचा आग्रह जोतिबा फुले यांनी अखंडपणे चाळीस वर्षे धरला. त्यासाठी काही ना काही कृती केल्या. मुलींसाठी शाळा, अनाथ महिलाश्रम आणि बालहत्या प्रतिबंधक गृह, केशवपनास विरोध, विधवा पुनर्विवाहांना प्रोत्साहन, बालविवाह विरोध, द्विभार्याप्रतिबंध, देवदासीप्रथेला विरोध, स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार; ही त्यांनी आणि त्यांच्या सहकार्यांनी केलेली कामे आधुनिक महाराष्ट्राच्या जडणीघडणीत मोलाची ठरली आहेत.

बुलढाणा येथील बापूजी हरी शिंदे हे जोतिबांचे अनुयायी आणि सहकारी होते. तसेच जोतिबा फुले यांच्या कॉन्ट्रक्टिंग कंपनीतील भागीदार होते. बापूजी शिंदे यांचे बंधूही सत्यशोधक समाजाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेत होते. घरात त्याच विचारांचे वातावरण होते. बापूजी शिंदे यांची कन्या ताराबाई शिंदे यांनी इ.स. १८८२ मध्ये 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ लिहिला. शास्त्रे, पुराणे, महाकाव्य, पोथ्या, आधुनिक कथा, कादंबऱ्या, नाटके यांचा आधार देऊन पुरुषांचे वागणे स्त्रियांच्या बाबतीत पक्षपाती, अन्यायाचे आहे. स्त्रिया पुरुषांपेक्षा कष्टाळू, सहनशील, क्षमाशील, संयमी, इमानी असतात. विधवा स्त्रियांना अमानुष वागणूक दिली जाते. स्त्री-पुरुष यांच्यामध्ये समता असावी, असे आग्रही प्रतिपादन या ग्रंथातून त्यांनी केले. स्त्री-मुक्ती, स्त्री-पुरुष समतेची मांडणी करणारा जागतिक पातळीवरचा हा आद्य ग्रंथ म्हणून मान्यता पावला आहे. आणि ताराबाई शिंदे या जागतिक पातळीवरील आद्य स्त्रीवादी लेखिका ठरल्या आहेत. तो ग्रंथ प्रसिद्ध झाल्याबरोबर, त्यावर फार कडक टीका झाली. त्यातील विचारांना विरोध झाला. जोतिबा फुले यांनी मात्र या ग्रंथाचे आणि त्यातील विचारांचे समर्थन करून ताराबाई शिंदे यांना पाठिंबा दिला.

पंडिता रमाबाई यांचे धर्मांतर हा त्या काळातील सनसनाटी विषय होता.

सर्व सुधारक आणि सनातनी ब्राह्मण या धर्मांतराने रमाबाई यांच्यावर चिडले होते. त्यांची निंदा होत होती. एका स्त्रीविषयी फारच अनुदार आणि असंस्कृत पातळीवर जाहीर चर्चा होत होती. जोतिबा फुले यांनी या धर्मांतराचे संमिश्र स्वागत केले. पं. रमाबाई यांच्या सुधारणा कार्याला ब्राह्मणांनी पाठिंबा दिला नाही, सहकार्य दिले नाही. उलट विरोध केला. निंदा केली. छळ केला. म्हणून त्यांनी धर्मांतर केले. 'रमाबाई बाटली, रमाबाई बाटली' असे म्हणण्याचा अधिकार बाटलीतील मद्य घेऊन बडबडणाऱ्यांना नाही, असेही ते उपरोधाने लिहितात. जोतिबा फुले यांनी कोणाच्याही धर्मांतराला कधीही पाठिंबा दिला नाही. ब्राह्मणीधर्मावर ते टीका करीत होते, कारण हिंदू धर्मात आमूलाग्र बदल व्हावा, असे त्यांना वाटत होते. त्यांच्या शाळेतील एक शिपाई ख्रिस्ती धर्माचा बाप्तिस्मा घेणार आहे, असे त्यांना कळल्यानंतर त्यांनी त्याला समजावून सांगून त्याचे मन:परिवर्तन केले आणि धर्मांतर रोखले.

## ग्रामजोश्यांविरुद्ध मोहीम

२९ मार्च १८८६ रोजी तळवणे, ता. जुन्नर, जि. पुणे येथे सत्यशोधक समाजाचे अनुयायी गुणाजी बापूजी पाटील शिंदे यांनी आपले लग्न सत्यशोधक समाजाच्या पद्धतीने लावले. ब्राह्मणांनी त्या लग्नाला विरोध केला. भाऊ कोंडाजी पाटील डुमरे यांनी पोलिसांच्या मदतीने हे लग्न निर्विघ्नपणे पार पाडले. त्यामुळे ब्राह्मण जास्तच चिडले. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावेल. आता दक्षिणा बुडाली, पण सर्वच समाजाने ब्राह्मणांशिवाय लग्नादी विधी पार पाडले तर ब्राह्मणांनी काय करावे? काय खावे? कसे जगावे? पुण्यातील ब्राह्मण पुढाऱ्यांच्या सल्ल्याने, हा खटला कोर्टात चालवावा, असे ठरले. ब्राह्मणांची दक्षिणा बुडाली आहे. लग्न कोणाकडूनही लावले तरी दक्षिणा मात्र ब्राह्मणांना दिली पाहिजे, अशी मागणी करणारा अर्ज कोर्टात सादर केला. ब्राह्मण आणि सत्यशोधक, या दोन्ही बाजूंनी हा प्रतिष्ठेचाच नव्हे, तर तत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला. दोन्ही बाजूंनी धावपळ होत होती. पुणे येथे सबॉर्डिनेट जज्ज यांच्यापुढेच हा खटला चालला. त्यांनी ब्राह्मणांच्या बाजूने निकाल दिला. जात्यहंकाराने न्यायबुद्धी झाकोळली. सर्वांना धक्का बसला. पण स्वस्थ बसून उपयोग नव्हता. सत्यशोधकांनी विचारविनिमय केला. बाळाजी कुसाजी पाटील यांनी खूप धावपळ केली. पैसा आणि वेळ खर्च केला. आता गप्प बसले तर सत्याचाच पराभव आहे. सत्याचा पराभव होता कामा नये. जिद्दीने उचल खाल्ली. न्यायाची चाड होती. मुंबई हायकोर्टात

अपिल केले. सत्यशोधक समाजाचे वकीलपत्र घन:शाम नीळकंठ नाडकर्णी यांनी घेतले. भट-जोश्यांचे वकीलपत्र महादेव चिमणाजी आपटे यांनी घेतले. आता दोन्ही बाजूंनी धावपळ होत होती. मुख्य न्यायमूर्ती सर सार्जंट चार्लस आणि न्या. काशिनाथ त्र्यंबक तेलंग यांच्यासमोर सुनावणी झाली. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकले. न्यायालयाने बाळाजी कुसाजी पाटील आणि सत्यशोधक समाजाच्या बाजूने ८ जानेवारी १८९० रोजी निकाल दिला. सत्यशोधकांना खूप आनंद झाला. लोकन्यायालयात ते अगोदरच जिंकले होते. आता कायद्याच्या लढाईतही विजय मिळाला. जुन्नरच्या भट-जोश्यांनी १८८४ मध्ये बाळाजी पाटील यांच्यावर दावा दाखल केला. २९ मार्च १८८६ रोजी प्रतिवादीने ब्राह्मणांना आठ आणे दक्षिणा द्यावी, असा निकाल दिला. त्याविरुद्ध प्रतिवादी बाळाजी पाटील यांनी जिल्हा न्यायालयात अपिल केले. तेथेही ब्राह्मणांचा दक्षिणेचा हक्क मान्य केला. पण यजमानाची इच्छा नसली तरी त्याने आपल्याकडून धर्मकार्य करवून घेतले पाहिजे, हे भटजीचे म्हणणे अप्रशस्त ठरविले. त्यानंतर मुंबईच्या उच्च न्यायालयात हा जोशीवतनाचा खटला चालला. इ.स. १८८६ मध्ये जाहीर पत्रक काढून जोतिबा फुले यांनी सर्व जनतेला आवाहन केले. "लग्नप्रसंगी पैसा, दक्षिणा, देणगी, मांडव खंडणी, कपडे, मेजवानी, शिधा यावर भटांचा काहीच अधिकार नाही." या पत्रकाच्या हजारो प्रती जनतेत वाटल्या. १८८७च्या जूनमध्ये ब्राह्मण-ब्राह्मणेतर तेढीला तीव्र स्वरूप आले. या तेढीने लढ्याचे स्वरूप धारण केले. सावकार, भट, पुरोहित यांच्याविरुद्ध हा एकत्र लढा झाला.

## अंधश्रद्धा, अंगारे-धुपारे यांना विरोध

तळेगाव ढमढेरे येथे विठोबा भुजबळ नावाचा गृहस्थ राहत होता. तो अंगारे-धुपारे, जादूटोणा करीत होता. लोकांना नादी लावून नाडीत होता. विठोबा या नावाला कलंकित करणारी त्याची कृत्ये होती. तो ब्राह्मणांच्या ओंजळीने पाणी पिऊन सत्यशोधक कार्यक्रमांना विरोध करीत असे. १४ जून १८८७ रोजी नारायण काशीबा कऱ्हेकर, न्हावी आणि गं. भा. शिवूबाई विठोबा भुजबळ यांच्या आमंत्रणावरून जोतिबा आणि पुण्यातील सत्यशोधक; एका न्हाव्याचे लग्न सत्यशोधक पद्धतीने लावण्यासाठी गेले. ब्राह्मणांनी धमक्या दिल्या, धाक घातला पण तेथील बलुतेदारांनी हे लग्न ब्राह्मणांशिवाय पार पाडले. यावेळी विठोबा भुजबळाने ब्राह्मणांकडून पैसे खाऊन कासारवाडीतील माळी जातीतील वधुवरांचे लग्न ब्राह्मणांकडून पार पाडू, असे वधुवरांच्या

पालकांकडून वदवून घेतले. मात्र लग्नासाठी उपस्थित असलेल्या माळी मंडळींनी आपल्या जातीतील मुलामुलींची लग्ने भटास न बोलावता लावावयाची, असा निर्धार केला आणि 'कुऱ्हाडीचा दांडा, गोतास काळ' अशा विठोबा भुजबळास तोंडघशी पाडले. जोतिबा फुले यांनी तेथल्या तेथे विठोबा भुजबळास उद्देशून, त्याला ताळ्यावर आणण्यासाठी काही अखंड रचना केली.

## पत्रकार जोतिबा

इ.स. १८३२ मध्ये 'दर्पण' नावाचे पत्र बाळशास्त्री जांभेकर यांनी काढून मराठी पत्रकारितेचा पाया घातला. त्यानंतर 'ज्ञानप्रकाश', 'प्रभाकर', 'निबंधमाला', 'विविधज्ञानविस्तार', 'लोककल्याणेच्छू' वगैरे मराठी नियतकालिके सुरू झाली. "स्वदेशी लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा, इथली समृद्धी व लोककल्याण यांचा स्वतंत्र व उघड विचार व्हावा. इंग्रजी वृत्तपत्रांतल्या मजकुरांची भाषांतरे प्रसृत करून देशबांधवांचे अज्ञान, दुर्गुण इत्यादिकांचा नाश व्हावा" अशी उद्दिष्ट्ये होती. 'प्रभाकर'मधून १८४८ मध्ये लोकहितवादी यांनी सनातन्यांना, तिखट आणि झणझणीत भाषेत त्यांचे दोष दाखविले. काही वृत्तपत्रांनी सामाजिक वैगुण्याची चिरफाड सुरू केली. युरोपियनांच्या वैभवाला दिपून, येथील सर्व काही वाईट आहे, अशी मांडणी सुरू केली. परकीय मंडळीही या देशातील वैगुण्यावर बोट ठेवू लागली. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी भूतकाळाचे अतिगौरवीकरण केले. सुधारणानिंदक आणि सुधारक अशी विभागणी पत्रकारितेत झाली. तरीही छापखाने घालणे, पत्र काढणे, शाळा काढणे, ग्रंथ छापणे हा उच्चवर्णीय मंडळींचा धंदा झाला होता. विद्येचा विशेष संस्कार नसणाऱ्या मंडळींनी यावर कब्जा केला. अविद्वान ब्राह्मण मोक्याच्या जागी बसले. या सर्व बदलामध्ये शूद्रातिशूद्रांची काय अवस्था होती? त्यांना मुळाक्षरेही वाचता येत नव्हती. वर्तमानपत्र म्हणजे कोल्हा की कुत्रा की माकड काहीच समजत नव्हते. येथे अभिजनांची अक्षर परंपरा रुजली नव्हती. संतांची आणि लोकसाहित्याची मौखिक परंपरा रुजली होती. त्यांच्यासाठी वर्तमानपत्र काढणे फार मोठे आव्हान होते. वर्तमानपत्र काढले तर वाचणार कोण, विकत घेणार कोण, हे प्रश्न होते. १८७५ साली मुंबईतील तेलगू समाजाच्या मंडळींनी पुण्याच्या सत्यशोधक समाजाला, विकत घेऊन दिलेला छापखाना, त्यांनी परत पाठविला. तरीही भालेकरांनी १८८८ मध्ये 'दीनमित्र' हे साप्ताहिक सुरू केले. मुंबई येथे दामोदर सावळाराम यंदे यांच्या संपादकत्वाखाली 'दीनबंधू' सुरू झाला. नारायणराव लोखंडे यांची या पत्रावर देखरेख होती.

जोतिबा फुले यांना स्वतंत्र वृत्तपत्राची आवश्यकता वाटू लागली. म्हणून त्यांनी १८८५ मध्ये 'सत्सार'चे दोन अंक काढले. हे दोन्ही अंक म्हणजे सत्यशोधकी अनियतकालिके मानली पाहिजेत. पत्रकारांच्या नैतिक जबाबदाऱ्या, त्यांची कर्तव्ये, याविषयी त्यांच्या मनात स्पष्ट कल्पना होती. त्यांनी पत्रकारांना आडमार्गी, आडमुठे, असमंजस, पोटबाबू, धंदेवाईक अशी दूषणे दिली आहेत. काही चुकीच्या भूमिका घेतल्यामुळे आपल्या सहकाऱ्यांचीही त्यांनी कानउघाडणी केली आहे.

सत्यशोधकी पत्रकारितेची उज्ज्वल परंपरा अखंड चालू राहिली. कृष्णराव पांडुरंग भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, कृ. अ. केळुसकर, वासुदेवराव बिर्जे, तान्हुबाई बिर्जे, दामोदर सावळाराम यंदे,गणपतराव स. पाटील, मुकुंदराव पाटील, भगवंतराव पाळेकर, दिनकरराव जवळकर, ॲड. खंडेराव बागल, भाई माधवराव बागल, शामराव देसाई, प्रबोधनकार के. सी. ठाकरे, श्रीपतराव शिंदे, अण्णासाहेब लठ्ठे, वालचंद कोठारी, सावित्रीबाई रोडे, रा. गो. जाधव, बाळासाहेब देसाई, महर्षी वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, फुलवंताबाई झोडगे, गजमल माळी, नागेश चौधरी अशी खूप मोठी परंपरा आहे.

## आधुनिक सत्यशोधकी साहित्याचा प्रारंभ

सत्यशोधनाची परंपरा या देशात सिंधू संस्कृतीएवढी प्राचीन आहे. ती वैदिक परंपरेच्या अगोदरची आहे. लोकायत, सांख्य, नाथ, शाक्त, जैन, बौद्ध या प्राचीन काळातील सत्यशोधकी परंपरा आहेत. वारकरी, लिंगायत, महानुभाव, कबीर या मध्ययुगीन परंपरा आहेत. वेद, आत्मा, ईश्वराचे अस्तित्व मानणारे आणि विरोध करणारे, यावरून आस्तिक-नास्तिक, वैदिक-अवैदिक, आत्मवादी-अनात्मवादी अशा तत्त्वज्ञानाच्या परंपरा येथे विकसित झाल्या. उपरोक्त परंपरा वर्ण-जाती-लिंगभेद आणि वर्चस्व नाकारणाऱ्या आहेत. यामध्ये अनेक ब्राह्मण सहभागी झाले होते. त्यांचाही छळ झाला आहे.

जोतिबा फुले यांनी या परंपरा समजून घेतल्या. बायबल आणि कुराण हे धर्मग्रंथ समजून घेतले. त्यातील समता आणि न्यायाची तत्त्वे त्यांना पटली. त्यांनी आपले नाते या वैचारिक परंपरांशी जोडले.

जोतिबा फुले यांना साहित्य लिहिण्याची अटळता जाणवली. साहित्य लेखन करणे, हे ब्राह्मणांचे काम मानले जात होते. डोके आणि हात, बुद्धी

आणि श्रमाची फारकत केल्यामुळे निर्जिव साहित्य निर्माण होते आणि अनुत्पादक श्रम वाया जाते. पंडिती काव्य, याचे उदाहरण आहे. प्राचीन कला, श्रमिकांनी निर्माण केल्या आहेत. त्यामध्ये तारूण्याचा जोश, सौंदर्याचा आविष्कार आणि श्रमाची श्रेष्ठता, यांचा समतोल साधला आहे. म्हणून लेखन, प्रकाशन, ग्रंथ वितरण, सांस्कृतिक कार्यक्रम, मनोरंजन आणि प्रबोधन याकडे जोतिबा फुले आणि सत्यशोधकांनी आवर्जून लक्ष दिले.

जोतिबा फुले यांच्या काळात, पुढील साहित्यपरंपरा अस्तित्वात होत्या.

१. मनु-शंकराचार्यांना मानणारी चैतन्यवादी परंपरा.
२. सुधारकांची मानवतावादी, उदारमतवादी, अज्ञेयवादी परंपरा.
३. ख्रिस्ती मिशनऱ्यांची मराठी साहित्य परंपरा.
४. सत्यशोधकी साहित्याची परंपरा.

जोतिबा फुले यांनी वैचारिक आणि ललित साहित्य लिहिले. ललित साहित्यामध्ये गद्य आणि पद्य लेखन केले. त्यांच्या सर्व साहित्याचा परिचय देणे येथे स्थलाभावी अशक्य आहे. साहित्य लेखन आणि लेखन काल एवढाच निर्देश करणे शक्य आहे.

**पद्यलेखन**

१. भटाभिक्षुकांना सवाल - वैचारिक पद्य - १८५१ (अनुपलब्ध)
२. निर्मिकाचा शोध - वैचारिक पद्य - १८५३

**पोवाडे**

१. छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा - १८६९
२. विद्याखात्यातील ब्राह्मणपंतोजीचा पवाडा - १८६९
३. इंजिनिअर खात्यातील भट पंतोजीचा पवाडा - १८७३
४. दस्यूचा पवाडा - १८९०

**खंडकाव्य**

१. ब्राह्मणांचे कसब - १८६९

**अभंग**

१. सत्ता तुझी राणीबाई - १८६९
२. मारवाडी-भट यांचे कसब - १८७३
३. भटांच्या मतलबी ग्रंथांचे कसब - १८७३
४. भटांचे कसब आणि शूद्रांचा देवभोळेपणा - १८७३

**अखंड**

इ.स. १८८७ ते १८८९ या कालखंडात त्यांनी जवळपास २५० अखंड लिहिले. त्यांची काही शीर्षके वानगीसाठी पुढीलप्रमाणे : अखंडादी काव्यरचना, शूद्रातिशूद्रास उपदेश, कुळंबीण, स्वामीबंधू यांची टीका, विठोबा भुजबळ यास, बळीराजा, मानव महंमद, शूद्रांपासून फंड गोळा करण्याविषयी निषेधार्थक, ढोंगी गुरू, भटांची वाणी, आर्यभटांचे कसब, गणपती-विडंबनपर अखंड, सत्यपाठ.

अखंड छंदामध्ये त्यांनी पुढीलप्रमाणे पद्यमय पत्रे लिहिली : १. श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड, बडोदे, २. बडोद्याचे दिवाण लक्ष्मण जगन्नाथ, ३. गंगारामभाऊ म्हस्के वकील, पुणे, ४. डॉ. विश्राम रामजी घोले.

याशिवाय आदिसत्याच्या दोन आरत्या - १८८८
ब्राह्मणांचा भोंदूपणा हे एक पद - १८८८
सत्यशोधकी पद्धतीने लग्न लावण्यासाठी
सहा मंगलाष्टके - १८९०
आणि आर्या, दिंडी, कटाव, प्रत्येकी एक - १८८५

**गद्यलेखन**

**निबंध**

१. पुरोहित भटांनो उत्तरे द्या - १८५१ (अनुपलब्ध)
२. मनुस्मृतीचा धिक्कार - १८५४
३. विधवांची भयानक अवस्था - १८७६ (अनुपलब्ध)

४. सत्सार अंक १ आणि २ - १८८५
५. इशारा - १८८५
६. न्या. म. गो. रानडे यांना पत्र - १८८६
७. मामा परमानंद यांना पत्र - १८८६

**प्रबंध**

१. गुलामगिरी - १८७३
२. हंटर शिक्षण आयोगाला निवेदन - १८८२
३. शेतकऱ्यांचा असूड - १८८३
४. सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक - १८९०

**नाटक**

१. तृतीय रत्न - १८५५

**पत्र व्यवहार**

पत्र व्यवहारामधून त्यांचे विचारभाव व्यक्त झाले आहेत. पत्र हा आविष्कार आणि अभिव्यक्तीचा एक महत्त्वाचा लेखन प्रकार म्हणून मान्य झाला आहे. जागतिक पातळीवर असे काही ग्रंथ गाजत आहेत.

पद्य लेखनासाठी जोतिबा फुले यांनी लोकछंदांचा आवर्जून स्वीकार केला आहे. तसेच वारकरी साहित्य—त्यातही तुकाराममहाराजांचा—त्यांच्या अभंग-अखंडांवर सरळ सरळ प्रभाव आढळतो.

सावित्रीबाई फुले यांनीही सत्यशोधकी साहित्य लिहिले.

**पद्यलेखन**

१. काव्यफुले - ४१ कवितांचा संग्रह - १८५४
२. बावन्नकशी सुबोध रत्नाकर - १८९१

**गद्यलेखन**

१. सावित्रीबाई फुले यांची भाषणे
२. सावित्रीबाई फुले यांचा पत्रव्यवहार

## सत्यशोधकी साहित्य प्रवाह

आधुनिक मराठी साहित्यामध्ये इ.स. १८५१ पासून सत्यशोधकी साहित्याचा प्रवाह निर्माण झाला. ही त्या काळातील चौथी अतिशय महत्त्वाची आणि मुख्य साहित्य परंपरा राहिली आहे. या प्रवाहाची पुढील महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.

१. मूल्यांचे आणि तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान, २. विविध साहित्य प्रकारांची निर्मिती, ३. साहित्य प्रवाहांचा विकास, ४. इ.स. १८५१ ते आजपर्यंत अखंड आणि सातत्यपूर्ण लेखन, ५. लेखिकांचा सहभाग, ६. विविध वर्ण-जाती-सामाजिक स्तरातील लेखकांचा सहभाग, ७. नियतकालिके, ग्रंथनिर्मिती, समीक्षा लेखन, ८. प्रकाशन आणि वितरण व्यवस्था निर्माण झाली. ९. साहित्यनिर्मिती आणि वितरणाची केंद्रे मुंबई-पुणे या शहराच्या बाहेर राहिली. १०. अनियतकालिके आणि लघुनियतकालिके काढून प्रारंभापासून हा प्रवाह विद्रोही आणि बंडखोर राहिला आहे.

सत्यशोधकी साहित्यिकांची काही नावे : जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, नारायणराव लोखंडे, वासुदेवराव बिर्जे, तान्हुबाई बिर्जे, कृष्णराव भालेकर, दामोदर यंदे, मुक्ता साळवे, गणपत सखाराम पाटील, मुकुंदराव पाटील, ॲड. खंडेराव बागल, नाम. भास्करराव जाधव, भाई माधवराव बागल, दिनकरराव जवळकर, भगवंतराव पाळेकर, के. सी. ठाकरे, डॉ. पंजाबराव देशमुख, रा. ना. चव्हाण, कृष्णराव अर्जुन केळुसकर, शरद पाटील, आ. ह. साळुंखे, गजमल माळी, नागेश चौधरी, अशोक चोपडे, हरी नरके. इत्यादी.

## जोतिबा-सावित्रीबाई यांचे सहजीवन

जोतिबा फुले यांचा विवाह त्यांच्या वयाच्या तेराव्या वर्षी इ.स. १८४० मध्ये नायगाव येथील खंडोजी नेवसे पाटील यांची ज्येष्ठ कन्या सावित्रीबाई यांच्याशी तिच्या वयाच्या आठव्या वर्षी झाला. सावित्रीबाई सुदृढ, शालीन आणि सुंदर होत्या. हा विवाह मोठ्या थाटामाटात पार पडला. त्यांच्या लग्नाच्या वरातीसाठी हत्ती आणला होता. सावित्रीबाई जोतिबांचा उल्लेख 'शेटजी' असा करीत. जोतिबा फुले यांनी प्रारंभी शिक्षकी केल्यामुळे लोक त्यांना 'तात्या' तर सावित्रीबाई यांना 'काकू' म्हणत असत. जोतिबा, त्यांना 'आहो, काहो' असे आदरार्थी बोलत. हे जोडपे एकमेकांच्या विचार-भावनांशी एकरूप झाले होते. त्यांचे कौटुंबिक जीवन सुखी आणि समाधानी होते. त्यांनी आपल्या

वैयक्तिक संसार-प्रपंचाचा, लौकिक सुखाचा विचार केला नाही. शूद्रातिशूद्रांचे लाखो संसार कसे सुखी होतील, याचा ध्यास घेतला होता. त्यांच्याच सुखदु:खांची काळजी केली.

दोघांचाही स्वभाव मनमिळाऊ होता. दुसऱ्यांसाठी कष्ट सोसणे, हा त्यांचा स्वभावधर्म होता. दु:खी, पीडित, भुकेले, अनाथ, अपंग यांना अन्न, वस्त्र देऊन, त्यांची तृप्ती पाहून, यांना आनंद होत होता. यामुळेच त्यांची आर्थिक परिस्थिती ओढगस्तीची झाली. सामाजिक कार्यातच त्यांनी आपली धनसंपत्ती खर्ची घातली. दारिद्र्याची पर्वा केली नाही. उभयतांनी जी सामाजिक कामे हाती घेतली, त्यामुळे त्यांना, खूप छळ, मन:स्ताप सहन करावा लागला. सावित्रीबाई या खंबीरपणे पुढे होऊन काम करीत होत्या. या धीराच्या माऊलीने कधी कोणाचा त्रागा केला नाही. त्यांच्याकडे येणाऱ्या-जाणाऱ्यांची खूप वर्दळ असे. जोतिबा यांच्याबरोबर भोजनाला रोज किमान चार-सहा लोक असत. सावित्रीबाई स्वत: स्वयंपाक करीत. वरची कामे करण्यासाठी त्यांच्या मदतीला एक बाई आणि एक गडी होता. सावित्रीबाई म्हणजे साक्षात अन्नपूर्णा होती. जेवायला येणारे 'त्यांच्या वडिलांची कमाई खातात' असे त्या हसत हसत म्हणीत. त्यांचे हे उत्तर ऐकून जोतिबा फुले यांना खूप आनंद होई. त्या नेहमी हसतमुख आणि प्रसन्न दिसत.

सावित्रीबाई फुले यांची बुद्धिमत्ता प्रखर होती. त्या स्वत: विचार करीत असत. त्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व होते. त्या विचारपूर्वक कार्यक्रमांचे नियोजन करीत, उपक्रमांमध्ये सहभागी होत असत. त्यामुळे त्यांना घरी रडत बसण्याची वेळ आली नाही. त्या कधी मागे हटल्या नाहीत किंवा पतीबरोबर फरफटत गेल्या नाहीत. आपले काम समाजविरोधी प्रवाहात पोहण्याचे आहे. म्हणून लोकनिंदा, छळ, अपमानच वाट्याला येणार याची त्यांना जाणीव होती. स्वतंत्र प्रज्ञेची स्त्री असल्यामुळे जोतिबा फुले यांच्यासारख्या क्रांतिकारी वादळाशी त्यांनी यशस्वी संसार केला. त्यांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग असे. त्यांनी स्वत: सत्यशोधक समाजाला देणगी दिल्याची नोंद आहे. जोतिबा फुले यांच्यानंतर सत्यशोधक समाजाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी समर्थपणे सांभाळली. अनुयायांमध्ये चैतन्य निर्माण केले. एवढेच नव्हे तर सत्यशोधक समाजाच्या १८९३ साली सासवड येथे झालेल्या अधिवेशनाच्या त्या अध्यक्षा होत्या. त्यांचे काव्य, भाषणे आणि पत्रव्यवहार उपलब्ध झालेला आहे. सावित्रीबाई आपल्या पतीच्या सुरक्षित छायेत जगणाऱ्या सामान्य स्त्री नव्हत्या तर खरोखर क्रांतीची ज्वाला होत्या. शाळांमध्ये अध्यापिका आणि मुख्याध्यापिका

म्हणून काम केले. अनाथ महिलाश्रम आणि बालहत्या प्रतिबंधक गृह, सुशिक्षणगृह नावाचे वसतिगृह, केशवपनविरोधी चळवळ, विधवांच्या पुनर्विवाहांना प्रोत्साहन इत्यादी कार्यक्रमांमध्ये त्यांचा स्वतंत्र सहभाग होता. इ.स. १८७५ ते १८७७ या दुष्काळात पुणे, सांगली, सातारा, अहमदनगर या परिसरात सत्यशोधक समाजाने ५२ अन्नछत्रे उघडली होती. त्यांपैकी काही अन्नछत्रांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी त्यांनी स्वत: उचलली होती.

पुणे येथे राहणारी एक ख्रिस्ती धर्मोपदेशक बाई त्यांच्याकडे बोलण्यासाठी नेहमी येत होती. तिचा भाऊ पुढे हिंदुस्थानचा व्हाईसरॉय झाला. पं. रमाबाई आणि डॉ. आनंदीबाई जोशी या दोन-तीन वेळा त्यांच्या भेटीसाठी आल्या होत्या. रमाबाई रानडे आणि सावित्रीबाई गोवंडे यांच्याशी त्यांची मैत्री होती.

त्यांच्या आग्रहामुळे मोरो विठ्ठल वाळवेकर यांनी स्त्रियांसाठी 'गृहिणी' नावाचे मासिक काढले होते. सावित्रीबाई आपल्या मैत्रिणीचे नाव घालून त्यामध्ये लिहीत असत.

स्वच्छता, टापटीप, तत्परता हे आदर्श गुण त्यांच्या ठिकाणी होते. सेवाभाव, विनयशीलता, विनम्रपणा, प्रसन्नता, हसरा चेहरा यामुळे त्यांच्या गोड आणि मनमिळाऊ स्वभावाला उठावदारपणा येत होता. जोतिबा फुले यांनी हाक मारल्याबरोबर त्या त्वरित येत असत. जेवत असल्या तरी चटकन हात धुवून उपस्थित होत. ही गोष्ट जोतिबा फुले यांच्या लक्षात आल्यावर त्यांना वाईट वाटे. त्या जोतिबा फुले यांच्या आहार आणि प्रकृतीची खूप काळजी घेत. पुत्रसंतान नसलेल्या स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा दिली जात नाही. स्त्रियाच त्यांचा अपमान करतात, नि:संतान असल्याबद्दल त्यांना कधी वाईट वाटले नाही. आपल्यातील मातृप्रेम त्यांनी, त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्या असंख्य मुला-मुलींवर उधळले. प्रेम, करुणा, त्यांच्याठायी अमर्याद होती. म्हणून त्यांनी अनाथ यशवंताला दत्तक घेतले. त्याच्यावर माया करून सर्वच—मातृ-पितृ—कर्तव्ये पार पाडली. पुराणकथेतील शंकर-पार्वतीप्रमाणे हे दांपत्य आदर्श जीवन जगले. १८९७ मध्ये प्लेगग्रस्त रुग्णांची शुश्रूषा करताना त्यांनाच प्लेगची लागण झाली आणि त्यातच त्यांचे निधन झाले.

## 'महात्मा' पदवी

जोतिबा आणि सावित्रीबाई फुले यांनी त्यांचे सर्व आयुष्य शूद्रातिशूद्र स्त्री-पुरुषांच्या उन्नतीसाठी समर्पित केले. आपल्या वैयक्तिक सुखदु:खांचा विचार

केला नाही. जोतिबांची शरिरप्रकृती, व्यायाम करून कमावलेली होती. ठणठणीत आणि निरोगी प्रकृतीमुळे दगदग, धावपळ, शारिरिक आणि मानसिक यातना ते सहन करू शकले. इ.स. १८८७ पासून त्यांची प्रकृती साथ देत नव्हती. त्यांच्या वयाला ६० वर्षे झाली होती. त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल त्यांचा उचित सन्मान करावा, असा विचार मुंबईचे सहकारी करीत होते. रा. ब. नारायण मेघाजी लोखंडे, रामय्या व्यंकय्या आय्यावारू, डॉ. संतुजी रामजी लाड, जाया कराडी लिंगू, व्यंकू बाळूजी कालेवार यांनी एकत्र बसून निर्णय पक्का केला. ११ मे १८८८ रोजी मांडवी येथील कोळीवाडा सभागृहामध्ये दुपारी हा समारंभ होता. बाहेरगावच्या सर्व सत्यशोधकांना निमंत्रणे पाठविली. बाहेरगावाहून झुंडीच्या झुंडी दाखल होत होत्या. स्थानिक मंडळी जमत होती. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद आणि प्रसन्नता होती. बडोद्याचे सयाजीराव महाराज गायकवाड यांनाही सन्मानाने निमंत्रित केले होते. पण ते उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र त्यांनी दामोदर सावळाराम यंदे यांना आपला प्रतिनिधी म्हणून पाठविले. आपल्या गुरूच्या सन्मानासाठी फेटा, महावस्त्र आणि 'हिंदुस्थानचे बुकर टी वॉशिंग्टन' हा किताब द्यावा, असा निरोप पाठविला. आपल्या उद्धारकर्त्याचा सन्मान पाहण्यासाठी मोठा जनसमुदाय जमला होता. डोळ्यात प्राण आणून जोतिबांकडे ते पाहत होते. चेहऱ्यावरून आनंद आणि कृतज्ञतेचे भाव ओसंडत होते. गोरगरिबांसाठी जीवनदानी पद्धतीने कार्य करणारा बळीस्थानातील हा महापुरुष आहे. उपस्थित नेत्यांनी स्फूर्तिदायक भाषणे केली. त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीचा गौरव केला. 'महात्मा' ही पदवी प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात अर्पण केली. "बहुजन समाजाला अज्ञानातून वर काढून त्याला आर्वाचीन काळी जगविणारा ह्या देशातील पहिला महापुरुष महात्मा जोतिबा हाच होय. त्यांचे कार्य विशाल आहे; आणि त्यांचा त्याग त्याहूनही थोर आहे. त्यांनी ज्या मार्गाने कार्य केले त्याच मार्गाने राष्ट्राचे हित आहे व उद्धार आहे. म. गौतम बुद्धाप्रमाणे मानवजातीच्या उद्धाराचे कार्य जोतिबा करीत असल्यामुळे त्यांना 'महात्मा' म्हटले पाहिजे." असे सयाजीरावमहाराज गायकवाड नेहमी म्हणत असत.

या प्रसंगी महात्मा जोतिबा फुले यांनी आपले मनोगत व्यक्त केले, "माझ्या कनिष्ठ आणि दलित बंधूभगिनींच्या बाबतीत माझे जे कर्तव्य होते, ते मी केले. त्यासाठी झगडलो, लढलो. माझ्या अनुयायांनी सत्यशोधक समाजाच्या कार्याचा आणि संदेशाचा अदम्य उत्साहाने, नेटाने आणि चिकाटीने खेड्यापाड्यांतून प्रसार करावा." त्यांचे भाषण ऐकताना श्रोत्यांची अंत:करणे हेलावत होती.

सर्व जनसमुदाय मुग्ध झाला होता. या प्रसंगी बाळाजी कुसाजी पाटील यांचाही सत्कार केला आणि त्यांना धन्यवाद दिले.

## म. जोतिबा फुले यांचे सहकारी

म. जोतिबा फुले यांना सर्व जातिधर्मातील, पंथ-संप्रदायातील, विविध व्यवसाय आणि आर्थिक स्तरातील सहकारी लाभले होते. त्यांचे संघटनाचातुर्य, चारित्र्य आणि निष्ठा तसेच सत्यशोधक समाजाची तत्त्वप्रणाली यामुळे सत्यशोधक समाजाची चळवळ सर्वदूर ग्रामीण भागात पोहोचली. निजामी राजवटीतील मराठवाड्यात, ब्राह्मण कारभाऱ्याच्या सल्ल्यावरून सत्यशोधक समाजावर बंदी होती. तरीही तेथे अनेक गावांमध्ये सत्यशोधक समाज स्थापन झाला.

त्यांचे सहकारी आपला उद्योग व्यवसाय करून चळवळीसाठी खूप मदत देत होते. ब्राह्मण अधिकाऱ्यांनी त्यांना त्रास दिला तरीही त्यांनी या चळवळीत निष्ठेने सहभाग घेतला. त्या सर्वांचा परिचय देणे या स्थळी अशक्य आहे. काही प्रमुख नावांचा उल्लेख करणे शक्य आहे.

नारायण मेघाजी लोखंडे, डॉ. विश्राम रामजी घोले, रामचंद्र बापूसेठ उरवणे, पोलास राजण्णा लिंगू, गंगारामभाऊ म्हस्के वकील, रामचंद्र विठोबा धामणस्कर, रामय्या व्यंकय्या अय्यावारू, व्यंकू बाळूजी कालेवार, जाया कराडी लिंगू, बापूजी हरी शिंदे, नरसिंग सायबू वडनाला, कृष्णाजी पांडुरंग भालेकर, दामोदर सावळाराम यंदे, गणपत सखाराम पाटील, डॉ. संतुजी रामजी लाड, गणपत मल्हारराव बोकड, भाऊ कोंडाजी पाटील, बाळाजी कुसाजी पाटील, माधवराव घाटवळ, दाजीसाहेब यादव पाटील-गोपाळे, मारुतीराव नवले, आंदू शिवाजी पाटील, पोळ, सरदार बहादूर सुभेदार, मेजर दर्याजीराव थोरात, सयाजीराव मैराळ कमद राजकोळी, घनश्यामभाऊ भोसले, भाऊ पाटील शेलार, भीमराव महामुनी, देवराव ठोसर, पं. धोंडिराम कुंभार, इलैय्या सालोमन, जेकब बी. इस्रायल, गोविंदराव काळे, ग्यानोबा कृष्णाजी ससाणे, देवराव हनुमंतराव पिंजण, वासुदेवराव बिर्जे, सहादू वाघोले, भागोजी डुल्लाजी हामंद, गोपाळबाबा वलंगकर, लहुजी साळवे, नारायणराव कडलक. स्त्रियांमध्ये सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे.

म. फुले यांचे मित्र आणि हितचिंतकांमध्ये सयाजीराव महाराज गायकवाड, मामा परमानंद, बाबा पदमनजी, सदाशिवराव गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर,

हरि रावजी चिपळूणकर, केशवराव भवाळकर, यशवंत सखाराम परांजपे, यशवंतराव मणेरीकर, आनंदराव तालचेरकर, ज्ञानगिरीबाबा, तुकाराम तात्या पडवळ, भाऊ मनसाराम ढवारे-नाईक, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, न्या. म. गो. रानडे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, डॉ. शिवाप्पा, वासुदेव बाबाजी नवरंगे, राम बाळकृष्णजी जयकर, रे. जॉन विल्सन, सर जॉर्ज लेग्रँड जेकब, सर विल्यम वेडरबर्न, रेव. मरे मिचेल.

म. जोतिबा फुले यांचे सहकारी, अनुयायी, मित्र, हितचिंतक यांची ही नामावली पाहिली तरी सर्व वर्ण, जाती, धर्म, पंथ, संप्रदायातील मंडळींचा समावेश आहे. तसेच संस्थानिकांपासून सामान्य गरीब लोकांपर्यंत त्यांचा संपर्क होता. यामध्ये साहित्यिक, संपादक, पत्रकार, अभियंते, वास्तुशिल्पी, संशोधक, कलावंत, धर्मोपदेशक यांचाही समावेश होता. त्या काळात सत्यशोधक समाजातच स्त्रियांचा सहभाग होता. त्याकाळात कोणत्याही उच्चवर्णीय संस्थेमध्ये स्त्रियांनी सक्रीय सहभाग घेतला नाही.

## सार्वजनिक सत्यधर्म

वर्णजातिलिंगभेदाष्ठित प्रस्थापित व्यवस्थेवर आघात करणे, विषमतेला विरोध करणे, त्यासाठी लढे देणे, यातच जोतिबा फुले यांचे आयुष्य गेले. प्रस्थापित व्यवस्था, उद्ध्वस्त करण्याचे आणि पुनर्रचनेचे विचार दिले, त्याला जोडून नैतिक आचरण कसे असावे, हेही सांगितले. सत्यशोधक समाज चळवळ आहे. चळवळीचे सामर्थ्य असते, तशाच काही मर्यादाही असतात. आपला समाज धार्मिक वृत्तीचा आहे, पण धर्माचे अर्थ सर्वांना सारखेच अभिप्रेत नाहीत. विशुद्ध धर्माचे स्वरूप लोकांपुढे ठेवावे, असे त्यांना वाटू लागले. जुलै १८८७ मध्येच त्यांना पक्षाघाताचा आजार झाला होता. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी त्यांच्यावर मोफत उपचार केले. त्यातून ते बरे झाले. त्यानंतर १८८९ मध्ये त्यांची संपूर्ण उजवी बाजू निकामी झाली. अर्धांगवायूच्या या आजारातून ते काही बरे झाले नाहीत. त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' हा ग्रंथ डाव्या हाताने लिहावयास घेतला. दुःखमुक्तीसाठी कोणतेही क्रियाकर्म, पूजाविधी, जप अनुष्ठान करण्याची आवश्यकता नाही. उच्च दर्जाचे नैतिक आचरण, उत्पादक श्रम, कुटुंब आणि समाजसेवा करणे हाच खरा धर्म आहे. निर्मिकाने सर्व सृष्ट्य पदार्थ, एकंदर सर्व स्त्री-पुरुषांच्या समान उपभोगासाठी निर्माण केले आहेत. निर्मिकाने निर्माण केलेले अन्न, पाणी, फुले, फळे, पाने त्यालाच नैवेद्य, पूजा म्हणून अर्पण करण्याची गरज नाही. सुख,

धर्मपुस्तक, निर्माणकर्ता, पूजा, नामस्मरण, नैवेद्य अथवा अन्नदान, अनुष्ठान, स्वर्ग, स्त्री-पुरुष, पाप, पुण्य, जातिभेद, धर्म, नीती, तर्क, दैव, सत्य, आकाशातील ग्रह, जन्म, संस्कार, मृत्यू, श्राद्ध इत्यादी २७ विषयांवर त्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. धर्मविषयक संकल्पना स्पष्ट करीत करीत, सार्वजनिक सत्यांची मांडणी केली आहे. त्याचे आचरण हाच धर्म आहे. त्यासाठी ईश्वर, धर्मग्रंथ, विधी, धर्मगुरू यांची गरज नाही. त्याचे आचरण कोणालाही करता येईल, असा इहवादी, विधायक, रचनात्मक विचार त्यांनी मांडला आहे. हा विचार लोकांपर्यंत नेण्यासाठी त्यांना आयुष्य लाभले नाही. हे काम झाले असते तर... हा विचार मनात आल्याशिवाय राहत नाही. त्यांनी 'निर्मिक' आणि 'धर्म' या संकल्पना स्वीकारल्या म्हणून त्यांच्यावर टीका केली जाते.

## म. जोतिबा फुले यांचा जीवनान्त

इ.स. १८८७ पासून पुढचा काळ आजारात गेला. सावित्रीबाई यांनी त्यांची खूप शुश्रूषा केली. सर्व धन, सार्वजनिक कार्यासाठी खर्च झाल्यामुळे उपचारासाठी त्यांची ऐपत राहिली नाही. डॉ. घोले यांनी उपचार केले. सयाजीराव महाराज गायकवाड यांनी काही मदत केली. पहिल्या आजारातून बरे झाल्यावर पुन्हा अडीच वर्षांनंतर प्रकृती जास्तच गंभीर झाली. मृत्यूपूर्वी दोन महिने आजारीच होते. या दोन महिन्यात थोडेसे बरे वाटले की, घराबाहेरील अंगणात बिछायत करून बसत. आजाराच्या काळात थोडी पोळी व थोडा भात एवढाच आहार घेत. शेवटच्या तीन दिवसांत साबुदाण्याची पेज आणि दूध घेत. त्यांचा आजार वाढला होता. पण त्यांनी कोणाजवळ बोलून दाखविले नाही. आहारातील बदलावरून सावित्रीबाई यांनी ओळखले होते. म. फुले यांनाही कळून आले होते. त्यांनी दोन दिवस अगोदर सर्व मित्र, अनुयायी आणि सहकारी यांना निरोप पाठवून आणि तारा पाठवून भेटीला बोलावून घेतले. त्यांच्या आजाराची वार्ता कळल्याबरोबर मामा परमानंद, सर रामकृष्ण भांडारकर, न्या. रानडे, पं. रमाबाई, हरी रावजी, नागेश्वर गीर, भाऊ कोंडाजी पाटील प्रभृती मोठमोठी माणसे भेटून गेली. त्यांच्या निरोपावरून पुण्यातील आणि बाहेरगावची मंडळी भेटीला आली. २७ नोव्हेंबर १८९० रोजी दुपारी मुंबईहून रा. ब. लोखंडे, रामय्या व्यंकय्या आय्यावारू, ठाण्याहून डॉ. संतुजी लाड, पुण्यातून वाळवेकर, डॉ. घोले, मारुतीराव नवले, पं. धोंडिराम कुंभार, भालेकर, हडपसरहून ग्यानोबा ससाणे

इत्यादी मंडळी जमली. सर्वजण शोकाकूल झाले होते. सावित्रीबाई आणि यशवंतराव यांना त्यांनी जवळ बोलाविले. त्यांना मित्रमंडळींच्या स्वाधीन केले आणि म्हणाले, "आता माझा अंतकाळ जवळ आला आहे. या दोघांना तुम्ही सांभाळा. तुमच्याशिवाय यांना जगात कोणी उरले नाही. मला तीन दिवसांपासून अशक्तपणा वाटत आहे." हे ऐकून सर्वांचे डोळे अश्रूंनी भरून आले. पुढे ते म्हणाले, "माझ्या अंतकाळी तुमचे सर्वांचे दर्शन झाले आणि तुम्ही सर्वजण मी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे कार्य चालवित आहात, हे पाहून मला आता मृत्यू आला, तरी मी मोठ्या आनंदाने, त्याच्या स्वाधीन होईल. आपला बहुजन समाज अवनतीच्या खोल दरीत ढकलला गेला आहे. त्याच्या उन्नतीसाठी खूप प्रयत्न करावे लागतील. तुम्ही ते कराल, याची मला खात्री आहे. मी जे केले, त्यात थोडे यश आले. तेवढ्याने माझे समाधान झाले नाही. तुमच्या कामात अनेक विघ्ने येतील. त्यावेळी डगमगू नका. सत्यावर पूर्ण विश्वास ठेवा आणि प्रयत्न करीत रहा. मी गेलो तरी तुम्ही दुःख मानू नये. जीवनातील हा एक सृष्टीक्रम आहे. तो कोणाला चुकत नाही." असे बोलून त्यांनी सर्वांच्या चेहऱ्यावरून हात फिरविला. आता स्पर्शाच्या भाषेतून ते बोलू लागले.

सर्व मंडळी शोक करू लागली. सावित्रीबाई आणि यशवंतराव यांच्या दुःखाला सीमा राहिली नाही. त्यांचा धीर खचला. आता सर्वांनी आशा सोडली होती, तरी आणखी ४-८ दिवस जगतील असे सर्वांना वाटत होते.

रा. ब. लोखंडे, भालेकर वगैरे तसेच थांबले. बाकीची मंडळी आपापल्या गावी निघून गेली. त्याच रात्री ओतूरहून भाऊ कोंडाजी पाटील आले. त्यांच्याशी बोलण्याचेही त्राण राहिले नव्हते. तरीही खोल आवाजात "सावित्रीबाई आणि यशवंत यांच्याकडे आता तुम्हीच लक्ष ठेवा." असे सांगितले. "तुम्ही जेऊन लवकर झोपा." असे खुणेने सुचविले. त्यांच्या या सर्व वागण्यावरून सावित्रीबाई जास्तच साशंक झाल्या. ते एकसारखे सगळ्यांकडे पाहत होते. थोडेसे बोलले आणि 'निर्मिकाचे भजन करा' असे म्हणाले. मधून मधून डोळे बंद करीत. पुन्हा थोडेसे उघडीत. त्याच रात्री दोन वाजून वीस मिनिटांनी त्यांचा जीवनान्त झाला. आधुनिक काळातील क्रांतीचा झंझावात शांत झाला. जीवनज्योत विझली. डॉ. घोले यांना बोलावणे पाठविले. ते आले आणि शवाकडे पाहून मोठ्याने हंबरडा फोडला. पहाडासारख्या छातीचा माणूस आपला शोक आवरू शकला नाही. रडण्याचा कल्लोळ झाला. त्या आक्रंदनाचे वर्णन करण्यासाठी शब्दच नाहीत, असा तो प्रसंग होता. "सत्यवर्तन

करणाऱ्याला मृत्यूसमयी यातना होत नाहीत,'' असे 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तका'मध्ये 'मृत्यू' या विषयावर लिहिताना त्यांनीच म्हटले आहे. त्यांच्या बाबतीत अगदी तसेच घडले. या महात्म्याचा मृत्यू तसाच भव्यदिव्य आणि उदात्त होता.

त्यांच्या मृत्यूची वार्ता सकाळी वाऱ्यासारखी शहरभर पसरली. लोकांचे लोंढेच्या लोंढे त्यांच्या घराकडे येऊ लागले. त्यामध्ये महार मांगादी अस्पृश्यांची संख्या खूप होती. सकाळी त्यांच्या घरापुढील मोकळ्या पटांगणामध्ये उभे राहण्यासाठी लोकांना जागा पुरली नाही. भांबुर्डे, खडकी, घोरपडी, झगड्याची वाडी, हडपसर वगैरे ठिकाणी निरोप गेले. अवतीभवतीच्या अनेक खेड्यापाड्यांतील असंख्य लोक आपल्या उद्धारकर्त्याचे अंत्यदर्शन घेण्यासाठी आले.

अंत्ययात्रेची तयारी सुरू झाली. त्यांच्या शवाला कोणी उचलावे, अग्नी कोणी द्यावा, यावरून भाऊबंदांमध्ये वाद निर्माण झाला. वाड्यातील आवारातच प्रेत पुरण्यासाठी त्यांनी स्वत: समाधी बांधून ठेवली होती. "याच समाधीमध्ये मला पुरा. माझ्या भाईबंदांना माझ्या प्रेताला हात लावू देऊ नका, कारण ते ब्राह्मणांच्या पायाचे तीर्थ पितात.'' अशा सूचना डॉ. घोले आणि इतर जबाबदार आणि वजनदार सहकाऱ्यांजवळ दिल्या होत्या. या समाधीमध्ये पुरण्यासाठी डॉ. घोले आणि इतर मंडळी परवानगी घेण्यासाठी गेले. संबंधित सरकारी अधिकाऱ्यांनी परवानगी दिली नाही. प्रेत स्मशानात न्यावे, असे ठरले. त्यांचे भाईबंद बाबा फुले आणि महादबा फुले आडवे आले. "ते आमचे वडील होते. प्रेताला आम्हीच खांदा देऊ. यशवंता आमचा कोणी नाही.'' असे ते म्हणू लागले. दु:खाचा डोंगर कोसळलेला असताना सावित्रीबाई वाघिणीप्रमाणे पुढे आल्या. त्यांनी आणि इतर प्रतिष्ठित मंडळींनी त्यांना समजावून सांगितले, तरीही ते कोणाचे ऐकत नव्हते. डॉ. घोले यांनी पोलिसांच्या मदतीने त्यांना तेथून घालवून दिले. वेगवेगळ्या वर्ण, जाती, धर्माच्या व मोठ्या पदवीस पोहोचलेल्या मंडळींनी प्रेताला खांदा दिला आणि प्रेत स्मशानात नेले. सावित्रीबाई यांनी प्रेतापुढे टिटवे धरले. या देशातील इतिहासात प्रथमच असे घडले असावे. सोबत यशवंत आणि एक पुतण्या गजाननराव फुले त्यांच्या हाताला धरून चालत होते.

पुणे शहरावर दु:खाची छाया पसरली होती. रडारड ऐकू येत होती. महारमांगादी अस्पृश्य जातीतील स्त्री-पुरुष मोठमोठ्याने शोक करीत होते. स्मशानभूमीवर तीन हजारांवर जनसमुदाय जमला होता. पुणे शहरातील स्मशानभूमीत

यापूर्वी एवढा प्रचंड जनसमुदाय कधीच जमला नव्हता. सरणाला अग्नी देण्यापूर्वी डॉ. घोले, भाऊ कोंडाजी पाटील, डुमरे, कृष्णराव भालेकर, पंडित धोंडिराम, यशवंतराव फुले यांची शोकपर भाषणे झाली. दुपारी एक वाजता अग्नी दिला. तिसऱ्या दिवशी त्यांच्या अस्थी वाजत-गाजत, मिरवणुकीने घरी आणून, त्यांनी बांधून ठेवलेल्या समाधीमध्ये ठेवल्या. तेराव्या दिवशी सर्व रूढींचा त्याग करून, त्यांच्या इच्छेप्रमाणे अंध, अपंग, अनाथ यांना, तसेच गरीब विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देऊन वस्त्रे दिली. विद्यार्थ्यांना लेखन साहित्यही दिले.

लौकिक अर्थाने म. जोतिबा फुले यांची जीवनयात्रा संपली होती. पण विचाराने ते आज खऱ्या अर्थाने जिवंत आहेत. त्यांचे विचार आणि त्यांचे कार्यक्रम हेच आज खऱ्या अर्थाने मार्गदर्शक आहेत. त्यांच्या काळात त्यांचे विरोधक, उच्चवर्णजातींमध्ये मान्यताप्राप्त होते. आज त्यांच्या नावाचा विसर पडला आहे. वर्णजातिधर्मांध शक्तींना म. फुले, राजर्षी शाहूमहाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा, त्यांच्या पालख्यांमधून मिरवाव्या लागत आहेत, हे त्यांनी पेरणी केलेल्या विचार आणि मूल्यांच्या बीजाला महाराष्ट्रात आलेले फळ आहे. सत्याचाच विजय होत असतो. सत्याचाच विजय यापुढेही होत राहणार आहे. शासन जात्यांत, वर्णांध आणि धर्मांध शक्तींना आळा घालण्याचा प्रयत्न करीत आहे. वरवरचे प्रयत्न कामाचे नाहीत. उपरोक्त सत्यशोधक महामानवांच्या विचारांनी या शक्तींना नक्की आवर घालता येईल.

सत्यशोधक म. जोतिबा फुले केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या सम्यक क्रांतीचे शिल्पकार आहेत. आजच्या जागतिकीकरणाच्या काळातही समग्र भारतीयांच्या विचार-भावनांना एकत्र गुंफण्याचे सूत्र त्यांच्या विचारांमध्ये समाविष्ट झालेले आहे.

# आधारग्रंथ


१. 'म. फुले समग्र वाङ्मय', संपा. : फडके, य. दि., सुधारित पाचवी आवृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१.

२. महात्मा जोतिबा फुले यांचे अमर जीवन, क्षत्रिय मराठेशास्त्री नारो बाबाजी महाघट पाटील, ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे, १८९१.

३. महाराष्ट्राचा मार्टिन ल्यूथर महात्मा जोतीराव फुले यांचे त्रोटक चरित्र, अनंत एकनाथ गवंडी, पुणे, लेखक व प्रकाशक, १९११.

४. 'गुलामगिरी'च्या प्रथमावृत्तीचे प्रकाशक डॉ. यशवंतराव फुले यांची म. जोतिबा फुले चरित्रात्मक प्रस्तावना.

५. म. फुले : दुर्मिळ वाङ्मय आणि समकालीन चरित्रे, संपा. : माळी, डॉ. मा. गो. आणि सावरकर, डॉ. सुभाष, मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, १९९९.

६. महात्मा जोतिबा फुले, पाटील, पंढरीनाथ सीताराम, चिखली, मनोविकास प्रकाशन, मुंबई, आवृत्ती दुसरी, १९८९.

७. आम्ही पाहिलेले फुले 'पुरोगामी सत्यशोधक', म. जोतीराव फुले समता प्रतिष्ठान, पुणे, पहिली आवृत्ती, २८ नोव्हेंबर १९८१.

८. महात्मा जोतीराव फुले : आमच्या समाजक्रांतीचे जनक, कीर, डॉ. धनंजय, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण १९७५.

९. सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, संपा. : माळी, डॉ. मा. गो. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८.

१०. महात्मा फुले गौरवग्रंथ, संपा. : साळुंखे, पी. बी. आणि इतर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पहिली आवृत्ती, १९८२.

११. महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा, संपा. : नरके हरी, म. जोतिबा फुले चरित्रसाधने प्रकाशन समिती, मुंबई, पहिली आवृत्ती, १९९८.

१२. म. जोतिबा फुले : विचार आणि वाङ्मय, गुंदेकर, डॉ. श्रीराम; प्रतिमा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९९२.
१३. म. जोतिबा फुले : साहित्य आणि साहित्य मूल्ये, गुंदेकर, डॉ. श्रीराम; प्रतिमा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, २००२.
१४. महात्मा फुले : व्यक्तित्व आणि विचार, सरदार, प्रा. गं. बा., ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९८१.
१५. म. फुले आणि धर्म, साळुंखे, डॉ. आ. ह.;/ लोकवाङ्मय प्रकाशन गृह, मुंबई, १९९२.
१६. महात्मा जोतीराव फुले आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर, माळी, गजमल, राजमुद्रा प्रकाशन प्रा. लि., औरंगाबाद, १९९७.
१७. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले : माळी, डॉ. मा. गो., आशा प्रकाशन, गारगोटी, पहिली आवृत्ती, १९८०.

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## महाराष्ट्राचे शिल्पकार योजनेअंतर्गत चरित्रग्रंथ
## मलिकेतील चरित्रग्रंथ

| | | |
|---|---|---|
| १) एस. एम. जोशी | श्री. ग. प्र. प्रधान | रु. ४०/- |
| २) साने गुरुजी | श्री. राजा मंगळवेढेकर | रु. ४०/- |
| ३) दादा धर्माधिकारी | श्रीमती तारा धर्माधिकारी | रु. ४०/- |
| ४) क्रांतिसिंह नाना पाटील | श्री. भारत पाटणकर | रु. ४०/- |
| ५) डॉ. विठ्ठलराव विखेपाटील | श्री. शिवाजी सावंत | रु. ३५/- |
| ६) शंकरराव किर्लोस्कर | श्रीमती शांता किर्लोस्कर | रु. ४०/- |
| ७) मामासाहेब जगदाळे | श्री. व. न. इंगळे | रु. ४५/- |
| ८) तंट्या भिल्ल | श्री. बाबा भांड | रु. ४५/- |
| ९) यशवंतराव चव्हाण | श्री. विठ्ठलराव पाटील | रु. ४०/- |
| १०) दादासाहेब फाळके | श्री. बापू वाटवे | रु. ३५/- |
| ११) ताराबाई शिंदे | श्री. इंद्रजित भालेराव | रु. २५/- |
| १२) तेजस्विनी अहिल्याबाई होळकर | सौ. विजया जहागीरदार | रु. ४५/- |
| १३) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | डॉ. अरुंधती खंडकर | रु. ४०/- |
| १४) स्वातंत्र्यवीर सावरकर | श्री. सुधाकर देशपांडे | रु. ४०/- |
| १५) बॅ. राजाभाऊ खोब्रागडे | श्री. व्ही. डी. मेश्राम | रु. ३५/- |
| १६) स्वामी रामानंद तीर्थ | श्री. प्रकाश मेदककर | रु. ४५/- |
| १७) पठ्ठे बापूराव | श्री. चंद्रकुमार नलगे | रु. ४५/- |
| १८) भाई उद्धवराव पाटील | श्री. व. न. अिंगळे | रु. ५५/- |
| १९) धोंडो केशव कर्वे | डॉ. न. म. जोशी | रु. ४०/- |
| २०) लोकहितवादी | डॉ. निर्मलकुमार फडकुले | रु. ४०/- |
| २१) यदुनाथ थत्ते | डॉ. मु. ब. शहा | रु. ४०/- |
| २२) गोविंदभाई श्रॉफ | श्री. विजय दिवाण | रु. ४५/- |
| २३) रामजोशी | श्री. शिरीष गंधे | रु. ४५/- |
| २४) वसंतराव नाईक | श्री. उत्तम रुद्रवार | रु. ३५/- |

***मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे***

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

***अधिक माहिती/चौकशीसाठी***

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, दादर (पूर्व),
मुंबई - ४०० ०१४
दूरध्वनी - २४१४४०२१, २४१४६००५

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने

| | | | |
|---|---|---|---|
| १) | महाराष्ट्राचा इतिहास प्रागैतिहासिक महाराष्ट्र (खंड पहिला भाग-१) | शां. भा. देव | रु. १२७/- |
| २) | महाराष्ट्राचा इतिहास (मध्ययुगीन कालखंड भाग-१) | संपा. : गो. त्र्यं. कुलकर्णी | रु. १४५/- |
| ३) | मध्ययुगीन महाराष्ट्र (सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन) | प्रा. म. श्री. माटे | रु. ७५/- |
| ४) | समाजशास्त्रीय विचारातील प्रमुख प्रवाह (भाग पहिला) | अनु. : हेमकांत बळकुंदी | रु. २९५/- |
| ५) | पं. जवाहरलाल नेहरू व्यक्ती आणि कार्य | संपा. : बा. ह. कल्याणकर | रु. १४०/- |
| ६) | भारताचा स्वातंत्र्यलढा | डॉ. वा. ना. कुबेर | रु. १०९/- |
| ७) | मराठी वाङ्मयकोश खंड-४ डॉ. विजया राजाध्यक्ष | समन्वय संपादक | रु. ३२०/- |
| ८) | दादासाहेब गायकवाड काल आणि कर्तृत्व | संपादक मंडळ | रु. ६०/- |
| ९) | भारतातील आदिवासी वंश | प्रा. वि. श्री. कुलकर्णी | रु. १२५/- |
| १०) | खानदेशातील कृषक जीवन | डॉ. रमेश सूर्यवंशी | रु. ६०/- |
| ११) | लैंगिक नीती आणि समाज | श्रीमती शकुंतला क्षीरसागर | रु. १४५/- |
| १२) | मराठी वाङ्मयकोश खंड २, भाग-१ | डॉ. गो. म. कुलकर्णी | रु. १३०/- |

***मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे***

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

***अधिक माहिती/चौकशीसाठी***

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, दादर (पूर्व),
मुंबई - ४०० ०१४
दूरध्वनी - २४१४४०२१, २४१४६००५

[illegible]

| | | |
|---|---|---|
| [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] |

[illegible]

र. रा. शा. सं. मं. ग्रंथालय



डॉ. श्रीराम रावसाहेब गुंदेकर, यांचा जन्म आंबेसावळी, ता. जि. बीड येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले.

एम.ए. (मराठी)चे शिक्षण संपल्यानंतर लातूर येथे राजर्षी शाहू महाविद्यालयात मराठी विषयाचे अध्यापन करीत आहेत.

विद्यार्थिदशेतच त्यांनी युवक क्रांती दल या चळवळीत सक्रिय कार्य केले. दलित शिष्यवृत्ती वाढ, विद्यापीठीय परीक्षा शुल्क माफी, मराठवाडा विकास आंदोलन, मराठवाडा विद्यापीठ नामांतर, यज्ञविरोधी आंदोलन इत्यादी आंदोलनांत सक्रिय सहभाग घेतला. याच काळात त्यांनी कविता, कथा, समीक्षा लेखन सुरू केले होते. ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी साहित्य हे त्यांच्या लेखनाचे व अभ्यासाचे साहित्यप्रवाह आहेत. आता ते सत्यशोधक समाजाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सहचिटणीस आहेत. गेल्या दहा वर्षांपासून त्यांनी सत्यशोधकी साहित्यप्रवाहाचे प्रवक्तेपण केले. 'सत्यशोधकी साहित्यप्रवाह' हा शब्द त्यांनी चलनात आणला. आता तो रूढ आणि सर्वमान्य झाला आहे.

'सत्यशोधकी साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद' स्थापन करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. प्रस्तुत परिषदेचे ते संस्थापक सरचिटणीस आहेत. त्यांनी लातूर येथे पहिले सत्यशोधकी साहित्य संमेलन डिसेंबर २००३ मध्ये घेतले.

***प्रकाशित ग्रंथ : समीक्षा*** - १. म. जोतिबा फुले : विचार आणि वाङ्मय, २. म. जोतिबा फुले : साहित्य आणि साहित्यमूल्ये, ३. सत्यशोधकी साहित्य : परंपरा आणि स्वरूप, ४. ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन.

***ग्रामीण कथासंग्रह :*** १. उचल, २. लगाम.

***बालकविता :*** १. ढगाची तहान

***संपादने :*** १. बळीबा पाटील - सत्यशोधकी कादंबरी - कृष्णराव भालेकर, २. ढङ्काशास्त्री परान्ने - सत्यशोधकी कादंबरी - मुकुंदराव पाटील, ३. देशभक्त लीलासार - सत्यशोधकी खंडकाव्य - मुकुंदराव पाटील, ४. सत्यशोधकी निबंध - विद्यापीठ अनुदान आयोग आणि राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर; यांच्यावतीने १७-१८ फेब्रुवारी २००१ रोजी 'सत्यशोधकी साहित्य' या विषयावरील चर्चासत्रात सादर झालेल्या निबंधांचा संपादित संग्रह.

***पारितोषिके :*** १. भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार, कोपरगाव, जि. अहमदनगर, २. नरहर कुरुंदकर पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, ३. महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार, मुंबई, ४. सुशील प्रधान बालसाहित्य पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, ५. सुदामजी सावरकर जनसाहित्य पुरस्कार, अमरावती, ६. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले पुरस्कार, अहमदपूर, जि. लातूर, ७. सेवाभूमी साहित्य पुरस्कार, लातूर, ८. परिवर्तन साहित्य सेवा पुरस्कार, यवतमाळ, ९. दीनमित्रकार मुकुंदराव पाटील साहित्य पुरस्कार, तरवडी, जि. अहमदनगर, १०. महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार, मुंबई (दुसऱ्यांदा)